म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ७५८

REFBK-0001129

स्थळप्रत
म.ग्रं.सं.ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१३९

विभूति-परिचयमाला--पुस्तक १ लें.

(संपादक—वा० दा० मुंडले व द० वा० पोतदार, बी. ए.)

# नेपोलियन बोनापार्ट

अथवा

## आसुरी महत्त्वाकांक्षा.

लेखक,
वासुदेव दामोदर मुंडले.

प्रकाशक,
मोरो आपाजी सहस्रबुद्धे,
मालक—श्रीमयूरेश पुस्तकालय, पुणें.

मुद्रक,
अच्युत चिंतामण भट,
यशवंत छापखाना, कसबा पेठ. पुणें शहर.

REFBK-0001129

किंमत १२ आणे.

या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क प्रकाशकानें
आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

प्रस्तुत चरित्र हें **विभूति-परिचय-मालेचें** प्रथम पुष्प होय. गेल्या दिपवाळीलाच तें विकसित व्हावयाचें तसें न होतां चालू महा-युद्धाच्या प्रखर उष्णतेमुळें कोमेजून जाऊन मध्येंच तें गळून पडतें कीं काय, अशी भीति उत्पन्न झाली होती. परंतु त्यांतूनही जगून ईशकृपेनें तें आज विकास पावत आहे. याचा सुगंधयुक्त परिमळ भरपूर सेवन करून रसिक महाराष्ट्रीय वाचक आम्हांला उदार आश्रय देतील अशी उमेद आहे.

'**श्री-मयूरेश-पुस्तकालय**' ही संस्था स्थापन करून तिच्या द्वारें '**श्रीशिवछत्रपतिचरित्र**' नांवाचें पुस्तक आम्हीं प्रथम प्रकाशित केलें; तें आज लोकांपुढें आहेच. नंतर **पुणें-नाइटक्लबच्या** '**मौनयौवना**' नामक सुंदर कादंबरीची आम्हीं द्वितीयावृत्ति प्रकाशित केली. श्रीयुत **मुंडले व पोतदार** या प्रतिभासंपन्न लेखकांकडून लिहवून फ्रान्स देशस्थ उच्चतम श्रेष्ठ विभूतींचें चरित्र आज आम्ही प्रकाशित करीत आहों. प्रथम विचार नसतांही चार सुंदर चित्रें घालून या पुस्तकाचें अंतर्बहिरंग सर्वांगसुंदर करण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे. यापुढेंही अशींच उपयुक्त व वाचनीय पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे; परंतु तो तडीस नेणें सर्वस्वीं रसिक वाचकवर्गाच्या आश्रयावर अवलंबून आहे. अस्तु.

प्रकाशक.

**मो० आ० सहस्रबुद्धे.**

श्रीमयूरेश पुस्तकालय, पुणें (सिटी.)

प्रस्तुत चरित्र हें श्रीविभूतिपरिचयमालेचें पहिलें पुस्तक आहे. दुसरें पुस्तक फ्रँकलीन अगर रमेशचंद्र दत्त यांपैकीं एका विभूतीचें चरित्र प्रसिद्ध होईल. जून १९१५ चे आंत नांव नोंदविल्यास सवलतीनें म्हणजे फक्त ॥- चे व्ही. पी. नें पाठवूं.

श्रीमयूरेश पुस्तकालय,

बेलबाग, पुणें शहर.

ग्रंथ संग्रहालय ठाणे.

# भूमिका.

—:o:—

कोणतेंही चित्र उठावदार दिसावें असें जर त्याच्या जनकास वाटत असेल तर त्यानें त्या चित्राचा विवक्षित पार्श्वभाग ( Back ground ) ठळक रीतीनें चितारला पाहिजे, असा चित्रकलेचा सर्वसाधारण नियम आहे. चित्रकला व लेखनकला या दोहोंमध्यें बरेंच साधर्म्य असल्यामुळें वरील नियम लेखनकलेच्या विषयांसही लागू आहे. ‘थोर विभूतींचें चरित्र’ यासारख्या विषयास तर तो विशेष लागू आहे. कारण अशा प्रकारच्या विभूतींचें चरित्र म्हणजे एका विवक्षित कालांतील वस्तुस्थितीचें एक सुंदर चित्रच होय. अर्थात् हें चित्र उठावदार दिसण्याकरितां त्याच्या भोंवतालचा पार्श्वभाग—म्हणजे तत्कालीन परिस्थिति--ठळकपणें लोकांच्या दृष्टीसमोर आणून देणें जरूर आहे. त्यावांचून त्या चित्राचा त्यांचे मनावर बरोबर ठसा उमटणार नाहीं. प्रस्तुत चरित्र हें एके काळीं ज्याचें नांव ऐकतांच सर्व युरोपखंडास कांपरें भरत असे, त्या **नेपोलियन** नामक प्रख्यात रणशूर व राजकार्यधुरंधर विभूतीचें आहे. आसुरी महत्वाकांक्षेनें भारल्यामुळें नेपोलियनच्या हातून अनेक अघोर कर्में जरी घडलीं असलीं, तरी त्यामुळें त्याच्या अलौकिक-पणास कोणत्याही रीतीनें कमीपणा येऊं शकत नाहीं; इतकेंच नव्हे, तर नेपोलियनच्या आयुष्यक्रमांतील प्रसंगांत जितका लोकोत्तर-पणा भरलेला आहे, तितका दुसऱ्या एखाद्या विभूतीच्या चारि-

ऱ्यांत क्वचितच आढळून येईल! उघडच आहे, पांच पंचवीस वर्षांच्या अमदानींत विलक्षण रीतीनें रंकाचा राव होऊन सृष्टींतील अत्युच्च वैभवाच्या शिखरावर आलोडन करणारा, व विहंगमदृष्टीनें आपल्या कर्तबगारीचें अवलोकन करीत असतां दुर्दैवाची गचांडी मिळून एकदम खालीं कोसळून रावाचा फिरून रंक बनणारा, आणि त्या स्थितींतही कौतुकास्पद दिसणारा असा प्राणी जगाच्या इतिहासांत नेपालियनवांचून दुसरा कोण आहे? आणि असें ज्याचें लोकोत्तर चारित्र्य त्यास जर 'विभूति' म्हणावयाचें नाहीं तर मग कोणास म्हणावयाचें? इंग्रजी व फ्रेंच भाषेंत नेपालियनचीं शेंकडों चरित्रें प्रसिद्ध झालेलीं आहेत व त्यांतील कांहीं प्रशंसापर व कांहीं निंदापर अशीं आहेत. या बाबतींतही नेपोलियनला दुसरी जोड नाहीं. स्तुति व निंदा या दोहोंचाही इतका वर्षाव दुसऱ्या एखाद्या थोर पुरुषावर क्वचितच झालेला असेल. हा सर्व पक्षाभिमानाचा खेळ आहे, हें उघड आहे; परंतु त्या त्या काला-मध्यें स्वैरपणें संचार करणारी विकारवशता कालांतरानें नष्ट होऊन जेव्हां केवळ निरपेक्ष अशा ऐतिहासिक निर्णयाचा काल येऊन ठेपतो, तेव्हां कोणत्याही गतकालीन गोष्टीचें यथार्थ स्वरूप असेल तेवढेंच कायम टिकतें, व बाकीचा सर्व भाग फोल ठरून कालाच्या उदरांत त्याची आहुति पडते. नेपोलियनच्या कृत्यांसंबंधानें अशा प्रकारचा निर्णय होऊन चुकलेला आहे; आणि त्याच्या स्वभावांत जरी कित्येक मोठे दोष असले, तरी तो निर्णय एकंदरींत त्याला अनुकूल--भूषणावह--असाच आहे. नेपोलियनच्या स्वभावदोषामुळें

त्याचा स्वतःचा नाश झाला, पण त्याच्या हालचालींमुळें व अवाढव्य उद्योगामुळें युरोपखंडाची एकंदरींत प्रगतिच झाली; आणि ही गोष्ट त्याच्या शत्रुपक्षांतील विचारी लोकांनीं मान्यही केलेली आहे. युद्धकलेमध्यें तर त्याच्याइतका निष्णात सेनापति आधुनिक कालांत निपजलाच नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. या बाबतींत तर त्याला 'प्रतिभासंपन्न' (Genius) मानतात. मुत्सद्दीपणा व राज्यकारभार चालविण्याचें चातुर्य या बाबींतही तो कांहीं कमी प्रवीण नव्हता. परंतु या सर्व बाबतींत नेपोलियनच्या अंगच्या गुणांचा प्रकाश पडण्यास त्याच्या वेळची परिस्थिति विशेष कारणीभूत झालेली आहे. किंबहुना, ही परिस्थिति नसती तर नेपोलियनचा अशा तऱ्हेनें व इतका उदय झाला असता कीं नाहीं, याची शंकाच आहे. ही परिस्थिति हाच त्याच्या चारित्र्यरूपी चित्राचा पार्श्वभाग होय. आणि स्वभावतः ती त्यास अत्यंत अनुकूल असल्यामुळेंच इतिहासाच्या चित्रफलकावर त्याचें इतकें उठावदार व सुंदर चित्र वठलें आहे. नेपोलियनचें चरित्र वाचणारानें ही परिस्थिति प्रथम लक्षांत घेतली पाहिजे; एरवीं त्या चरित्राचें रहस्य त्यास नीट कळणार नाहीं. ह्या परिस्थितीचें विस्तृत उद्घाटन प्रस्तुत चरित्रग्रंथांत ठिकठिकाणीं झालेंच आहे, परंतु तिची थोडीशी कल्पना चरित्र वाचण्यास सुरुवात करण्यापूर्वींच असणें अवश्य आहे, म्हणून येथें तिचें थोडक्यांत दिग्दर्शन करण्यांत येत आहे. नेपोलियनच्या ऐन उमेदीचा काल म्हणजे फ्रान्सच्या लोकप्रसिद्ध क्रांतीचा काल होय. या क्रांतीमध्यें फ्रान्स

देशांतील बलाढ्य अशा बोरबोन राजघराण्याचा विध्वंस झाला. हें राजघराणें फार जुनाट असून सर्व युरोपखंडांत प्रसिद्ध व मान्य असें होतें. त्या राजघराण्याचा अभिमान बाळगणारे व त्याशीं सहानुभूति बाळगणारे अनेक राजपुरुष युरोपखंडांत होते. बोरबोन घराण्यांतील तत्कालीन राजा जो १६ वा लुई त्याचा वध झाल्यानंतर हे लोक फार संतप्त झाले व त्यांनीं एकत्र होऊन फ्रान्स देशावर हल्ले करण्यास सुरुवात केली. ह्या परशत्रूंस फ्रान्सांतील धर्मोपदेशक व मोठमोठे सरदार हे गुप्तपणें मदत करीत होते. अर्थात् तत्कालीन क्रांतीच्या सूत्रचालकांस या लोकांना कडक शासन करणें भाग पडलें. त्यामुळें देशांत यादवी सुरू झाली. या यादवीस अखेरीस फारच भयंकर स्वरूप प्राप्त होऊन सर्व देश अत्यंत त्रस्त होऊन गेला. देशांतील कर्त्या व विचारी पुरुषांची अंतःकलहाच्या होमांत सारखी आहुति पडत गेल्यामुळें परस्थांच्या हल्ल्यापासून व अंतःकलहाच्या त्रासांतून फ्रान्स देशास सोडवून त्यास सुखशांततेचा लाभ करून देणारा कोणी वाली उरला नव्हता. अशा वेळीं नेपोलियनसारखा देदिप्यमान तारा उदयास आला; व त्याच्या हातून आपलें अपेक्षित कार्य होईल असें दिसूं लागतांच तत्कालीन सत्ताधाऱ्यांनीं त्यास हातीं धरून एकामागून एक असे मोठमोठे अधिकार त्यास दिले. नेपोलियनच्या महत्वाकांक्षेला अशा प्रकारचें कांहीं तरी भव्य क्षेत्र पाहिजेच होतें. तें वरील संधीमुळें अनायासें मिळालें. या संधीचा योग्य उपयोग करून त्यानें तत्कालीन फ्रेंच राष्ट्राची अपेक्षा पूर्ण-

पणें सफळ केली. तेव्हां दिलदारपणाविषयीं जगाद्विख्यात असलेल्या फ्रेंच लोकांनीं त्याजवर खुष होऊन त्याला मोठ्या संतोषानें बादशहाच्या पदवीस नेऊन पोंचविलें! असें करण्यांत फ्रेंच लोकांची मोठीशी चूक झाली असें नाहीं. फ्रेंच राष्ट्रावर त्यानें तशाच प्रकारचे उपकार केले होते. त्या वेळीं नेपोलियनला जर हवे तसले अधिकार मिळाले नसते तर फ्रान्सचा तरणोपाय नव्हता. महत्प्रयासानें व अनेक बळी खर्चून फ्रेंच लोकांनीं राजकीय व सामाजिक विषमता नष्ट करण्याकरितां जी क्रांति केली, तिचीं त्यांच्या हातांत पडलेलीं फळें परराष्ट्रांकडून हिरावून घेतलीं जाण्याचा दृढ संभव होता. तो अनर्थ नेपोलियनच्या कर्तबगारीमुळें टळला. त्यामुळें फ्रेंच लोकांस अत्यंत आनंद होऊन नेपोलियनबद्दल फार कौतुक वाटूं लागलें. आणि या विकारवश मनोवृत्तीच्या भरांत त्यांनीं त्यास प्रथम डिक्टेटर ( सर्व सत्ताधीश ) व नंतर बादशहा केलें! नेपोलियननेंही कांहीं कालपर्यंत ह्या अधिकारांचें चांगलें चीज केलें. पण पुढें त्याचें मस्तक साम्राज्यमदानें धुंद झालें आणि तेथपासून त्याच्या वर्तनांत मोठमोठे दोष उत्पन्न होऊं लागले. बादशहाची पदवी प्राप्त झाल्यावर जर नेपोलियननें आपल्या आसुरी महत्वाकांक्षेस मर्यादित केलें असतें, तर पुढें त्याचा शोचनीय स्थितींत नाश झाला नसता, व ज्या फ्रेंच लोकांवर व राष्ट्रावर त्याचें निःसंशय निस्सीम प्रेम होतें, त्यांचें त्याच्या हातून विशेष कल्याण झालें असतें. परंतु त्याच्या चारित्र्याच्या द्वारें जगाला एक निराळाच घडा शिकविण्याचा परमेश्वरी संकेत होता

असें दिसतें. आणि त्या कारणानें नेपोलियनला योग्य वेळीं आपल्या महत्वाकांक्षेस आळा घालण्याचें भान राहिलें नाहीं. त्याचा परिणाम जसा व्हावयाचा तसाच झाला; पण त्या अनिष्ट व दुर्धर प्रसंगींही नेपोलियनच्या अंगच्या लोकोत्तर गुणांचें तेज चमकल्यावांचून राहिलें नाहीं. नेपोलियनच्या चालत्या काळांतील आयुष्यक्रमापेक्षां एका दृष्टीनें त्याचा ह्या पडत्या काळांतील आयुष्यक्रम विशेष रमणीय व कौतुकास्पद वाटण्याजोगा आहे. खुद्द नेपोलियनलाही तो तसाच वाटत असला पाहिजे, असें त्याच्याच तोंडच्या एका सुभाषितावरून दिसून येतें. तो म्हणतो:—

"High tragedy is the school of great men. It is the duty of sovereigns to encourage and spread it. Tragedy warms the soul, raises the heart, can and ought to create heroes."

(महद्विपदावस्था हीच थोर विभूतींची शिक्षण घेण्याची संस्था. उत्तेजन देऊन ही संस्था वाढविणें हेंच राजांचें कर्तव्य होय. आत्म्याचें उद्दीपन व अंतःकरणाचें उत्क्रमण करून विपदावस्था योद्धे प्रसवूं शकते; नव्हे, तिनें ते प्रसविलेच पाहिजेत, असा सिद्धांत आहे.)

असले धैर्यप्रचूर ज्याचे विचार त्याला--त्याच्या आत्म्याला— कोणतें संकट पादाक्रांत करूं शकणार आहे? अशा प्रकारची जी थोर विभूति तिच्या चारित्र्यापासून सामान्य जनतेस पुष्कळ बोध घेण्यासारखा असतो; आणि म्हणूनच आज हें चरित्र आम्हीं महाराष्ट्रवाचकवर्गापुढें ठेवीत आहों, त्याचा त्यांचेकडून सप्रेम आदर होवो, अशी इच्छा प्रगट करून लेखणी खालीं ठेवतों.

मिति, भाद्रपद शु. ८, शके १८३५. वा. दा. मुंडले.

# नेपोलियन बोनापार्त.

## अथवा

## आसुरी महत्त्वाकांक्षा.

### प्रकरण १ लें.

#### पूर्ववृत्तांत.

यूरोपखंडाच्या नकाशावर जर विहंगमदृष्टीनें नजर फेंकली तर फ्रान्स देशाच्या दक्षिणेस कॉर्सिका या नांवाचें एक बेट असलेलें दिसून येईल. ही आमच्या चरित्रनायकाची जन्मभूमि होय. ह्या कॉर्सिका बेटांतील अजाक्सिओ नामक शहरांत ता० १५ आगष्ट सन १७६९ रोजीं नेपोलियनचा जन्म झाला. त्याच्या बापाचें नांव चार्लेस बोनापार्त असून आईचें नांव मेरी लोत्झिया रामोलिनो असें होतें. ह्या कुटुंबाचा हा दुसरा पुत्र होय. याखेरीज या कुटुंबास आणखी बरींच मुलें होतीं, व त्या सर्वांना पुढें नेपोलियननें उच्च पदास चढविलेलें आहे. नेपोलियनचें घराणें मूळचें इताली देशांतलें होतें. यामुळें त्याच्या बापाच्या अंगीं इतालियन मनुष्याच्या अंगचे अनेक उपजत गुण होते. इ० स० १५२९ पासून नेपोलियनचे पूर्वज कार्सिका बेटांत वस्ती करून राहिले होते; व तेथें ह्या घराण्याची मानमान्यताही बरीच होती.

ह्या घराण्यांतील ५ पुरुषांनीं सदर बेटांतील कौन्सिलामध्यें मोठमोठ्या हुद्यांचीं कामें केलीं होतीं. नेपोलियनचें मातृघराणें तर याहूनही विशेष प्रख्यात व कर्तबगारांचें होतें. त्याची आई 'हजारांत एक' या प्रमाणांत देखणी होती. तिची एकंदर चर्या व बांधा पाहून कोणाच्याही मनावर तिची एकदम छाप बसत असे. ती अगदीं सरळ मनाची परंतु खंबीर अंतःकरणाची होती. तिनें आपल्या तारुण्यांत नानाप्रकारच्या आपत्ति मोठ्या धैर्यानें सोसल्या असल्यामुळें तिच्या कर्तबगार व प्रतिभासंपन्न मुलाच्या हालचालीनें तिच्या भोंवतालच्या परीस्थितींत जे अनेक बरे वाईट फेरबदल झाले, त्यांचा तिच्या मनावर कांहीं विशेष परिणाम घडला नाहीं. वैभवाचे वेळीं ती बेहोषही झाली नाहीं व वैभव नष्ट झाल्याचें पाहून खिन्नही झाली नाहीं. ती वीरमाता होण्यास पात्र आहे, अशा प्रकारचे उद्गार तिला पाहून कॉर्सिकाचा पुढारी पाओली यानें इ० स० १७९३ त काढले होते. नेपोलियनचा बापही चांगला देखणा व बुद्धिमान पुरुष होता. त्याला काव्य व अलंकार यांची विशेष गोडी होती. तसाच तो मोठा उधळ्या व दीर्घोद्योगी होता. कार्सिका बेटाच्या राज्यकारभारांत त्याचें अंग होतें. येथें ह्या बेटासंबंधीं थोडीशी माहिती देणें जरूर आहे. हें बेट प्रथम स्वतंत्र होतें. तें पुढें इटालीच्या ताब्यांत गेलें व नंतर फ्रान्सच्या ताब्यांत गेलें. परंतु आपलें स्वातंत्र्य मिळविण्याकरितां तें सतत प्रयत्न करीत होतें. ह्या बेटांत डोंगरांच्या रांगा असून त्यांच्या आसमंतात् दाट झाडी असलेलीं मोठमोठीं अरण्यें आहेत.

अशा ठिकाणचे लोक सामान्यतः काटक व शूर असतात. त्याप्रमाणें कार्सिकन लोकही होते. ह्या बेटांतून त्यांनीं आपल्या शत्रूबरोबर गनिमी काव्याचें युद्ध अनेक शतकेंपर्यंत चालविलें होतें. पाओली हा त्यांचा मुख्य पुढारी होता. त्यांच्या अंगच्या ह्या धाडसी वृत्तीमुळें त्या वेळीं सर्व युरोपखंड त्यांच्याकडे कौतुकाच्या दृष्टीनें पहात होतें. या लोकांची माहिती मिळवून त्यांच्या गुणांचें वर्णन करण्यास तत्कालीन युरोपियन प्रवाशांच्या लेखण्या एकमेकांशीं स्पर्धा करीत होत्या! अशा प्रकारच्या ह्या बेटामध्यें नेपोलियनचें बाळपण गेलें. अर्थात् या बेटांतील लोकांच्या शौर्याचे पोवाडे नित्य त्याच्या कानीं येत असल्यास त्यांत नवल कोणतें? शूरपणा, काटकपणा, मानीपणा, करारीपणा, दिलदारपणा, शत्रूंचा सूड घेण्याची उत्कट लालसा, व्यवस्थितपणा वगैरे जे कार्सिकन लोकांचे ठळक गुण ते नेपोलियनच्या अंगींही पूर्णपणें उतरले होते. तसेंच कॉर्सिका बेटांतील छोट्याशा देशभूमीबद्दलही त्याच्या मनांत उत्कट देशभक्ति वसूं लागली होती. ह्या भूमीच्या संरक्षणार्थ कांहीं कालापूर्वीं त्याच्या पित्यानें तेथील लोकांस उद्देशून काढलेला जाहिरनामा व त्यानंतर झालेल्या युद्धांत राष्ट्रीय सेनेबरोबर त्याच्या मातेला डोंगरांत व अरण्यांत काढावा लागलेला पळ वगैरे हकीकती जेव्हां त्याच्या कानावर आल्या, तेव्हां तर त्याची ती देशभक्ति जास्तच प्रज्वलित झाली. परंतु कांहीं कालपर्यंत ह्या गोष्टी मनांतल्या मनांत दाबून ठेवणें त्यास भाग पडलें. कारण कॉर्सिकन राष्ट्र त्या वेळीं परतंत्र व दीन झालें होतें. तेथील

लोकांनीं जरी गनिमी काव्याचा अवलंब करून फ्रेंच राजसत्तेशीं बराच काल झुंज चालू ठेविली होती, तरी अखेरीस १४ व्या लुईच्या सामर्थ्यापुढें त्यांस हात टेकावे लागले! त्यानंतर त्या बेटावर फ्रेंच व्हॉइसरायाची नेमणूक झाली. तेथें फ्रेंचांचा पूर्ण अंमल बसल्यानंतर नेपोलियनच्या वडिलांनीं फ्रेंच व्हॉइसरायाचा आश्रय संपादिला.[1] आणि त्याच्या साह्यानें त्यांनीं नेपोलियनास फ्रान्स देशांतील ब्रेने नामक शहरांतील सरकारी लष्करी शाळेंत घातलें. याप्रमाणें नेपोलियनचा फ्रान्स देशांत प्रवेश झाला खरा, पण त्याचें मन फ्रान्सविषयीं शुद्ध नसल्यामुळें त्याला तेथें समाधान वाटेना. कॉर्सिकन लोकांचा फ्रेंच राष्ट्रानें विनाकारण छळ केला, अशी त्याची समजूत असल्यामुळें आणि फ्रेंच लोकांचें जूं झुगारून देणें हें कॉर्सिकन देशभक्तीचें मुख्य तत्व त्याच्या मनांत बाणल्यामुळें फ्रान्स देशांत त्याला खुल्या दिलानें वागतां येईना. उलटपक्षीं, तो परस्थ व जित राष्ट्रांतील असल्यामुळें फ्रान्सांतल्या लष्करी शाळें-तील विद्यार्थी त्याच्याशीं फटकून, किंबहुना गुर्मीनें वागत असत. यामुळें तो फारसा त्यांशीं मन मोकळें करून बोलत नसे, अगर त्यांच्यांत फारसा मिसळत नसे. या वेळीं त्याची स्थिति शेक्स-पियरनें वर्णिलेल्या आपत्कालांतील **'टायमन ऑफ अथेन्स'**प्रमाणें खिन्न व उदासवाणी अशी होती. परंतु ह्या औदासीन्याचा त्याच्या

---

१ नेपोलियनला कळूं लागल्यावर त्यानें आपल्या वडिलांच्या ह्या कृत्याचा 'Base desertion' म्हणून तीव्र निषेध केला. या वेळीं त्याचें वय सुमारें १५।१६ वर्षांचें असावें.

शिक्षणक्रमावर मात्र कोणताही अनिष्ट परिणाम घडला नाहीं. उलट, त्यामुळें त्यांत त्याची विशेष प्रगति मात्र झाली. नेपोलियनला लष्करी शाळेंत जें त्याच्या बापानें पाठविलें, तें त्याची स्वाभाविक प्रवृत्ति पाहूनच पाठविलें. अजाक्किओ येथील प्राथमिक शिक्षणाच्या शाळेंत असतांना त्यानें पुष्कळ प्रकारांनी आपली लष्करी पेशाची आवड व्यक्त केली होती. या काळांत न्याहारीचे वेळीं कित्येक वेळां त्यानें मालिद्याच्या रोटीऐवजीं जाडीभरडी भाकर मुद्दाम खावी; आणि म्हणावें कीं, शिपाईगडी बनण्याकरितां मला एव्हांपासूनच तयारी केली पाहिजे. त्याच्या ह्या व अशाच प्रकारच्या अनेक उद्गारांवरून त्याचा कल स्पष्ट दिसत होता; आणि तो पाहून त्याच्या बापानें त्यास ब्रेने येथील लष्करी शाळेंत पाठविलें. तेथील अभ्यासक्रम पुरा झाल्यावर त्यास आरमारी खात्यांत घालण्याचा त्याचा विचार होता. परंतु नेपोलियनच्या इच्छेवरून त्यास तो विचार सोडून द्यावा लागला. आरमारापेक्षां तोफखाना नेपोलियनला विशेष आवडला. कारण त्या काळच्या युद्धांत तोफखान्याचें महत्व फार वाढलें होतें. एखाद्या अचाट अगर बुद्धिमान योद्ध्याला आपलें बौद्धिक तेज अगर कर्तबगारी किंवा हस्तलाघव प्रगट करण्यास तोफखाना हें एक अत्युत्तम साधन त्या वेळीं होतें. आणि म्हणून नेपोलियनचा स्वाभाविकपणेंच तिकडे ओढा होता. ब्रेने येथील अभ्यासक्रम ५ वर्षांचा होता व तो नेपोलियननें इ० स० १७८४ च्या सुमारास संपविला. ह्या ५ वर्षांच्या काळांत त्यानें गणितविषयांत विलक्षण

यश मिळविलें. इतिहास-भूगोल या विषयांतही त्यानें चांगलें प्राविण्य संपादन केलें. प्लूटार्कनें लिहिलेलीं रोमन विभूतींचीं चरित्रें व सीझरचीं ' कॉमेंटरीज' हे दोन ऐतिहासिक ग्रंथ त्याच्या फार आवडीचे होते. तो ज्या वेळीं फ्रान्समध्यें आला, त्या वेळीं त्याला फ्रेंच भाषा धड समजतही नव्हती व बोलतांही येत नव्हती; परंतु ह्या ५ वर्षांत त्या भाषेचा त्यानें इतका सुंदर अभ्यास केला कीं, त्या भाषेंत स्फूर्तिदायक व मनोवृत्ति उचंबळून टाकणारे परंतु व्यवस्थित असे लहान मोठे प्रबंध तो लिहूं लागला! याखेरीज विस्तृत वाचन, दीर्घोद्योग, लष्करी योजना व तत्संबंधीं नकाशे आणि अनुमानें काढून त्यांची वाटाघाट करणें यांत तो सारखा गढून गेलेला असे. याप्रमाणें ब्रेने येथील लष्करी शाळेंत ५ वर्षें काढल्यावर तो पारीस येथील लष्करी शाळेंत गेला. तेथें एक वर्ष-पर्यंत तो होता. या शाळेंतही त्याची वागणूक ब्रेने येथल्या शाळेंतील वागणुकीप्रमाणेंच होती. ह्या लष्करी शाळेंत मोठमोठ्या सरदारांचीं मुलें होतीं. अर्थात् त्यांची राहणी अंमळ थाटाची होती. परंतु लष्करी आयुष्यक्रमाची उमेदवारी करणारांनीं अशा प्रकारें चैनींत राहणें दोषास्पद आहे, असें नेपोलियननें मोठ्या धीटपणानें शाळेच्या अधिकाऱ्यांस कळविलें! या शाळेंत १ वर्ष काढल्यानंतर नेपोलियनला ला फेरे येथील रिसाल्याच्या तोफ-खान्यांत सब् लेफ्टेनंटची जागा मिळाली. (इ. स. १७८५.) या वेळीं त्याचें वय अवघें १६ वर्षांचें होतें. याच वर्षीं त्याचा बाप वारला. आपल्या बापाच्या मृत्यूसंबंधानें त्यानें आपल्या आईस जें

पत्र लिहिलें आहे, तें एखाद्या प्रगल्भ व वयोवृद्ध मनुष्यास शोभण्यासारखें आहे. नेपोलियनच्या अंगीं वस्तुतः पोरकटपणा फारसा नव्हताच म्हटलें तरी चालेल. त्याच्या वयाच्या १४ व्या वर्षाच्या सुमारास त्याची विचारशक्ति व निर्णायकशक्ति विकास पावली होती अशीं उदाहरणें आहेत. आपल्या वडील भावाच्या गुणदोषांचें यथायोग्य निरीक्षण करून त्यानें कोणता पेशा स्वीकारावा हें आपल्या वयाच्या १५ व्या वर्षींच त्यानें आपल्या बापास कळविलें! नोकरींत शिरल्यानंतर सुमारें एक वर्षानें रजा घेऊन नेपोलियन आपल्या जन्मभूमीस आपल्या मातोश्रीस भेटण्याकरितां आला. त्याच्या पूर्वीं सुमारें दहा वर्षांत त्याची व तिची भेट झाली नव्हती. त्याचा बापही नुकताच परंतु तो दूर असतांना वारला होता. अशा परिस्थितींत त्या मायलेकरांची गांठ पडतांच उभयतांच्या मनांची काय स्थिति झाली असेल, ती ताडण्याचें काम आम्ही वाचकांच्या कल्पनाशक्तीवरच सोंपवितों. या वेळीं नेपोलियनची स्थिति अगदीं निकृष्ट होती. त्याचा बाप तर वारलेलाच होता; आणि ज्या फ्रेंच अधिकाऱ्यांनीं त्याच्या कुटुंबास आश्रय दिला होता तेही वारले होते. त्याच्या आईवर त्याचीं लहान भावंडें पोसण्याचा बोजा आल्यामुळें पैशाचे बाबतींत तिची फार ओढाताण झाली होती. त्याचा स्वतःचा पगार दर आठवड्यास १७ शिलिंग ६ पेन्स इतका होता. आणि तत्कालीन लष्करी नोकरीच्या शिरस्त्याप्रमाणें पहातां त्याची कॅप्टनच्या जागीं नेमणूक होण्यास १२ वर्षांचा अवधि होता. या पेशांत त्याची

बढती कितीही झाली असती, तरी त्यामुळें त्याची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा फारसा संभव नव्हता. परंतु या अडचणी पाहून नेपोलियन हताश झाला नाहीं; उलट त्यांशीं नेटानें झगडण्याचा त्यानें निश्चय केला. थोर पुरुषांवर जों जों संकटें अधिक, तों तों त्यांचें धैर्य समुद्राच्या भरतीप्रमाणें एकसारखें वाढत जातें, असा सामान्य नियम आहे; आणि लहानपणापासून तों मरेपर्यंत नेपोलियनच्या चारित्र्यांत ह्या नियमाचें प्राबल्य विशेषच दिसून येतें. या आपत्कालामुळें नेपोलियनच्या ठिकाणीं सावधानता, आत्मसंयम, काटकसर आणि सारासारविवेक इत्यादि गुणांचा प्रकर्ष होत गेला. 'आपत्काल ही सद्गुणांची जननी आहे' असें जें एका थोर पुरुषाचें वचन आहे तें अगदीं खरें आहे, असें नेपोलियनसारख्याच्या चरित्रावरून स्पष्ट कळून येणार आहे.

नेपोलियन आपली रजा संपल्यानंतर पुन्हा फ्रान्समध्यें आपल्या जागेवर येऊन हजर झाला. त्यानंतर सुमारें ७ वर्षेंपर्यंत तो निरनिराळ्या लष्करी ठाण्यांवर सब् लेफ्टेनंटच्या जागेवर होता. ह्या कालांत त्याचें नोकरीचें काम फार सोपें असून त्याला वारंवार मोठमोठ्या मुदतीच्या रजाही मिळत असत. अर्थात् त्यामुळें आपली वाचनाची व ज्ञानार्जनाची लालसा तृप्त करून घेण्यास त्यास आयतेंच फावलें. ह्या कालांत त्यानें कायदा, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, राजकारण इत्यादि विषयांवरचे सर्व प्रमुख ग्रंथ वाचून घेतले. ह्या ग्रंथांसंबंधानें त्यानें लिहून ठेवलेलीं टांचणें अद्याप अस्तित्वांत आहेत. त्यांवरून नेपोलियनच्या धारणाशक्तीची व

निरीक्षणपद्धतीची चांगली कल्पना होण्यासारखी आहे. या वेळीं फ्रान्समध्यें 'फिलॉसोफर्स' या नांवानें प्रसिद्ध असलेलें एक लेखकमंडळ होतें. त्यांत होल्तेअर, रुसो, रेनाल, तुरगात वगैरे मंडळी प्रख्यात होती. त्यांच्याच ग्रंथांनीं, फ्रान्समध्यें विचार-क्रांतीस सुरवात करून अखेरीस राज्यक्रांति घडवून आणली. ह्या ग्रंथांतील उदार व मनोवृत्ति प्रज्वलित करणारे विचार नेपोलियनला फार आवडले. रुसो आणि रेनाल यांचा तर तो अत्यंत चाहता बनला. प्लुटार्कचीं चरित्रें त्याला फार आवडत असत म्हणून मागें सांगितलेंच आहे. त्याच्या चरित्रांशीं तो इतका तादात्म्य पावत असे कीं, जणुं काय आपण त्यांतलीच एक विभूति आहों, अशी भावना त्यास वारंवार होत असे! साम्राज्यसंबंधाची कल्पना व तज्जन्य महत्वाकांक्षा त्याच्या मनांत उद्भवण्यास बुझो याचा 'डिस्कोर्स अपॉन युनिव्हर्सल हिस्ट्री' हा ग्रंथ कारणीभूत झाला. या ७ वर्षांच्या काळांत तो वाचनांत व आपल्या लष्करी धंद्यांत इतका गढून गेला होता कीं, त्याला वेळ पुरत नसे! इ. स. १७८८ मध्यें त्यानें आपल्या आईला जें पत्र लिहिलें आहे त्यांत तो म्हणतो, "मी रात्रीं १० वाजतां निजतों व पहाटे ३ वाजतां उठतों. आणि फक्त दुपारीं ३ वाजतां एकदां जेवतों[1]; कामावांचून माझा एक क्षणही जात नाहीं." वरील ग्रंथकारांचे ग्रंथ वाचून नेपोलियनची धर्मश्रद्धा नष्ट

---

१ हा उल्लेख मुख्य जेवणासंबंधानें असावा. या जेवणाखेरीज चहा व रोटीची सकाळची न्याहारी होत असावी, असें वाटतें.

झाली होती; व स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यासंबंधाच्या उदात्त कल्पना त्याचे मनांत पूर्णपणें भरल्या होत्या. तथापि त्यांमुळें तो बेहोष होऊन जाण्याचा मात्र संभव नव्हता. कारण त्याची मनोरचना निराळ्या प्रकारची होती. केवळ कल्पनेच्या वातावरणांत विहार करणारा तो नव्हता. तो मोठा हिशोबी, व्यवहारदक्ष व चाणाक्ष असून कोणत्याही कल्पनेमध्यें व्यवहार्य भाग किती व अव्यवहार्य किती, याचा आपल्या मनाशीं नित्य विचार करणारा होता. कोणत्याही विषयाची सांगोपांग माहिती करून घेण्याचा त्याचा हव्यास दांडगा होता. ऐतिहासिक प्रसंगांचें पृथक्करण केल्यावांचून व भूगोलसंबंधीं सूक्ष्म माहिती मिळविल्यावांचून त्याचें समाधानच होत नसे. त्याची कल्पनाशक्ति जाज्वल्य होती, परंतु त्याची मनोरचना कल्पनावश नव्हती; ती व्यवहारानुकूल व वस्तुस्थितीकडे धांव घेणारी अशी होती. यामुळें त्याला कोणत्याही परिस्थितीचा बरोबर अंदाज करतां येऊन तीस अभियुक्त अशी कृति करतां येत असे. मोठमोठ्या पंडितांच्या विचाराशीं त्याला तादात्म्य होतां येत असे, तरी तो स्वतः पंडित बनला नाहीं व तसें बनण्याची त्याला इच्छाही नव्हती. नुसत्या पांडित्यापेक्षां--काल्पनिक स्वप्नांत गुंग होण्यापेक्षां--प्रत्यक्ष कर्तृत्व करून दाखविण्याची प्रवृत्ति त्याचे ठायीं असल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं. तथापि ही प्रवृत्ति प्रकट होण्यास अद्याप अवकाश होता. कारण त्यास अनुकूल अशी संधी अद्याप यावयाची होती. व तो काल येईपर्यंत नेपोलियननें आपला वाचनाचा उद्योग तसाच चालू ठेवला होता. 'इतिहास'



नेपोलियनची ( महत्वाकांक्षी ) माता.

हा त्याचा आतां अत्यंत आवडता विषय बनला होता. इतिहास म्हणजे केवळ गतकालीन गोष्टींची हकीकत नसून सत्य व नीतिशास्त्र यांचा तो आधारस्तंभ आणि अनेक दुराग्रहांचें निर्मूलन करण्याचें तें एक साधन आहे, अशी त्याची समजूत होती. त्यानें स्वतः या वेळीं कॉर्सिका बेटाचा एक इतिहास लिहिण्याचा बेत योजून त्या विषयावर त्यानें अनेक पत्रें व टांचणें लिहून ठेवलीं. असा त्याचा उद्योग सुरू असतां इ० स० १७८९ मध्यें फ्रान्सदेशांत राज्यक्रांतीस सुरवात झाली. तेव्हां आपल्या बेटांतील लोकांस स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां रजा घेऊन वरील सालच्या सप्टेंबर महिन्यांत तो आपल्या जन्मभूमीस आला. अजाक्सिओ येथें फ्रेंच राजसत्तेस विरोध करणारा एक पक्ष अगोदरच अस्तित्वांत आलेला होता. त्या पक्षाचा नेपोलियन हा पुढारी बनला. पुढें लवकरच फ्रान्सच्या लोकसत्ताक सरकाराकडून कॉर्सिकन लोकांस स्थानिक स्वातंत्र्य मिळून त्यांचा पूर्वींचा राजा जो पाओली त्याचे हातीं कॉर्सिका बेटाचीं राज्यसूत्रें आलीं. पाओली हा जरी लोकस्वातंत्र्याचा भोक्ता होता, तरी राजकीय हक्कांकरितां अत्याचार करण्याची प्रवृत्ति त्यास पसंत नव्हती. परंतु फ्रान्सची राज्यक्रांति सुरू झाल्यानंतर पुढें जेव्हां त्या देशांत जॅकोबिन नामक ज्वलत् जहाल पक्षाचें प्राबल्य वाढलें, तेव्हां तेथें Reign of terror ( दंडुक्याचें राज्य ) सुरू होऊन अत्याचार सुरू झाले. त्याचा पाओली व त्याचे अनुयायी यांनीं निषेध केल्यावरून तत्कालीन फ्रेंच सरकारच्या रोषास ते पात्र झाले. अर्थात्

त्याचें पारिपत्य करण्याचा प्रयत्न फ्रेंच सरकारनें केला. त्या वेळीं नेपोलियन हा फ्रेंच सरकारचा नोकर असल्यामुळें त्याच्याविषयीं **पाओली** व त्याचें अनुयायिमंडळ यांच्या मनांत किंतु उत्पन्न होऊन त्यांनी त्याला सहकुटुंब हद्दपार केलें ! या वेळीं नेपोलियनच्या कुटुंबाचे ( त्याची आई व भावंडें यांचे ) फार हाल झाले. परंतु सुदैवानें त्यांना एका फ्रेंच बोटीचा आश्रय मिळाल्यामुळें ते ता० १३ जून सन १७९३ मध्यें फ्रान्सच्या दक्षिण किनाऱ्यावरील **तुलोन** बंदरांत येऊन दाखल झाले. या वर्षीं फ्रान्सच्या राज्यक्रांतींत एक नवीन स्थित्यंतर घडून आलें आणि त्यामुळें नेपोलियनला आपल्या कर्तबगारीचें तेज प्रगट करण्यास अवकाश सापडून तो पुढें हळुहळू फ्रेंच सरकारच्या व लोकांच्या गळ्यांतला ताईत बनत गेला ! तो कसा, हा रम्य कथाभाग पुढील प्रकरणांत सांगू.

---

## प्रकरण २ रें.

### भाग्योदयास प्रारंभ.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें नेपोलियन जेव्हां **तुलोन** बंदरांत आपल्या कुटुंबासह येऊन पोंचला, तेव्हां त्याची स्थिति फार चमत्कारिक होती. कॉर्सिकन लोकांच्या चळवळींत पडल्यामुळें त्याला वेळवर आपल्या नोकरीच्या जागीं हजर होतां आलें नाहीं. त्यामुळें त्याचें नांव नोकरींतून कमी करण्यांत आलें होतें.

त्याच्याजवळ व त्याच्या आईजवळ म्हणण्यासारखा पैसाही नव्हता. अशा विपन्न स्थितींत दिवस कंठीत असतां, त्याचा भाग्योदय करून देणारा पुढील प्रसंग एकाएकीं येऊन ठेपला तो असाः—

फ्रान्समध्यें ह्या वेळीं ' दंडुक्याचें राज्य ' माजलें होतें म्हणून मागें सांगितलेंच आहे. तेथील जॅकोबिन पक्षाचा पुढारी **रॉबिस्पियर** याच्या हातीं फ्रान्सच्या राज्यकारभाराचीं सूत्रें होतीं. या पक्षानें अत्याचार, रक्तपात व लोकक्षोभ करून राजसत्ता बळकाविली होती. त्यानें राजा व राणी यांचा वध करून आपल्या प्रतिपक्षाच्या लोकांची बेहाय कत्तल उडविली होती. यामुळें देशांत अंतःकलह उत्पन्न होऊन बंडाळी माजली. इकडे, फ्रान्सच्या बोरबोन राजघराण्याचे आप्तइष्ट व मित्र असलेले **आस्ट्रिया, जर्मनी** व **इंग्लंड** येथील राजेही जॅकोबिन पक्षाच्या वरील अत्याचारामुळें चिडून गेले व त्यांनीं एकत्र होऊन फ्रान्सवर हल्ले सुरू केले होते. एकीकडे अत्याचार व रक्तपात यांस उत्तेजन देणारें सरकार व एकीकडे फ्रान्सचे तुकडेतुकडे करून टाकण्यास प्रवृत्त झालेलीं परराष्ट्रें यांच्या कचाट्यांतून फ्रान्स देशाला सोडविण्याचें काम फार मुष्किलीचें होतें. परंतु नेपोलियन हा चाणाक्ष व बुद्धिमान असल्यामुळें त्यानें या वेळीं " Souper de Beaucaire " या नांवाचें एक पत्रक प्रसिद्ध करून फ्रेंच लोकांनीं या वेळीं एका दिलानें स्वदेशांतील सरकारासच मदत करणें योग्य आहे असें प्रतिपादिलें. रॉबिस्पियर व त्याचा पक्ष यांनीं केलेलीं अघोर व बेशिस्त कृत्यें नेपोलियनला बिलकुल पसंत नव्हतीं. उलट ज्या

ज्या वेळीं तीं कृत्यें घडलीं, त्या त्या वेळीं त्यानें त्यांबद्दल आपला निषेध व तिरस्कार व्यक्त केला होता. असें असूनही त्यानें वरील पत्रकांत रुधिरप्रिय अशा सरकारची बाजू जी उचलून धरली, ती एवढ्याचकरितां कीं, परस्थांची गुलामगिरी पत्करण्यापेक्षां स्वदेशांतील सरकारास चिकटून राहिल्यास पुढें मागें त्या सरकारच्या रचनेंत आपणास योग्य ती सुधारणा करतां येईल, असें त्यास वाटत होतें. नेपोलियनच्या भावी कालांतील उद्दीपक, गंभीर, वक्तृत्वपूर्ण आणि तेजस्वी विचारसरणीची साक्ष त्याच्या ह्या पत्रकांतही जागोजाग पटण्यासारखी आहे. नेपोलियनचें हें पत्रक प्रसिद्ध झालें, तेव्हां फ्रान्सच्या पश्चिम व दक्षिण भागांत बंडें सुरू होतीं व दक्षिण किनाऱ्यावरील **तुलोन** बंदरांत ब्रिटिश आरमारानें प्रवेश करून १७ व्या लुईच्या (फ्रान्सच्या माजी राजाचा पुत्र) नांवाचा बावटा उभारला होता.या वेळीं फ्रेंच सरकारला परस्थांशीं तोंड देण्यास हुषार सेनानायकाचें साहाय्य पाहिजे होतें. त्यांनीं बरेंच मोठें सैन्य तुलोन शहरास वेढा घालण्याकरितां पाठविलें होतें, परंतु त्या सैन्यांत हुषार व बाकबगार असा कोणी सेनापति नसल्यामुळें वेढ्याचें काम नीट जमेना. या वेळीं नेपोलियन तुलोन शहरानजीक होता. हें पाहून त्याची हुषारी जाणणाऱ्या कांहीं लोकांनीं सदर सैन्याचा सेनापति **कारत्युक्स** याजपाशीं त्याची शिफारस केली, व या प्रसंगीं त्याचा आपणांस पुष्कळ उपयोग होईल म्हणून सांगितलें. **कारत्युक्स** हा स्वतः कांहीं लढवय्या नव्हता. तो मूळचा चितारी असून देशांत लष्करी कायदा सुरू

असल्यामुळें सैन्याचा अधिकारी बनलेला होता. अर्थात् त्याला वरील लोकांनीं केलेली शिफारस व सूचना पसंत पडली व त्यानें नेपो-लियनला आपल्या सैन्याचा दुय्यम अधिपति नेमून वेढ्याचें सर्व काम त्याजकडे सोंपविलें. याप्रमाणें सैन्याचें आधिपत्य प्राप्त होतांच नेपोलियननें सर्व परिस्थितीचें एकवार सूक्ष्म निरीक्षण केलें व वेढा यशस्वी करून तुलोन शहर काबीज करण्याचा एक सुलभ मार्ग त्यानें काढला. त्यानें काढलेली युक्ति त्याच्या हातखालच्या अधि-काऱ्यांस यशाच्या दृष्टीनें इतकी खात्रीची वाटली कीं, त्यांनीं तत्काल तिचें अवलंबन करण्याचें ठरवून त्याबद्दल नेपोलियनचें कौतुकानें अभिनंदन केलें. तीन महिने सतत परिश्रम करून थोड्याशा सैन्याच्या व तोफांच्या साह्यानें नेपोलियननें आपली युक्ति—योजना—सफळ करून दाखविली ! त्यानें एका नाजुक ठिकाणीं हल्ला करून शत्रूचें आरमार व सैन्य यांस तुलोन बंदरां-तून पळ काढावयास लावलें व अशा रीतीनें परराष्ट्रांपासून फ्रान्स-वर आलेलें संकट त्यानें दूर केलें. या वेढ्याच्या कामांत नेपो-लियनचें लष्करी कौशल्य अगदीं ठळकपणें लोकांच्या नजरेस आलें; आणि तेव्हांपासून फ्रान्सच्या सैनिकांवर व शिपायांवर त्याची एक-सारखी छाप बसत चालली. हा विजय संपादन केल्याबद्दल रॉबि-स्पियरनें त्याचें अभिनंदन करून त्यास ' ब्रिगेडियर जनरल ' या थोर पदास चढविलें. त्यानंतर किनाऱ्यावरील परगण्यांतलीं लष्करी ठाणीं दुरुस्त करण्याचें काम त्याजवर सोंपविण्यांत आलें व तें त्यानें कांहीं थोड्या महिन्यांच्या अवधींत संपवून टाकलें. पुढें

इ. स. १७९४ तील उन्हाळ्यांत त्यास इताली देशांतील फ्रेंच सैन्यास मदत करण्याकरितां **जिनोवा** येथें पाठविण्यांत आलें. या सेनेचा मुख्य अधिपति **मासेना** नामक हुषार व लढवय्या पुरुष होता. परंतु नेपोलियननें तत्काळ त्याच्यावर आपली छाप बसविली, व या युद्धांतील सर्व लहान मोठ्या लढाया नेपोलियनच्या योजनेनुसार घडून आल्या. याच युद्धांत नेपोलियनला इताली देशाची पूर्ण माहिती करून घेण्याची संधी सापडली व त्या संधीचा योग्य उपयोग करून त्यानें इटलींतील आपल्या भावी स्वारीची एक विस्तृत व खुबीदार योजना तयार केली. युद्धकला व लष्करी डावपेंच यांच्या दृष्टीनें पहातां नेपोलियनची ही योजना सर्वोत्तम असून त्याच्या उज्ज्वल प्रतिभाशक्तीची साक्ष पटविणारी आहे, असें तज्ज्ञांचें मत आहे. नेपोलियन इताली देशांतून परत येण्याच्या सुमारास फ्रेंच कन्व्हेन्शन्नें रॉबिस्पियरचा वध करविला होता. त्यामुळें फ्रेंच सरकारच्या अधिकारी वर्गांत मोठाच फेरबदल झालेला होता. नेपोलियननें आजपर्यंत रॉबिस्पियरची इमानें इतबारें नोकरी बजावली असल्यामुळें नवीन अधिकृत राजकर्त्यांस त्याचा संशय येऊन त्यांनीं त्यास मुद्दाम देशांतील पश्चिम भागांतली बंडाळी मोडण्याच्या कामगिरीवर नेमलें. ही जागा हलक्या दर्जाची असल्यामुळें नेपोलियननें पत्करली नाहीं. त्यावरून पुन्हा एकदां लष्करी नोकरींतून त्यास कमी करण्यांत आलें. त्यास तुरुंगांत अडकवून ठेवून त्याजवर खटला करण्याचाही प्रयत्न करण्यांत आला. परंतु या बाबतींत

ग्रं. क्र.

अधिकारी वर्गांत मतभेद झाल्यामुळें नेपोलियनची लवकरच सुटका होऊन अंशतः त्याचें अभिनंदनही करण्यांत आलें. तथापि आपली नोकरी गेल्यामुळें मोठमोठे दिग्विजय करण्याची आपली महत्वाकांक्षा जागचे जागीं जिरणार, असें पाहून त्याचें मन अंमळ उदास झालें. परंतु तो कांहीं कच्च्या दिलाचा नव्हता. त्यानें फिरून एकदां लष्करांत शिरण्याची एक नवी क्लृप्ति काढली. तुर्कस्थानांतील सैन्याची पुनर्घटना करण्याचें काम या वेळीं फ्रेंच सरकारनें सुरू केलें होतें. त्या कामीं आपली नेमणूक व्हावी म्हणून नेपोलियनें तत्कालीन अधिकाऱ्यांकडे अर्ज केला. त्या अधिकाऱ्यांत **बॅरास** या नांवाचा एक गृहस्थ नेपोलियनचा चाहता होता; त्याच्या प्रयत्नामुळें नेपोलियनचा सदर अर्ज मंजूर झाला. पुढें तो **कॉन्स्तांतिनोपल** येथें जाण्यास निघणार, इतक्यांत **पॅरिस** येथें एक विलक्षण गोष्ट घडून आली; आणि तीमुळें नेपोलियनच्या आयुष्यक्रमास निराळीच गति मिळाली. तो विलक्षण प्रसंग असाः—रॉबिस्पियरचा नाश झाल्यानंतर लवकरच फ्रेंच नॅशनल कन्व्हेन्शननें फ्रेंच राष्ट्राकरितां एक नवीन शासनपत्रिका ( Coustitution ) तयार करून त्याअन्वयें 'डायरेक्टरी' या नांवाची एक नवीन शासनपद्धति निर्माण केली. या पद्धतीप्रमाणें फ्रान्समध्यें 'Council of Ancieuts व Council

१ फ्रान्सच्या राज्यक्रांतीला तेथील राजघराण्याची आहुति पडल्यानंतर फ्रान्सकरितां निराळी शासनपद्धति निर्माण करण्यास व ती तयार होऊन अंमलांत येईपर्यंत फ्रान्सची राज्यसूत्रें चालविण्यास जी एक लोकनियुक्त संस्था स्थापली गेली, तिला 'नॅशनल कन्व्हेन्शन' असें म्हणत.

of five hundred या नांवाच्या दोन राजसभा निर्माण व्हावयाच्या होत्या. पैकीं पहिली वडद्या लोकांची असून दुसरी सामान्य लोकांकरितां होती. ह्या दोन्ही सभांतील सभासदांची निवडणूक स्वतंत्रपणें व्हावी असें लोकमत होतें; परंतु माजी कन्व्हेन्शननें आपल्यापैकीं दोनतृतीयांश सभासद ह्या नवीन राजसभेंत समाविष्ट करण्याचा नियम केला होता. तो जनतेला आवडण्यासारखा नव्हता. कारण ह्या लोकांच्या रुधिरप्रिय व जुलूम-जबरदस्तीच्या राज्यपद्धतीस लोक कंटाळलेले होते. त्यांना आतां स्वास्थ्य व शांतता प्राप्त करून देणारी शासनपद्धति पाहिजे होती; व माजी कन्व्हेन्शनचे दोनतृतीयांश सभासद जर नवीन स्थापन होणाऱ्या राजसभेंत घुसतील तर फिरून पूर्वींचीच अस्वस्थतेची व भयप्रद स्थिति प्राप्त होईल अशी त्यांस भीति वाटत होती. म्हणून सदर नियम हाणून पाडण्याकरितां पॅरिसच्या जनतेनें बंड उभारलें. ह्या बंडांत पॅरिसच्या नाणावलेल्या नॅशनल गार्डांचेही ३०,००० लोक सामील झाले ! याप्रमाणें देशामध्यें फिरून यादवी ( Civil war ) माजण्याचीं व फ्रेंच सरकारची सत्ता कमकुवत होण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं. अशा आणीबाणीच्या वेळीं फ्रेंच सरकारनें सदर बंड मोडण्याचें कामीं नेपोलियनची नेमणूक केली. नेपोलियनला जेव्हां सरकारनें प्रथमतः ही गोष्ट कळविली, तेव्हां तो कांहीं वेळ थोडासा कचरला; परंतु थोडा वेळ आपल्या मनाशीं विचार केल्यानंतर त्यानें ती कामगिरी पत्करली. या बाबतींत प्रथमतः नेपोलियन जो कचरला, तो अशाकरितां कीं, बंडवाल्यांमध्यें त्या वेळीं

राष्ट्रांतील अगदीं शेलके व उमदे लोक सामील झालेले होते. त्यांचा नाश करून जरी जय मिळाला, तरी त्या जयापासून आनंद मानण्यास फारशी जागा नव्हती. दुसरी गोष्ट अशी की, स्वदेशांतील लोकांशीं लढण्यापेक्षां त्यांना हातीं धरून परस्थ शत्रूंचा गंडमोड करण्याची नेपोलियनची विशेष इच्छा होती. याखेरीज तिसरें कारण असें कीं, सरकारचीं—कन्व्हेन्शनचीं—अनेक कृत्यें नेपोलियनला मनापासून आवडत नव्हतीं. परंतु या वेळीं सदर बंड मोडून सरकारची सत्ता जर खंबीर केली नाहीं, तर पुढें काय काय अनर्थ ओढवतील, यांचा जेव्हां तो आपल्या मनाशीं विचार करूं लागला, तेव्हां त्याच्या डोळ्यांपुढें एक भयंकर चित्र उभें राहिलें. बंडवाल्यांचा विजय झाल्यास पुन्हा अराजक व बेबंदशाही माजण्याचा संभव त्यास दिसूं लागला! आणि तसें झाल्यास जर्मनी, आस्ट्रिया वगैरे परस्थ शत्रूंस फ्रान्सवर हल्ला करून क्रांतीचे इष्ट परिणाम नष्ट करण्यास आयतेंच फावणार. असें होणें म्हणजे फ्रान्सवर राष्ट्रीय मृत्यूची छाया पडण्यासारखेंच होतें. हा अनिष्ट प्रसंग टाळणें हें आपलें विशेष महत्वाचें कर्तव्य आहे, असें आपल्या मनाशीं नेपोलियननें ठरविलें व नंतर सदर बंड मोडण्याचा कामगिरी पत्करली. त्याच्या या कृतीबद्दल त्याजवर स्वार्थपरतेचा आरोप करून पुष्कळांनीं त्याची निंदा केलेली आहे. परंतु सर्व गोष्टींचा साधकबाधक विचार केल्यास सदर निंदेस तो पात्र नाहीं, असेंच म्हणावें लागेल. वरील कामगिरी पत्करण्यांत नेपोलियन केवळ परोपकारबुद्धीनें वागला,

असें जरी म्हणतां येणार नाहीं—कारण त्यामुळें त्याची महत्वाकांक्षा सफळ होण्याचा मार्ग सुकर झाला---तरी व्यवहारदृष्टया त्याजवर नीचपणाचा अगर देशद्रोहीपणाचाही आरोप लादतां येणार नाहीं. नेपोलियनचें कोणतेंही कृत्य **शिवाजी** अगर **वॉशिंगटन** यांच्या इतक्या नीतीच्या उच्च कसोटीस उतरणार नाहीं; परंतु केवळ व्यवहार्य अशी जी युरोपियन राजनीति तिचा कस त्याच्या वरील कृत्यास लावल्यास तें दोषाई ठरेल असें आम्हांस वाटत नाहीं. असो; वरील कामगिरी पत्करल्यावर ती शेवटास नेण्याच्या उद्योगास नेपोलियन लागला. बंडवाल्यांच्या बाजूला या वेळीं ४० हजार सैन्य जमा झालें होतें; व सबंध पॅरीस शहरामध्यें त्यांनीं धुमाकूळ माजविला होता. त्यांची एक जंगी मिरवणूक निघून ती वरिष्ठ सरकारच्या ठाण्यावर हल्ला करणार होती. ह्या हल्ल्याचा प्रतिकार करण्याकरितां कन्व्हेन्शननें **बॅरास** नामक एका प्रतिनिधीच्या हाताखालीं सैन्य देऊन त्याची सर्व व्यवस्था त्याजकडे सोंपविली होती. नेपोलियनची नेमणूक **बॅरासच्या** हाताखालीं झाली होती. परंतु, **बॅरास** हा योद्धा नसल्यामुळें व नेपोलियनच्या कसबाची त्याला पूर्ण माहिती असल्यामुळें त्यानें बंडवाल्यांचा मोड करण्याचें काम सर्वस्वीं नेपोलियनवर टाकलें. नेपोलियननें बंडवाल्यांच्या एकंदर स्थितीचें निरीक्षण करून योग्य वेळीं आपल्या तोफखान्याचा मारा इतक्या कुशलतेनें सुरू केला कीं, ४।५ तासाच्या आंत त्यानें त्यांचा पराभव करून त्यांस पळवून लावलें. या चकमकींत शक्य तितका कमी

रक्तपात करावा, असें नेपोलियनचें धोरण होतें; त्यावरून त्याच्या कित्येक सल्लागारांनीं त्यास केवळ पोकळ बार काढून शत्रुपक्षास भयभीत करण्याची कल्पना सुचविली. परंतु 'अवेळीं दया केल्यास परिणामीं घातक होईल' असें म्हणून त्यानें ती सूचना मान्य केली नाहीं. तथापि २०० च्या वर प्राणहानि होऊं न देतां त्यानें विजय संपादन केला. नेपोलियनचा हा लहानसा विजय फ्रेंच राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा होता, असें थोर थोर युरोपियन इतिहासकारांनीं कबूल केलेलें आहे. या विजयामुळें फ्रान्सवरचें एक महान् अरिष्ट टळलें. हा विजय संपादन केल्या-नंतर कन्व्हेन्शननें नेपोलियनला स्वदेशांतील लष्कराचा मुख्य अधिपति केलें. ह्या अधिकारावर असतांना त्यानें पॅरीसच्या बंड-वाल्यांचे देशांतील इतर ठिकाणीं जे अनुयायी होते, त्यांचा बीमोड केला. याप्रमाणें नेपोलियन हळू हळू आपल्या कर्तबगारीनें प्रसि-द्धीस येत असतां **जोसेफाईन ब्यूहार्नेस** नामक एका विधवा सरदारस्त्रीची व त्याची ओळख झाली. ही स्त्री फार सुंदर व मन-मोहक होती. तिला पहातांच नेपोलियनच्या मनांत प्रणयकल्पना उभी राहिली. हिचा पूर्वींचा नवरा फ्रान्सच्या लष्करांतील एक माजी सेनापति असून कन्व्हेन्शनच्या दंडुकेशाहीच्या कारभारांत कांहीं संशयावरून बळी पडला होता. तो बॅरास याचा स्नेही असल्यामुळें जोसेफाईन व बॅरास यांच्यामध्येंही थोडाबहुत स्नेह-संबंध होता. बॅरास हा आतां नेपोलियनचा मित्र बनलेला होता. तेव्हां त्याच्या उत्तेजनानें व मदतीनें जोसेफाईन व नेपोलियन

यांचा विवाह झाला ( ता. ९ मार्च सन १७९६. ). जोसेफाईन ह्या वेळीं दोन मुलांची आई असून नेपोलियनपेक्षां ६ वर्षांनीं मोठी होती. शिवाय तिची सांपत्तिक स्थितीही समाधानकारक नव्हती. परंतु नेपोलियनला ह्या गोष्टीचें कांहींच वाटलें नाहीं. तो तिचें रूप पाहून अगदीं लुब्ध झाला होता. अशा पुरुषाशीं विवाह केल्यास आपला भाग्योदय होऊन आपण मोठ्या वैभवास चढूं, असें जाणण्याइतका चाणाक्षपणा जोसेफाईनच्या अंगीं होता. अर्थात् तिनेंही विवाहास आपली संमति देण्यास फारसे आढेवेढे घेतले नाहींत. याप्रमाणें अधिकार, स्त्री व वैभव यांचा लाभ होऊन नेपोलियनचा भाग्यरवि हळू हळू वर चढूं लागला.

---

## प्रकरण ३ रें.

### इतालींतील दिग्विजय!

नेपोलियनचें लग्न झालें, त्याच्यापूर्वीं दोन दिवस अगोदर इतालीवर स्वारी करणाऱ्या सैन्याच्या मुख्य सेनापतीचे जागीं त्याची नेमणूक झाली. या स्वारीची योजना एक वर्षापूर्वीं त्यानेंच फ्रेंच सरकारच्या लष्करी कमेटीस सादर केली होती, हें मागील प्रकरणावरून वाचकांस माहित झालेंच आहे. त्याची स्वतःची ही योजना अंमलांत आणण्याचें काम फ्रेंच सरकारनें या वेळीं त्याजकडेच सोंपवून दिलें. नेपोलियननें मोठ्या उत्सुकतेनें ती जागा पत्करिली हें सांगावयास नकोच. तो जेव्हां इतालींत जाण्यास

निघाला, त्या वेळीं फ्रान्सबरोबर फक्त इंग्लंड, आस्ट्रिया व त्याच्या आश्रयानें सार्डिनिया एवढींच राष्ट्रें प्रत्यक्ष युद्ध करण्यांत गुंतलीं होतीं. जर्मनी, स्पेन व रशिया हीं राष्ट्रें दमून व कंटाळून युद्धापासून परावृत्त झालेलीं होतीं. अर्थात् आस्ट्रिया व इंग्लंड या दोनच प्रबल शत्रूंशीं फ्रान्सला झुंझावयाचें होतें. इताली देश समरभूमि केल्यास आस्ट्रियाची चांगली खोड जिरवून, शिवाय फ्रान्सला नवीन मुलखाची जोड संपादन करून देतां येईल असा नेपोलियनला भरंवसा वाटत होता; व त्या अनुरोधानेंच त्यानें आपली उपरोक्त योजना तयार केलेली होती. परंतु त्याचें सैन्य प्रतिपक्षाच्या सैन्याहून फारच कमी होतें; आणि त्याची युद्ध-सामुग्रीही बेताबाताचीच होती. पण त्याच्या अंगीं विलक्षण बुद्धि-मत्ता व करामत असल्यामुळें त्याला ह्या वैगुण्याचें कांहींच वाटलें नाहीं. त्यानें ज्या वेळीं आपल्या ह्या सैन्याची एकवार तपासणी केली व त्याचे निरनिराळे विभाग करून त्यास विवक्षित प्रकारचे हुकूम सोडले, त्या वेळची त्याची चपलता, संघटनाशक्ति व बौद्धिक तेज पाहून त्याचे हाताखालील वृद्ध व अनुभविक मार्शल्सही (मासेना, बर्थेअर, ऑगरयु) थक्क झाले! मुख्य सेनापतीचे जागीं नेपोलियनची झालेली नेमणूक सकृद्दर्शनीं त्यांस आवडली नाहीं; परंतु त्याच्याशीं थोडा वेळ सहवास व संभाषण होतांच त्याज-विषयीं त्यांचें मत बदललें व त्याच्या थोर योग्यतेची त्यांस ओळख पटून त्यांचें मनांत त्याच्याविषयीं आदर उत्पन्न झाला. ह्या सैनि-कांच्या हाताखालीं असलेलें सैन्यही युद्धांत कसलेलें असून प्रत्येक

शिपाई देशाभिमानानें प्रेरित झालेला होता. राज्यक्रांतींत घडलेले प्रकार व परदेशस्थांचे हल्ले यांनीं फ्रान्सच्या लष्करांतील लोकांचीं मनें अत्यंत क्षुब्ध करून टाकलीं होतीं आणि या आपत्तींतून आपल्या देशास बचावण्याकरितां ते हवा तितका स्वार्थत्याग व प्राणहानि करण्यास तयार झाले होते. तशांत नेपोलियनसारखा मार्गदर्शक मिळाल्यामुळें तर त्यांचे बाहु जास्तच स्फुरण पावूं लागले होते. ही सर्व परिस्थिति अर्थात् नेपोलियनला सर्वस्वीं अनुकूलच होती. तेव्हां आपल्या सैन्यांत शक्य तितकी सुधारणा व सोय करण्याकरितां तो इ. स. १७९६ च्या मार्च महिन्याच्या अखेरीस नीस[1] येथें येऊन दाखल झाला. तेथें कांहीं दिवस पूर्वतयारींत घालविल्यानंतर त्यानें युद्धास सुरुवात केली. इतालींतील हें युद्ध म्हणजे नेपोलियनच्या लष्करी कौशल्याचें व प्रतिभासंपन्नतेचें एक ठळक उदाहरण आहे, असें तज्ज्ञांचें मत आहे. युद्ध सुरू झाल्यापासून सुमारें २० दिवसांचे आंत त्यानें आस्ट्रियन लष्करास पो नदीच्या पलीकडे हांकून लावलें; व सार्डियन लोकांना युद्ध तहकूब करण्याबद्दलची मागणी करावयास भाग पाडलें. हें कृत्य त्यानें केवळ २४ हलक्या डोंगरी तोफा, थोडेसे घोडेस्वार व भिकार स्थितींत असलेलीं कांहीं थोडीं पायदळ पलटणें यांच्या साह्यानें केलें!! त्याच्या शत्रूंचें सैन्य वास्तविक त्याच्याहून किती तरी मोठें व व्यवस्थित रीतीनें तयार केलेलें असें होतें. या सैन्याची

१ हें शहर फ्रान्सच्या दक्षिणकिनाऱ्यावर फ्रान्स व इताली यांच्या सरहद्दीवर आहे.

घाताहत केल्यानंतर विजयानें बेहोष होऊन पो नदीपलीकडे लंबर्डे प्रांतांत शत्रूचा पाठलाग करण्याचा मोह कोणाही सेनापतीस होण्यासारखा होता. परंतु नेपोलियन ह्या मोहास बळी पडला नाहीं. शत्रूला पो नदीपलीकडे हटविल्यानंतर सावधपणें तो आपल्या पिछाडीकडे म्हणजे पेडिमाँट परगण्याकडे वळला. फ्रान्सशीं दळण-वळण ठेवण्यास हरकत येऊं नये म्हणून त्यानें हा उपाय योजला, व लष्करी हालचालीच्या दृष्टीनें तो फार शहाणपणाचा होता. ह्या परगण्यांत शिरल्यावर त्यानें मोंडोव्ही व केव्हा येथें शत्रूंचीं असलेलीं ठाणीं त्यांचा पराभव करून घेतलीं. परंतु त्याही प्रसंगीं मागील अवधान राखून त्यानें त्या परगण्याचें मुख्य शहर जें त्युरिन त्यावर चाल करण्याचा मोह आवरून धरला. मध्यंतरीं त्यानें शत्रूला जेरीस आणून चेरास्को येथें त्यांना 'युद्ध तहकुबी-'ची मागणी करण्यास भाग पाडलें. ही मागणी त्यानें ज्या शर्तीं-वर मान्य केली, त्या शर्तींच्या अन्वयें त्यास तीन महत्त्वाचे किल्ले मिळून पेडिमाँट परगण्यांतील सर्व लष्करी रस्त्यांचा ताबा मिळाला. ह्या युद्धांत मुख्यतः मोठमोठ्या महत्वाच्या व परिणामकारक अशा लढाया जिंकण्याकडेच नेपोलियनचें लक्ष होतें. उगाच बारीकसारीक हल्ले अगर चकमकी करण्याकडे त्याची बिलकूल प्रवृत्ति नव्हती. वर सांगितल्याप्रमाणें तीन महत्वाचे किल्ले हस्तगत झाल्यानंतर लवकरच त्यानें मिलान शहर काबीज केलें.

या युद्धांतील अत्यंत महत्वाचा प्रसंग म्हणजे मँचुआ शह-राचा वेढा हा होय. या ठिकाणीं १३,००० आस्ट्रियन सैन्य

असून त्यांचा पराभव केल्याखेरीज नेपोलियनच्या सैन्याला उत्तरे- कडे अगर पूर्वेकडे मोर्चा वळविणें शक्य नव्हतें. हें शहर चांगलें तटबंदीचें असल्यामुळें सुमारें चार महिनेपर्यंत आंतील लष्करानें मोठ्या निकरानें त्याचें संरक्षण केलें. नेपोलियननें ह्या शहरास वेढा देऊन आंतील सैन्यास शरण आणण्याचे प्रयत्न चालविले होते. ह्या शहरांतील आपल्या लष्कराची सुटका करण्याकरितां आस्ट्रियाच्या सैन्यानें नेपोलियनवर चार वेळ हल्ले केले. परंतु त्यानें ते मोठ्या शिताफीनें व शौर्यानें परतविले. पैकीं पहिला उर्मजर नामक आस्ट्रियन सेनापतीनें केला. याचें सैन्य ५०,००० होतें. नेपोलियनजवळ यावेळीं ४२,००० लोक होते. पैकीं दहा हजार वेढ्याच्या कामांत गुंतले होते. बाकी राहिलेले ३२,००० लोक लढाईंत गुंतल्यास वेढ्याचें काम फक्त दहा हजार लोकांच्या हातून निभावणार नाहीं, असें वाटून नेपोलियननें आपलें सर्व सैन्य उर्म- जरच्या सैन्याशीं तोंड देण्याकरितां तयार ठेवलें. उर्मजर यानें आपल्या सैन्याचे दोन विभाग केले होते. एक ३२ हजारांचा व दुसरा १८ हजारांचा. पहिली तुकडी घेऊन तो स्वतः गार्डा नामक सरोवराच्या उजव्या अंगानें नेपोलियनच्या सैन्यावर चाल करून येत होता व त्याचा दुय्यम सेनापति दुसरी तुकडी घेऊन त्याच सरोवराच्या डाव्या बाजूनें येत होता. ह्या दोघांचीं सैन्यें एकवट- ण्यापूर्वी एकेकट्यावर हल्ला करून त्याचा पराभव करण्याचा नेपो- लियननें बेत केला. शत्रुपक्षाचें सैन्य विभागलेलें व विस्कळित असतांना त्याच्या निरनिराळ्या दुर्बल अंगांवर एकदम चाल

करून त्यास चकित करून घोटाळ्यांत पाडावयाचें, व अखेरीस त्याची दाणादाण उडवून द्यावयाची ही, नेपोलियनची ह्या व भावी युद्धांतील मुख्य कला होती. व त्यांत तो इतका निष्णात होता कीं, शत्रुपक्षाचें सैन्य स्वसैन्याहून संख्येनें अगर इतर दृष्टीनें कितीही प्रबल असलें तरी त्याची त्याला बिलकूल फिकीर वाटत नसे. असो; आपल्या योजनेप्रमाणें नेपोलियननें प्रथम **उर्मजरच्या** दुय्यम सेनापतीस **लोनाटो** येथें गांठलें, व ता. ३ आगष्ट रोजीं त्याचा त्यानें पुरा मोड करून त्यास पळावयास लावलें. नंतर दोन दिवसांनीं तो **उर्मजरच्या** सैन्याकडे वळला, व **कास्टिग्लि-ओन** येथें उभयसैन्याचें घनघोर युद्ध होऊन उर्मजरचा पराभव झाला; व तो मागें हटत हटत **टायरोल** प्रांतांत निघून गेला. ह्याप्रमाणें पहिल्या हल्ल्याची वाट लागल्यानंतर पुन्हा सप्टेंबर महिन्यांत उर्मजर हा सैन्याच्या आणखी दोन तुकड्या घेऊन **मँच्युआचा** वेढा उठविण्याकरितां सिद्ध होऊन आला. ह्या वेळींही नेपोलियननें त्याच्या दोन्ही सैन्यांचा संयोग होण्यापूर्वीं एकेका तुकडीस गांठून चीत करण्याचें ठरविलें. त्यानें आपले हस्तक **मासेना, ऑगऱ्यु व ह्युबॉय** यांस उर्मजरच्या दुय्यम सेनापतीचा समाचार घेण्यासाठीं पाठविलें, व आपण स्वतः उर्मजरच्या सैन्याची टेहळणी करण्याकरितां ब्रेंटा नदीच्या खोऱ्यांत सैन्यासह दबा धरून बसला. नेपोलियनच्या वरील तिन्ही मार्शल्सनीं ऊर्फ सेनापतींनीं उर्मजरचा दुय्यमं सेनापति डॅव्हिडोवित्झ यास रोव्हेरेदो येथें गांठून त्याच्या सैन्याचा त्यांनीं धुव्वा उडवून दिला. (सप्टेंबर

४). इकडे नेपोलियननेंही त्याच सुमारास ( सप्टेंबर ८ ) उर्मजरवर चाल करून त्यास **बॅसानो** येथें गांठलें व त्याजवर तो इतक्या निकरानें तुटून पडला कीं, नेपोलियनच्या सैन्याचा मार खात खात, बिचाऱ्याला मॅंचुआ येथें कोंडलेल्या ऑस्ट्रियन लष्करांत जाऊन पडावें लागलें. त्याच्या हाताखालीं अद्याप बरेंच सैन्य उरलें होतें. परंतु त्यामुळें मूळच्या कोंडलेल्या लष्करास मदत होऊन वेढा घालणाऱ्या आपल्या सैन्यास कांहीं विशेष अडचण उत्पन्न होईल, असें नेपोलियनला मुळींच वाटलें नाहीं. कारण **मॅंचुआ**च्या आसपास दलदल फार असल्यामुळें त्या वेळीं तेथें तापाची सांथ उद्भवली होती, व त्या सांथींत आपल्या शत्रूचें सैन्य आयतेंच मृत्युमुखीं पडेल असा पूर्ण भरंवसा असल्यामुळें त्यानें **उमर्जर** यास **मॅंचुआ** येथील लष्करी कोंडवाड्यांत आणून टाकलें. ह्या सांथीचें भय नेपोलियनच्याही सैन्यास होतें, म्हणून त्यानें वेढ्याचें काम ह्या वेळीं बरेंच ढिलें केलें होतें. ह्याप्रमाणें आस्ट्रियन सैन्याच्या दुसऱ्या हल्ल्याची वाट लागल्यानंतर मध्यंतरीं नेपोलियनला सहा आठवडे फुरसत सांपडली. तेवढ्या वेळांत त्यानें **मिलान** शहरचे लोक आपल्या बाजूस वळवून घेतले. ह्या शहरांतील लोक विशेष सुसंस्कृत असून राजकीय स्वातंत्र्याचे भोक्ते होते. नेपोलियन हा फ्रेंच लोकसत्ताक राज्याचा मुख्य सेनापति म्हणून इतालींत आलेला होता, व फ्रेंच राष्ट्रानें त्या वेळीं सुरू केलेलें युद्ध लोकस्वातंत्र्याचें रक्षण करण्याकरितांच सुरू केलेलें असल्यामुळें अशा प्रसंगीं त्यास मदत केल्यास ऑस्ट्रिया

व पोप यांच्या जुलमांतून आपली सुटका होईल अशा भावनेनें **मिलान**चे लोक नेपोलियनला अनुकूल झाले. नेपोलियननें त्यांच्या ह्या भावनेस उत्तेजन देऊन ती जास्त प्रज्वलित केली. व त्याच्या ह्या कृतींचा परिणाम **मिलान**शेजारच्या आणखी कांहीं शहरांवर होऊन तींही नेपोलियनच्या स्वाधीन झालीं. तेव्हां त्यानें स्वतःच्याच अधिकारांत **मिलान, रेगिओ, मोदेना, फेरारा** व **बोलोग्ना** या शहरांचें व त्यांच्या आसपासच्या प्रदेशाचे मिळून **ट्रान्सपदने रिपब्लिक्** नांवाचें एक नवीन लोकसत्ताक राज्य फ्रान्सच्या अधिसत्तेखालीं निर्माण केलें. ' सबंध इतालीचें ह्याप्रमाणें लोकसत्ताक राज्य स्थापन होणें जरूर आहे ' अशी मधुर व मतलबी वाणी उच्चारून त्यानें सदर शहरांतील लोकांस आपल्या सैन्यास अन्नसामुग्री व युद्धसामुग्री पुरविण्याची विनंति उर्फ आज्ञा केली; व ती मान्यही झाली. नेपोलियन ह्याप्रमाणें राज्यकारस्थान करण्यांत गुंतला असतां इकडे ऑस्ट्रियन सरकार **मँचुआचा** वेढा उठविण्याकरितां म्हणून फिरून साठ हजार लोकांचें सैन्य पाठविण्याची तयारी करीत होतें. नेपोलियनही सावधच होता. सदर सैन्य चाल करून येणार, असें समजतांच तोही आपल्या सैन्याची व्यवस्था करूं लागला. ह्या वेळीं ऑस्ट्रियन सैन्याचा मुख्य सेनापति **आलव्हिंझी** नामक असून तो फार करारी, शूर व बुद्धिमान होता, असें खुद्द नेपोलियनचेंच त्याजविषयीं मत आहे. अशा सेनानीशीं लहानशा सैन्याच्या साह्यानें विजय मिळविणें फारच बिकट होतें. तारुण्यामध्यें मनुष्याच्या

अंगीं जी एक विलक्षण प्रकारची तडफ व चपलता असते, तिच्या जोरावरच मुख्यतः ह्या सेनानीवर आपण विजय मिळविला, असें पुढें नेपोलियननें बोलून दाखविलें आहे. तात्पर्य, ह्या वेळचा हा प्रसंग या युद्धांतील इतिहासांत अत्यंत आणीबाणीचा होता. परंतु नेपोलियनच्या सुदैवानें उपरोक्त ऑस्ट्रियन सेनापतीनें मागील अनुभव लक्षांत न घेतां फिरून आपल्या सैन्याचे दोन विभाग केले. एका विभागाचें आधिपत्य आपण स्वीकारून दुसऱ्याचें आधिपत्य त्यानें डेव्हिडोव्हित्झ यास दिलें. हीं दोन्हीं सैन्यें अनुक्रमें **ट्रियेस्ट** व **टायरोल** येथून मँचुआकडे निघालीं. ह्या सैन्याचा पाडाव करण्याकरितां नेपोलियननें अशी योजना केली होती कीं, पूर्व अंगानें जाऊन **ब्रेन्टा** नदीच्या तीरावर **आलव्हिंझी** यास मार देऊन त्याच नदीच्या वळणानें वर टायरोलमध्यें जाऊन डेव्हिडोव्हित्झच्या पिछाडीवर स्वतः हल्ला करावयाचा; आणि त्याच्या पुढील भागाच्या बिनीवर त्याच सुमारास **व्हुबॉय** यानें तुटून पडावयाचें व त्याचें पुढील मार्गक्रमण बंद पाडावयाचें. लष्करी डावपेचांच्या दृष्टीनें ही योजना फार सुंदर होती; परंतु युद्धाच्या धांदलींत मुख्य सेनापतीची सर्व योजना अक्षरशः पाळणें शक्य असतेंच असें नाहीं. परिस्थित्यनुसार व हाताखालच्या अधिकाऱ्याच्या कलाप्रमाणें किंवा समजुतीप्रमाणें त्या योजनेंत कधीं कधीं तफावतही पडते. असाच कांहींसा प्रकार या योजनेसंबंधीं झाला. त्यामुळें फ्रेंचसैन्याचा घोटाळा होऊन नेपोलियनवर मोठा निकराचा प्रसंग येऊन ठेपला. आक्टोबरच्या १२व्या तारखेस सकाळीं आलव्हिंझी हा **व्हेरोना** शहराच्या आस-

पास असलेल्या कॅलदेरिओ नामक उंच टेकड्यांवर येऊन दाखल झाला. त्याला मागें हटविण्याकरितां नेपोलियननें त्याजवर हल्ला केला; परंतु त्या दिवशीं संध्याकाळीं त्यास पराभव पावून व्हेरोना शहरांत परतावें लागलें. नेपोलियनची स्थिति ह्या वेळीं फार चमत्कारिक झाली होती. जर मँचुआ शहराकडे परतावें, तर दोन्ही ऑस्ट्रियन सैन्यें एकत्र होऊन मग त्यांच्याशीं युद्ध करणें फारच धोक्याचें होणार होतें. बरें, व्हेरोना शहरांत तळ द्यावा तर शत्रुपक्षाकडून घेरलें जाण्याचा चांगला संभव होता. आलव्हिंजीच्या सैन्यावर फिरून हल्ला करावा, तर त्याचें ठिकाण फार बळकट असल्यामुळें पुन्हा पराभव होण्याचीं चिन्हें दिसत होतीं. अशा कठिण परिस्थितींत दुसरा कोणताही सेनापति सांपडला असता तर त्याची मोठी त्रेधा उडून तो भांबावून जाता, यांत शंका नाहीं. परंतु नेपोलियनचें धैर्य, त्याची समयसूचकता व योग्य वेळीं योग्य असे लष्करी डावपेंच प्रसवणारी त्याची उपजतबुद्धि हीं अप्रतिम असल्यामुळें त्यानें ह्या वेळीं एक धाडसी उपाय योजून आपला कार्यभाग सिद्धीस नेला. तो असाः—आलव्हिंजीच्या ज्या बाजूस युद्ध व अन्नसामुग्री आणि तोफा यांचा संग्रह होता, त्या बाजूवर हल्ला करून तो संग्रह काबीज करण्याचा निश्चय करून तो व्हेरोना येथें फक्त ३,००० लोक ठेवून बाकीच्या सैन्यासह बाहेर पडला व रॉन्को येथें ॲडिज नदी उतरून ॲडिज आणि आलपोन यांच्या मध्यें असलेल्या दलदलीच्या त्रिकोणाकृति भूमीवर तो ता० १५ आक्टोबर रोजीं येऊन दाखल झाला. येथें त्याला अनपेक्षित अशी

एक अडचण उत्पन्न झाली. आलपोन नदीवर आर्कोला गांवानजीक जो पूल होता, तो ऑस्ट्रियन सैन्याच्या तुकड्यांनीं आपल्या नजरेखालीं ठेवला होता. अर्थात् नेपोलियनचें सैन्य जेव्हां या पुलानजीक आलें, तेव्हां त्या आस्ट्रियन सैन्यानें त्याजवर असह्य असा गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. या प्रसंगांतून पार पडण्याकरितां नेपोलियननें आपल्या शौर्याची व युक्तीची शिकस्त केली. परंतु उपरोक्त माऱ्यापुढें त्या सैन्यांतील लोकांचा टिकाव लागेनासा झाल्यामुळें त्यानें आर्कोलाच्या खंदकाच्या आजूबाजूनें मोठ्या शिताफीनें आपलें सैन्य आलव्हिंजीच्या पिछाडीस आणून सोडलें. दुसऱ्या दिवशीं आलव्हिंजी याचें सर्व सैन्य आर्कोला येथें जमा होऊन तीन दिवसपर्यंत नेपोलियनच्या सैन्याचें व त्याचें युद्ध सुरू होतें. अखेरीस तिसरे दिवशीं संध्याकाळीं सुमारें ५० घोडेस्वारांच्या एका फ्रेंच तुकडीनें आस्ट्रियन सैन्याच्या पिछाडीस इतकी जोराची गर्दी व हालचाल केली कीं, मोठ्या थोरल्या सैन्याचा आपल्यावर हल्ला होत आहे असें वाटून आस्ट्रियन सैन्य पळूं लागलें. आलव्हिंजीच्या सैन्यानें ह्याप्रमाणें पळ काढल्याची बातमी समजतांच त्याचा दुय्यम जो व्हिह्वोव्हिस यासही आपलें सैन्य मागें परतविणें भाग पडलें. पण ह्या सैन्याचा फ्रेंच सैन्यानें पाठलाग करून त्यास टायरोलमध्यें हाकून लावलें. याप्रमाणें अखेर नेपोलियननें विजय संपादन करून ऑस्ट्रियाचा तिसऱ्यांदा मोड केला. पण ऑस्ट्रियन राष्ट्र हें अत्यंत चिवट असल्यामुळें जरी ह्या तीन हल्ल्यांत त्याचें अपरिमित नुकसान झालें, तरी त्यास भीक न

घालतां फिरून नेपोलियनवर सैन्य पाठविण्याची त्यानें तयारी केली. आर्कोला येथील युद्धानंतर चार महिन्यांनीं हें नवें आस्ट्रि-यन सैन्य नेपोलियनवर चाल करून आलें. ह्या सैन्याची संख्या ६५,००० असून त्याचें आधिपत्य आलव्हिंजीकडेच होतें. ह्या वेळीं त्याचा दुय्यम सेनानी प्रोव्हेरा नामक होता. आलव्हिंजी हा ॲडिज नदीच्या दोन्ही तीरांनीं व्हेरोना शहराकडे चाल करून येत होता व त्याचा दुय्यम ह्याच नदीच्या दक्षिणभागास पो नदी-नजीक येऊन दाखल होत होता. अर्थात् नेपोलियनचें सैन्य ह्या वेळीं दोन्ही शत्रुसैन्यांच्या मध्यभागीं सांपडलें होतें. त्याचें एकंदर सैन्य अवघें ४२,००० होतें व त्यापैकीं एक तुकडी त्यानें आपला अधिकारी जोबर्त याच्या हाताखालीं रिव्होली येथें ठेवली होती. आलव्हिंजीनें हें स्थान काबीज करून नेपोलियनच्या सैन्यास चारी बाजूंनीं कोंडून धरण्याचा बेत केला. आलव्हिंजीचें सैन्य येऊन दाखल होतांच जोबर्तनें नेपोलियनला अधिक सैन्याची मागणी केली. दुसरे दिवशीं पहाटे २ वाजतां नेपोलियन तेथें येऊन दाखल झाला. त्यानें शत्रुपक्षाच्या सैन्याची तेथील टेकडीवरून टेहळणी केली. तेव्हां त्यास असें दिसून आलें कीं, शत्रूचें सैन्य जरी पुष्कळ आहे, तरी तें निरनिराळ्या जागीं विखुरलेलें आहे. ही स्थिति नेपोलियनला अनुकूलच होती. शिवाय ज्या ठिकाणीं त्याचें सैन्य होतें, त्या ठिकाणची नैसर्गिकरचनाही त्यास पुष्कळ फायदे-शीर अशी होती. दुसरे दिवशीं सकाळीं लढाईस सुरवात झाली तेव्हां नेपोलियननें ६० तोफांचा ऑस्ट्रियन सैन्याच्या दुर्बल भागावर

सारखा भडिमार चालविला. इतक्यांत, दुपारचे वेळीं त्याचा मुख्य लेफ्टनंट **मासेना** हा रात्रभर प्रवास करून नवीन सैन्यासह त्यास येऊन मिळाला. त्यामुळें नेपोलियनच्या सैन्यास अधिक उत्साह प्राप्त होऊन तें शत्रुसैन्यावर अगदीं तुटून पडूं लागलें. त्यासरशीं सुमारें दोन प्रहरचे २ वाजतां, आस्ट्रियन सैन्य मागें फिरूं लागलें. तेव्हां नेपोलियनच्या सैन्यानें ट्रेन्टपर्यंत त्याचा पाठलाग करून त्यास **टायरोल**मध्यें हाकून लावलें. **आलविंह्जी**चा याप्रमाणें पराभव होतांच नेपोलियन **प्रोव्हेरा**चा समाचार घेण्याकरितां दक्षिणेकडे वळला. त्या वेळीं **प्रोव्हेरा मंचुआ**नजीक येऊन ठेपला होता. त्याला गांठून नेपोलियननें त्याच्याही सैन्याची धुळधाण उडवून दिली. तेव्हां **मँचुआ** येथील सैन्याचा अधिपति **उर्मजर** आपल्या सैन्यासह नाइलाज म्हणून नेपोलियनला शरण आला. नेपोलियननें **उर्मजर**ला त्याच्या थोर योग्यतेनुरूप वागविलें, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. नेपोलियनच्या आपत्कालीं त्याच्या शत्रूच्या ठायीं इतकेंही औदार्य दिसून आलें नाहीं. या गोष्टीचा विचार केला म्हणजे नेपोलियनच्या ह्या उदार मनोवृत्तीबद्दल कोणासही त्याचें कौतुकच करावेंसें वाटेल, यांत शंका नाहीं. या पराभवानंतरही आस्ट्रियानें नेपोलियनचा पाडाव करण्याचे आणखी प्रयत्न केले. परंतु आतां आस्ट्रियाचें कसलेलें सैन्य बहुतेक नष्ट झालें असून नवशिक्या शिपायांचीच त्यांत भरती असल्यामुळें नेपोलियनच्या कसलेल्या व विजयी सैन्यापुढें त्याचा टिकाव लागला नाहीं. अखेरीस ऑस्ट्रियन राजधानीपासून १००

मैल अलीकडे असलेल्या लेवन शहरीं जेव्हां नेपोलियनची बिनी जाऊन पोंचली, तेव्हां ऑस्ट्रियन सरकारनें तहाचें बोलणें सुरू केलें. हें तहाचें बोलणें चालू असतां नेपोलियन मिलान येथील राजवाड्यांत येऊन राहिला व तेथें त्यानें आपल्या कुटुंबांतील मंडळीही आपल्या वैभवाचा उपभोग घेण्यास आणली. ह्या वेळीं त्याचें वैभव व दरारा खरोखरीच एखाद्या राजाप्रमाणें होता. कुटुंबांतील व इतर माणसांशीं त्याची खासगी वागणूक फार मायाळूपणाची व दिलदारपणाची होती. तो केवळ लष्करी सेनापतिच नव्हता, तर मोठमोठीं राजकारस्थानें करून फ्रान्समध्यें साम्राज्य स्थापन करण्याच्या महत्वाकांक्षेनें भारलेला असा मुत्सद्दी व कार्यकर्ताही होता. यामुळें प्रत्यक्ष लढाई बंद झाली तरी त्याचे राजकारस्थानाचे उद्योग चालूच होते. अर्थात् त्याला विश्रांति, सुखासीनता व आळस यांचा बिलकुल संपर्क नव्हता. झोपेंत त्याला जी काय स्वस्थता मिळे तेवढीच. त्याखेरीज इतर वेळीं त्याचा एक क्षणही फुकट जात नव्हता. ऑस्ट्रियाशीं जेव्हां तहाचें बोलणें सुरू झालें, तेव्हां त्या बाबतींत फ्रेंच सरकार उर्फ डायरेक्टरी यांच्या व नेपोलियनच्या दरम्यान कांहीं बाबतींत मतभेद उत्पन्न झाला. परंतु डायरेक्टरींतील लोक व्यवहारज्ञ असण्यापेक्षां तत्वज्ञच विशेष आहेत, असें समजून नेपोलियननें त्यांच्या म्हणण्याकडे लक्ष न देतां आपल्या इच्छेप्रमाणेंच सदर तहाचीं कलमें ठरविलीं व तीं मान्य करणें फ्रेंच सरकारास भाग पाडलें. ह्या तहाचे बाबतींत नेपोलियननें जें वर्तन केलें, त्याबद्दल त्याच्या टीकाकारांमध्यें

ही बराच मतभेद आहे. त्याच्या हातून ह्या वेळीं मोठा थोरला जो अन्याय झाला तो व्हेनिसच्या राज्याचे तुकडे करून त्याचा अर्धा भाग आस्ट्रियास देण्याचे बाबतींतील होय. सामान्य राजनीतीच्या दृष्टीनें नेपोलियनचें हें कृत्य समर्थन करण्याजोगें नाहीं. परंतु ' Political expediency ' या शब्दसमुच्चयाखालीं युरोपियन राष्ट्रें ज्या अनेक अन्यायाच्या कृत्यांचें समर्थन करूं शकतात, त्यापैकींच हें एक कृत्य आहे, इतकें त्यासंबंधानें सुचविणें भाग आहे. ह्या व्हेनिस प्रकरणापेक्षां नेपोलियनच्या हातून या वेळीं जी अधिक महत्वाची गोष्ट घडली, ती ' कॅस्पलाइन रिपब्लिक ' या नांवानें त्यानें इतालींत स्थापन केलेलें छोटेंसें लोकसत्ताक राज्य ही होय. ऑस्ट्रियाचा पराभव केल्यावर नेपोलियननें रोमच्या पोपचाही थोडासा समाचार घेतला व त्याच्यापासून त्या वेळीं त्यानें जो प्रदेश मिळविला, तो व मागें सांगितलेलीं चार शहरें यांचा ह्या लोकसत्ताक राज्यांत समावेश केला होता. इतालींतील लोकांस राज्यसंस्था चालविण्याचे कामीं शिक्षण देण्यास व त्यांचें ठायीं लोकस्वातंत्र्याचें प्रेम उत्पन्न करण्यास ह्या छोट्याशा लोकसत्ताक राज्याचा फार उपयोग झालेला आहे. म्हणून ऐतिहासिक-दृष्टया नेपोलियनच्या ह्या कृतीचें महत्व विशेष असून तें त्याची थोरवी वाढविणारें असें आहे. असो; आस्ट्रियाशीं सुरू असलेली तहाची वाटाघाट पूर्ण होऊन आक्टोबर १७९७ मध्यें कँपो-फोर्मिओ येथें सदर तहनाम्यावर उभयपक्षांच्या सह्या व शिक्के झाले. या तहनाम्यान्वयें फ्रान्सला र्‍हाइन नदीच्या तीरापर्यंत सरहद्दी-

वरील मुलुख व शेल्स नदीच्या मुखाजवळील सखल प्रदेश नवीन मिळाला. याप्रमाणें इतालीमध्यें दिग्विजय संपादन करून नेपोलियन फ्रान्सकडे परत फिरला.

---

# प्रकरण ४ थें.

## इजिप्त व सिरिया यांवर स्वारी.

**कॅंपोफोर्मिओ** येथील तहानंतर फ्रान्सला इंग्लंडखेरीज दुसरा कोणी शत्रु उरला नव्हता. इंग्लंडची समुद्रावरील सत्ता जबर असल्यामुळें व फ्रान्सांतील **बुरबोन** राजघराण्याचा मुख्य आधार इंग्लंडच असल्यामुळें त्याचा पराभव केल्यावांचून फ्रान्सनें नुकतेच काबीज केलेले प्रांत त्याला पचण्यासारखे नव्हते. ही गोष्ट नेपोलियनच्या पूर्णपणें लक्षांत येऊन चुकल्यामुळें इंग्लंडचा पराभव करण्याकरितां फ्रान्सच्या आरमाराची जय्यत तयारी करण्याबद्दल फ्रेंच सरकार उर्फ डायरेक्टरी यास इ. स. १७९७ च्या आक्टोबर महिन्यांत ( ता. १८ ) त्यानें एक खलिता लिहिला. याचें कारण असें कीं,, क्रांतिच्या काळांत फ्रान्समध्यें ज्या अनेक उलाढाली व स्थित्यंतरें झालीं, त्यांचा तेथील आरमारी खात्यावर अनिष्ट परिणाम घडून आल्यामुळें फ्रान्सचें आरमार ह्या वेळीं फारच दुर्बल झालेलें होतें. त्या खात्यांतील कसलेले व दर्दी शूर लोक व अधिकारी यांची हाकालपट्टी होऊन त्यांच्या जागीं उच्छृंखल व अनभिज्ञ लोकांचा भरणा झालेला होता. देशामध्यें बराच काल

अराजकांच्या चळवळींना ऊत आल्यामुळें या लोकांमधील शिस्तही मोडत चालली होती. त्यामुळें गोदीमध्यें त्यांच्यांत परस्पर कलह व दंगेही होत असत. ही स्थिति सुधारल्यावांचून इंग्लंडवर स्वारी करतां येणें अशक्य होतें. ती सुधारण्याचें व इंग्लंडवर स्वारी करण्याचें काम, नेपोलियन इतालींतून परत येतांच, फ्रेंच डायरेक्टरीनें त्याजवर सोंपविलें. तेंव्हां तो त्या कामास लागला. तो इ. स. १७९८ च्या फेब्रुवारी महिन्यांत 'इंग्लिश चॅनेल' ची पहाणी करण्याकरितां **बोलोन, कॅलिस,** आणि **डनकिर्क** इत्यादि बंदरें हिंडला. त्यावरून त्याला असें आढळून आलें कीं, फ्रान्सच्या सद्यःस्थितींत, इंग्लंडच्या किनाऱ्यावर फ्रेंच सैन्य नेणें अशक्य आहे. परंतु हें जरी अशक्य असलें तरी दुसऱ्या एका रितीनें इंग्लंडला जेरीस आणणें शक्य आहे, असें त्यानें फ्रेंच डायरेक्टरीस कळविलें. ही दुसरी योजना अशी होती कीं, इजिप्तवर स्वारी करून त्या देशांत आपली सत्ता व वसाहत कायम करावी व पुढें तेथून इंग्लंडच्या साम्राज्याचा मुख्य आधार जो हिंदुस्थान देश त्यावर स्वारी करून तेथें इंग्लंडचा पराभव करावा. नेपोलियनची ही योजना फ्रेंच सरकारास पसंत पडली व त्यानें त्यास ती अंमलांत आणण्याची परवानगी दिली. इतालींतील दिग्विजय संपादन करून आल्यापासून नेपोलियनचें वर्चस्व फ्रान्समध्यें फार वाढलें होतें. सर्व जनता त्याच्याकडे साभिमान व सकौतुक दृष्टीनें पाहूं लागली होती. यामुळें तो देशांत फार काल राहिल्यास आपल्या वर्चस्वास व अधिकारास धोका आणील, अशी शंका

डायरेक्टरींतील लोकांच्या मनांत आतां उद्भवली होती. तेव्हां तो आपण होऊन ईजिप्तमध्यें जात असल्याचें पाहून त्यांना बरेंच वाटलें. त्यांची ही मनःस्थिति नेपोलियनला कळून चुकलेली होती. परंतु तो फार दमाचा, दीर्घसूत्री व कावेबाज असल्यामुळें त्यानें त्यांस योग्य काळ येईपर्यंत त्या गोष्टीची ओळख दिली नाहीं. ईजिप्तवर स्वारी करण्याची योजना ठरविण्यास नेपोलियन यास आणखीही कांहीं कारणें होतीं. अलेक्झांडरचे दिग्विजय व आशिया खंडांत त्याला प्राप्त झालेलें वैभव यांची नेपोलियननें लहानपणींच माहिती करून घेतली होती; आणि तेव्हांपासून आशिया खंडांतील अनेक वैभवशाली देश त्याच्या डोळ्यापुढें उभे राहून त्यांवर स्वारी करण्याच्या कल्पना त्याच्या तरुण व महत्वाकांक्षी मनांत वारंवार येत असत. इतालींतील दिग्विजयामुळें त्याच्या ह्या कल्पना फार प्रबल झाल्या व त्यांस कधीं एकदां मूर्त स्वरूप देईन, असें त्यास होऊन गेलें. पुढें विचार करितां करितां, या स्वारींत फ्रान्सच्या बलाढ्य शत्रूलाही चित करण्याची संधी मिळणार असें जेव्हां त्यास आढळून आलें, तेव्हां तर त्यासंबंधानें त्याचा निश्चयच ठरला. असो; त्याची ही योजना फ्रेंचसरकारनें मान्य केल्यावर तो १३ मोठीं आणि ४०० लहान लढाऊ जहाजें आणि ३८,००० सैन्य बरोबर घेऊन इ० स० १७९८ च्या मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत **तुलोन** बंदरांतून बाहेर पडला.

१ नेपोलियनचें वय अद्याप ४० च्या आंत असल्यामुळें फ्रेंच कायद्यान्वयें अद्याप तो डायरेक्टरींत शिरण्यास पात्र नव्हता.

ह्या जहाजांतून त्यानें पंडित, कारागीर, संशोधक, इंजिनियर्स वगैरे निरनिराळ्या धंद्यांचे लोकही घेतले होते. तसेंच **बर्थेअर, मॅरमाँत, लेनेस, म्युरात, देझेक्स, क्लेबर** वगैरे त्याच्या कसोटीस उतरलेले शूर सेनापतिही त्याच्या सैन्याबरोबर होते. नेपोलिअन जेव्हां निघाला, तेव्हां भूमध्यसमुद्रांत **नेल्सन** आपल्या आरमारासह होता. परंतु नेपोलियननें मुद्दाम त्याला हुलकावणी दाखवून दुसऱ्या मार्गाकडे वळविलें. त्यामुळें **माल्टा** हें त्या समुद्रांतील मुख्य ठाणें नेपोलियनच्या हातीं लागलें ( जून १२ ). अर्थात् त्याचा पुढील मार्ग सुरक्षित होऊन जुलईच्या पहिल्या तारखेस तो आपल्या सर्व लव्याजम्यासह **अलेक्झांड्रा** बंदरांत येऊन दाखल झाला. ह्या ठिकाणीं त्यानें आपलें खुष्कीवर लढणारें सैन्य उतरून घेतलें व आरमार नाईल नदीच्या खाडींत पश्चिम भागाकडे पाठविलें. ईजिप्त हा देश आपल्या ताब्यांत घेण्याकरितां नेपोलियनला **कायरो** शहर काबीज करणें अवश्य होतें, म्हणून त्यानें त्या शहराकडे आपला मोर्चा वळविला. येथें अरबी लोकांची व त्याची एक मोठी चकमक उडाली. परंतु त्याच्या कसलेल्या व शिस्तीच्या सैन्यापुढें अरबांच्या अव्यवस्थित सैन्याची अगदीं अल्पकाळांत कत्तल व त्रेधा उडून सुमारें २३ दिवसांच्या आंत त्यास **कायरो** शहर घेतां आलें. त्यानें **कायरो** शहर घेतल्यानंतर लवकरच **नेल्सन** सावध झाला व नेपोलियनच्या आरमारावर तुटून पडण्याकरितां तो **अलेक्झांड्रियानजीक** असलेल्या **अबौकीर** नामक ठिकाणीं आला. या ठिकाणीं फ्रेंच

आरमाराची व त्याची लढाई होऊन **नेलसन**च्या गळ्यांत विजय-श्रीनें माळ घातली. त्यामुळें फ्रान्सशीं नेपोलियनचें असणारें दळण-वळण बंद होऊन तो आपल्या सैन्यासह ईजिप्तमध्यें कोंडला गेला. या पराभवाचा फ्रेंच लष्करावर बराच अनिष्ट परिणाम घडला; परंतु नेपोलियननें मोठ्या कुशलतेनें तो दूर करून त्याचें अवसान कायम राखलें. खुद्द नेपोलियनला ह्या पराभवाचें फारसें कांहीं वाटलें नाहीं. कारण ईजिप्तमध्यें स्थिरस्थावर झाल्यावर हिंदुस्थानावर स्वारी करून इंग्रजांना शह देण्याचा त्याचा विचार होता. हिंदुस्थान काबीज केलें कीं इंग्रज तेव्हांच डबघाईला येतील, अशी त्याची समजूत होती. लष्करी दृष्ट्या त्याची ही समजूत चुकीची होती, असें कित्येक युद्धशास्त्रज्ञांचें मत आहे. तें कसेंही असो, नेपोलियनचे हे विचार केवळ कल्पनासृष्टींतच राहिले एवढी गोष्ट मात्र खरी!

मध्यंतरीं **कायरो** येथील लोकमत आपल्या बाजूस वळवि-ण्याचे त्यानें अनेक उपाय केले. आरबी लोकांचे मुख्य धर्मगुरु व पुढारी यांस त्यानें मोठ्या आदरानें वागवून त्यांच्या धर्माचें त्यानें एवढें मोठें स्तोत्र गाइलें कीं, ते कडवे पण भोळे लोक तेव्हांच त्यास अनुकूळ झाले. त्यांना प्रसन्न राखण्याकरितां एक नवीन मशिद बांधून तेथें त्यांच्या पद्धतीप्रमाणें फ्रेंच लष्कराकडून निमाज पढविण्याचाही त्यानें घाट घातला होता! याखेरीज दक्षिण ईजिप्तमध्यें त्यानें ठिकठिकाणीं शेतकऱ्यांची स्थिति सुधार-ण्याकरितां व देशांतील खनिज संपत्ति बाहेर काढून लोकांत उद्योग-

धंद्याच्या द्वारें संपत्तीचा फैलाव करण्याकरितां अनेक कारखानें व प्रयोगशाळा स्थापन करण्यास सुरवात केली होती. सार्वजनिक रस्ते व इमारती सुधारण्याकरितां इंजिनियरिंग खात्यामार्फत कामें सुरू केलीं होतीं. तसेंच आपल्या लष्कराच्या गरजा भागविण्याकरितां त्यानें मोठमोठे कारखाने व गिरण्या उभारल्या होत्या. व छापखाना आणि टंकसाळ यांचीही त्यानें **कायरो** शहरांत स्थापना केली होती. नेपोलियननें आपल्याबरोबर जे निरनिराळ्या धंद्यांचे लोक आणले होते, त्यांचा त्यानें अशा रीतीनें ईजिप्तची भौतिक सुधारणा करण्याचे कामीं उपयोग करून घेतला. * याप्रमाणें नेपोलियन निर्वेधपणें ईजिप्तच्या सुधारणेचें काम करीत असतां इकडे त्याच्या स्वदेशांतील स्थिति दिवसानुदिवस फार शोचनीय होत चालली होती. त्याच्या पश्चात् फ्रेंच सरकारनें जर्मनी व इटली येथें युद्धें सुरू ठेवलीं होतीं; व इतालींतील बहुतेक प्रांतांत लहान लहान लोकसत्ताक राज्यें फ्रान्सच्या अधिसत्तेखालीं स्थापन केलीं होतीं. फ्रेंच सरकारच्या ह्या त्रासामुळें युरोपांतील राष्ट्रें पुन्हा एक होऊन फ्रान्सवर हल्ला करण्याचा विचार करूं लागलीं. नेपोलियनच्या गैरहजिरीचा फायदा घेऊन ऑस्ट्रियानेंही फ्रान्सची खोड मोठण्याचा बेत केला. त्यास रशिया व इंग्लंड यांनीं मदत करण्याचें योजिलें व या तिन्ही राष्ट्रांनीं

---

* भूमध्य समुद्र व आरबी समुद्र यांची खोली अजमावून पहाण्याचा प्रयत्न प्रथम नेपोलियननेंच केला व सुवेझच्या कालव्याची कल्पनाही प्रथम त्याच्याच डोक्यांतून बाहेर पडली.

फ्रान्सवर हल्ले सुरू केल्यामुळें फ्रेंच सैन्याचा त्यांच्या सरहद्दीवर ठिकठिकाणीं पाडाव होऊं लागला. नेपोलियननें इतालींत दिग्विजय मिळवून जें जें कांहीं संपादन केलें, तें तें बहुतेक सर्व या वेळीं फ्रान्सनें गमावलें. फ्रान्सची अंतस्थ स्थितिही अशीच बिघडत चालली होती. तेथील डायरेक्टरांनीं नेमस्त व श्रीमंत लोकांवर जुलूम करून त्यांस असंतुष्ट करून ठेवलें होतें. तसेंच जॅकोबिन पक्षाच्या अवशिष्ट राहिलेल्या लोकांसही छळण्याचा त्यांचा क्रम चालूच होता. पूर्ण लोकसत्तावादी लोकांसही कौन्सिलमध्यें न येऊं देण्याबद्दल त्यांचे आटोकाट प्रयत्न चालू होते. या सर्व गोष्टींमुळें देशांत अस्वस्थता व अराजकत्व माजून राहिलें होतें. वारंवार सारखें युद्ध सुरू असल्यामुळें सरकारी तिजोरीही कंगाल स्थितीस येऊन पोंचली होती. फ्रेंच सरहद्दीवरील वर निर्दिष्ट केलेल्या पराभवाची बातमी फ्रान्समध्यें पसरतांच तेथील लोकमत फारच खवळलें. युद्धाप्रीत्यर्थ जे जबर कर सरकारनें बसविले होते, ते वसूल होण्यास फार अडचण पडूं लागली; व जिकडे तिकडे दंगेधोपे सुरू झाले. डायरेक्टरांच्या हातून राज्यकारभार चालविण्याचें काम नीट होईना. व त्यांच्यापैकीं अत्यंत अनुभविक व हुषार असा जो साइस ह्यानें तर या वेळीं 'आपणांस बुद्धिमान व तरवारबहाद्दर मनुष्याची अपेक्षा आहे; त्यावांचून फ्रान्समध्यें स्वस्थता होणार नाहीं!' असें स्पष्ट बोलून दाखविलें!

नेपोलियनला स्वदेशासंबंधाची वरील हकीकत माहीत नव्हती. त्याचें इजिप्तची सुधारणा करण्याचें काम चालूच होतें; इतक्यांत

तुर्कस्थाननें फ्रान्सविरुद्ध लढाई जाहीर केल्याचें वृत्त त्यास समजलें. त्याला ईजिप्तमधून हाकून लावण्याचीं तुर्की बादशहाचीं फर्मानें कायरो येथें येऊन पोंचलीं व त्यावरून तेथें एक लहानसें बंड झालें. हें बंड नेपोलियननें इतक्या कडक रीतीनें मोडलें कीं, फिरून त्याच्या विरुद्ध ईजिप्तमध्यें कोणीही डोकें काढण्यास धजला नाहीं. पुढें इ. स. १८९९ च्या जानेवारी महिन्यांत तो सुवेज येथें नाईल नदीच्या जुन्या कालव्याची तपासणी करीत असतां त्यास असें वर्तमान समजलें कीं, सीरियाचा गव्हर्नर व ग्रँड वजीर अहमद-पाशा यानें ईजिप्तवर स्वारी करण्याकरितां लष्करी हालचाल केली असून ईजिप्तच्या सरहद्दीवरील एल अरिश नामक ठाणें त्याच्या बिनीनें काबीज केलें आहे. ही बातमी ऐकून नेपोलियनला फार आनंद झाला. कारण त्यामुळें सिरियावर स्वारी करण्याची त्यास आयतीच संधी मिळून पुढें हिंदुस्थानावर स्वारी करण्याची त्याची मनीषा सफळ होण्याचा संभव त्यास दिसूं लागला. याखेरीज, आरमाराच्या पराभवामुळें नाउमेद झालेल्या आपल्या सैन्यास नवीन विजय मिळवून अधिक उत्साहपूर्ण करण्यासही ही संधी चांगली आहे असें त्यास वाटलें. अर्थात् त्यानें तत्काळ आपलें कांहीं सैन्य एल अरिश येथें आणलें व थोड्याच अवधींत त्यानें तें ठिकाण काबीज केलें. नंतर जाफा शहर हस्तगत करून सीरियन बंदर एकर यास त्यानें वेढा घातला. ह्या ठिकाणीं सीरियाचा उपरोक्त गव्हर्नर रहात होता. नेपोलियननें ह्या बंदरास वेढा घातल्याची बातमी, इंग्लंडच्या आरमारी खात्यांतील अंमलदार सर सिडनी

स्मिथ ह्यास समजतांच त्यानें समुद्रांतून नेपोलियनच्या सैन्यावर तोफांचा भडिमार सुरू केला. त्यामुळें दोन महिन्यांनंतर नेपोलियनला वेढा उठविणें भाग पडलें. कारण इंग्रजी आरमारास येऊन मिळण्याकरितां तुर्कस्थानचें निघालेलें आरमार त्याच्या पिछाडीच्या नजिक येऊन पोंचलें होतें. अशा स्थितींत—दोन्ही आरमारांच्या माऱ्यांत—कोंडून राहणें धोक्याचें असल्यामुळें त्यानें आपलें सैन्य परत फिरविलें. वरील कारणाखेरीज परत फिरण्यास आणखीही कारणें होतीं. त्याच्या सैन्यांत प्लेग सुरू झाला होता; व त्याचा बंदुकीच्या दारूचा संग्रह संपुष्टांत येत चालला होता. शिवाय शत्रूच्या माऱ्यामुळें त्याचे ३००० लोक रणांगणावर पडले होते. त्याची धान्यसामुग्रीही संपत आली होती. ह्या सर्व कारणांमुळें त्यास ह्या वेळीं माघार घेणें भाग पडलें. २६ दिवसपर्यंत सुमारें ३०० मैलांचा प्रवास अर्ध्या अन्नावर करून तो ता० १४ जून रोजीं आपल्या सैन्यासह **कायरो** येथें येऊन पोंचला. नेपोलियन परत फिरला आहे असें पाहून तुर्क लोकांनीं ईजिप्तच्या किनाऱ्यावरील **अबोकीर** शहरांत १५००० सैन्य उतरलें **एकरच्या** वेढ्यामुळें नेपोलियनच्या सैन्याची जरी पुष्कळ हानि झाली होती, तरी तुर्कांच्या ह्या नवीन सैन्याशीं टक्कर देण्यासारखें एक लहानसें सैन्य ईजिप्तमध्यें त्याचेजवळ होतें. तें घेऊन त्यानें तुर्की सैन्यावर निकराचा हल्ला केला. शत्रूपेक्षां नेपोलियनचें सैन्य ह्या वेळीं निम्यालाही कमी असल्याकारणानें त्याला ह्या वेळीं फारच कुशलतेनें व सावधपणानें आपलें काम

करावें लागलें. हल्ला सुरू होऊन थोडा वेळ होतांच नेपोलियनला विजयाचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्याच सुमारास त्याचा लेफ्टेनंट मुरात यानेंही मोठ्या शिताफीनें शत्रूच्या डाव्या बाजूची फळी फोडून त्यास पळावयास लावलें. परंतु नेपोलियननें कोणासही पळूं न देतां त्यांस जलसमाधि दिली ! ह्या युद्धांत तुर्कांचें सर्व सैन्य नाश पावलें. एकर येथें मिळालेलें अपशय व त्या वेळीं झालेली हानि यांचा वचपा नेपोलियननें अशा रितीनें भरून काढला. हा विजय संपादन केल्यावर आकस्मिक रितीनें नेपोलियनला मागें सांगितलेलें स्वदेशांतील घडामोडींचें वर्तमान समजलें. तें ऐकतांच त्यानें परत फ्रान्सला जाण्याचा निश्चय केला. रशिया व आस्ट्रिया यांनीं फ्रान्सच्या जिंकलेल्या प्रदेशांवर स्वाऱ्या करून ते काबीज केले ही बातमी ऐकून नेपोलियनला अतिशय वाईट वाटलें; व अशा वेळीं फ्रान्सचें रक्षण करणें हें आपलें आद्यकर्तव्य आहे, असें समजून तो ईजिप्तच्या सेनेचें आधिपत्य क्लेबर नामक हुषार अधिकाऱ्याकडे सोंपवून गुप्तपणें फ्रान्सला जाण्याकरितां निघाला. क्लेबर-खेरीज बाकीचे सर्व लष्करी जनरल त्यानें आपणाबरोबर घेतले. ता० २१ आगष्ट रोजीं रात्रीं ४ लहान लढाऊ जहाजें बरोबर घेऊन तो अलेक्झांड्रा बंदरांतून गुप्तपणें निघाला. गुप्तपणें निघण्याचें कारण कीं, वाटेंत इंग्रजी आरमाराचा डोळा चुकवून त्यास जावयाचें होतें. एका दृष्टीनें नेपोलियनचें हें कृत्य मोठें धाडसाचें होतें. परंतु त्याचें दैव त्यास सध्यां पूर्णपणें अनुकूल असल्यामुळें त्याचें हें धाडस यशस्वी होऊन तो निर्विघ्नपणें फ्रेंच किनाऱ्यानजिक

आक्टोबर महिन्यांत येऊन पोंचला. लागलीच त्यानें **पॅरिसचा** रस्ता धरला. तो प्रोव्हेन्स प्रांताच्या किनाऱ्यावर येतांच तेथील लोकांनीं व अधिकाऱ्यांनीं त्याचें मोठ्या आनंदानें स्वागत केलें. **पॅरिसला** जातांना तो ज्या ज्या प्रांतांतून गेला, त्या त्या सर्व प्रांतांतील लोकांनीं त्याचें असेंच मनःपूर्वक स्वागत केलें. कारण तो परत आलेला पाहून फ्रेंच लोकांस त्या वेळीं खरोखरच मोठा आनंद झालेला होता. **पॅरिस** शहरांतील जनतेनेंही त्याचें अत्यंत अपूर्व असें स्वागत केलें. या सर्व स्वागतांतील रहस्य काय, व व त्यांचें पर्यवसान पुढें कसें काय झालें, या संबंधाचा विचार पुढील प्रकरणांत करूं.

---

## प्रकरण ५ वें.

### नेपोलियन डिक्टेटर बनतो !

नेपोलियन फ्रान्समध्यें येताच त्याचा जो ठिकठिकाणच्या लोकांनीं जयजयकार केला, त्याचें कारण असें कीं, हे लोक डायरेक्टरीच्या राजकीय धोरणाला कंटाळलेले होते. या धोरणा-मुळें देशांत अराजकत्व, जुलूम व कंगालपणा उत्पन्न होऊन देशा-बाहेरील युद्ध व पराभव यांनीं त्याचें राष्ट्रीय सामर्थ्य संपुष्टांत आणलें होतें. अशा वेळीं आपल्या देशाची अब्रू बचावून त्यास सुखशांतीचा लाभ करून देण्याचें सामर्थ्य एकट्या नेपोलियन-शिवाय दुसऱ्या कोणाचेही ठिकाणीं नाहीं, अशी त्यांची समजूत

बनली होती. अर्थात्, त्यांच्या या भावी आशेचें केंद्रस्थान असलेली व्यक्ति त्यांच्या नजरेस पडतांच त्यांना मनापासून आनंद होणें व तो मागें सांगितल्याप्रमाणें जंगी स्वागताच्या रूपानें बाहेर पडणें हें अगदीं साहजिक आहे. पुष्कळ दिवसांपासून ते नेपोलि-यन परत येण्याची मोठ्या उत्सुकतेनें वाट पहात होते. डायरेक्टर लोकांपैकींही प्रमुख अशा दोन डायरेक्टरांस नेपोलियन केव्हां येईल असें होऊन गेलें होतें. त्यांपैकीं **साइसनें** तर '**प्रस्तुत डायरीक्टरीपेक्षां अधिक बलवान व कर्तृत्ववान अशी शासन-संस्था या वेळीं फ्रान्सला पाहिजे आहे**' असें उघड उघड बोलून दाखविलें होतें! नेपोलियन जेव्हां **पॅरिस**मध्यें आला, तेव्हां त्याला हें स्थित्यंतर कळून आलें. अर्थात्च त्याच्या महत्वाकांक्षेस मोठें चालन मिळून त्यानें तेथील राजसंस्थेचें आधिपत्य मिळवि-ण्याचा घाट घातला. परंतु ही गोष्ट रक्ताचा एक थेंबही न सांडतां केवळ सत्ताधाऱ्यांचीं मनें वळवून करावयाची, असा त्याचा उद्देश असल्यामुळें तो **पॅरिस**मध्यें येतांच प्रथम कांहीं दिवस स्वस्थ बसला. या काळांत त्यानें तेथील मोठमोठ्या विद्वान लोकांशीं स्नेहसंबंध करून आपल्याविषयीं त्यांचें मन अनुकूल करून घेतलें. नेपोलियनची बुद्धिमत्ता चतुरस्र असल्यामुळें व त्याचें वाच-नही अगाध असल्यामुळें ह्या विद्वान लोकांत मिसळून त्यांच्याशीं निरनिराळ्या विषयांवर चर्चा करून त्यांच्यावर आपलें वजन बस-विण्यास त्यास फारसा वेळ लागला नाहीं. पुढें लवकरच डायरे-क्टरांपैकीं मुख्य जो **साइस** तो त्यास अनुकूल झाला व त्याच्या-

शीं संगनमत करून नेपोलियननें तत्कालीन शासनसंस्थेंत क्रांति घडवून आणण्याची योजना ठरविली. ती योजना अशीः--

'देशामध्यें (पॅरिसमध्यें) **जॅकोबिन** लोकांनीं सरकारची उलथापालथ करण्याकरितां एक मोठा गुप्त कट केला आहे, अशी बातमी शहरांत पसरावी; व ह्या कटापासून सत्ताधारी लोकांचें संरक्षण व्हावें म्हणून सर्व डायरेक्टर्स, दोन्ही राजसभा व कौन्सिल यांनीं पुढील संकेत ठरविण्याकरितां **पॅरिस**पासून कांहीं अंतरावर असलेल्या **सेंट क्लाउड** येथील राजवाड्यांत जमावें. याच सुमारास डायरेक्टर्स लोकांनीं राजीनामे द्यावेत, व एक निराळें तात्पुरतें राज्ययंत्र स्थापन करण्यास वरील सभांची अनुमति—त्यांचें मन वळवून अगर धाकदपटशा देऊन—मिळवावी.' आपला हा बेत सिद्धीस नेण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीं त्यानें सर्व लष्करी अंमलदार व **पॅरिस**चें सैन्य आपल्या विश्वासांत घेऊन त्यांच्या निष्ठेबद्दल आपली खातरजमा करून घेतली होती. वरील संकेत ठरतांच **फोचे** नामक मुख्य पोलीसअधिकाऱ्याकडून नेपोलियननें जॅकोबिन लोकांच्या कटाची व भावी बंडाची बातमी अधिकारीवर्गांत पसरविली. लागलीच साईस यानें वड्या लोकांच्या सभेंतील सभासदांस ह्या प्रसंगास तोंड देण्याची पुढील योजना करण्याकरितां आणि राज्यसंस्था सुरक्षित राखण्याकरितां **सेंट क्लाउड**च्या राजवाड्यांत चलण्याची विनंती केली. ह्या सभेवर **साईस**चें मोठें वजन असल्यामुळें सभासदांनीं त्याची विनंती तत्काळ मान्य केली. सामान्य लोकांच्या सभेचा अध्यक्ष नेपोलियनचा भाऊ लुई हा होता, या-

मुळें त्या सभेचें मन वळविण्यासही फारशी अडचण पडली नाहीं. याप्रमाणें **सेंट क्लाउड** येथें सदर दोन्ही सभा भरल्यानंतर **साईस, ड्युकॉस व बॅरास** ह्या तीन डायरेक्टरांनीं राजीनामे दिले. इतक्यांत नेपोलियनही तेथें ससैन्य येऊन पोहोंचला. तेथें प्रथम बड्या लोकांच्या सभेंत नेपोलियनला जॅकोबिन कटाची माहिती विचारण्यांत येऊन भावी उपायासंबंधीं चर्चा झाली. बराच कडाक्याचा वादविवाद झाल्यानंतर नेपोलियन सुचवील त्याप्रमाणें वागण्याचें ह्या सभेनें कबूल केलें. परंतु सामान्य लोकांच्या सभेंत नेपोलियनला यश येण्याचा रंग दिसेना, तेव्हां त्याचा भाऊ रागानें आपली जागा सोडून सभाग्रहाच्या बाहेर आला व त्यानें सैन्याची हालचाल करण्याबद्दल नेपोलियनला इशारत दिली. नेपोलियनचें सैन्य तयारच होतें. त्यानें लागलीच सदर सभा मोडून बरखास्त केली. बरखास्त केली, असें म्हणण्यापेक्षां सैन्याची हालचाल होतांच सदर सभेचे सभासद सैरावैरा पळत सुटल्यामुळें आपोआपच ती बरखास्त झाली असेंच म्हणणें अधिक शोभेल. लष्करी सामर्थ्याचें असें प्रदर्शन होतांच सदर सभेंतील बहुतेक सभासद निमुटपणें नेपोलियनच्या योजनेस कबूल झाले; आणि दुसरे दिवशीं सकाळीं वरील दोन्ही सभांच्या प्रतिनिधींनीं एकत्र जमून त्याच्या योजनेस आपली अनुमति दिली. या योजनेच्या अन्वयें नेपोलियन हा फ्रान्सचा **फर्स्ट कॉन्सल** ऊर्फ **डिक्टेटर** बनला व त्याच्या मदतीस **साईस** व **ड्युकॉस** हे आणखी दोन **कॉन्सल** देण्यांत आले. ह्या तिघांचें एक तात्पुरतें राज्ययंत्र ऊर्फ सरकार नेमण्यांत येऊन भावी शासन-

पद्धति ठरविण्याचे व ती अंमलांत येईपर्यंत राज्य चालविण्याचे सर्व अधिकार ह्या नव्या सरकारास देण्यांत आले. याप्रमाणें ही क्रांति नेपोलियनच्या इच्छेबरहुकुम व रक्तपात न होता घडून आली. ही नवीन झालेली क्रांति लोकांत जाहीर होतांच त्यांनीं मोठ्या आनंदानें ती मान्य केली; व नेपोलियनचा जिकडे तिकडे मोठा गौरव होऊं लागला. कांहीं थोड्या उत्कट लोकसत्तावाद्यांस नेपोलियनच्या हातीं गेलेली अनियंत्रित राजसत्ता पसंत नव्हती; परंतु शेंकडा ९० लोकांना ही व्यवस्था मान्य असल्यामुळें त्यांना ह्या वेळीं मूग गिळून स्वस्थ बसणें भाग पडलें. फ्रान्सच्या राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें झाली ही व्यवस्था योग्य झाली. या वेळीं फ्रान्सला अशाच प्रकारची राज्यसंस्था पाहिजे होती; अर्थात् त्यांत नेपोलियनचा हेतु स्वार्थपर जरी असला तरी त्याबद्दल त्यास दोष देण्याचें कांहीं विशेष कारण नाहीं, असें अनेक सन्मान्य इतिहासकारांचें मत आहे. असो. ही क्रांति झाल्यानंतर सुमारें

---

१ नेपोलियनचें हें कृत्य कितपत योग्य अगर अयोग्य होतें, याचा निर्णय वाचकांस करितां यावा म्हणून, वरील बनाव घडून आल्यानंतर त्याचें एका माजी डायरेक्टराच्या सेक्रेटरीशीं झालेलें बोलणें येथें देतों. त्यावरून वाचकांना तत्कालीन स्थितीचा बोध होऊन ह्या विषयासंबंधीं स्वतंत्रपणें मत बनवितां येईल. सदर सेक्रेटरीस तो म्हणाला:—“ भरभराटीच्या स्थितींत मीं ठेवलेल्या फ्रान्सचें माझ्या पश्चात् तुम्हीं काय केलें ? मीं तुम्हांस शांतता संपादन करून दिली होती, तेथें आतां युद्धाची घनचक्री सुरू आहे. मीं तुम्हांस विजय संपादून दिले होते, तर आतां मला जिकडे तिकडे पराभव

एक महिन्यानें **साईस** यानें नव्या शासन-पद्धतीचा एक मसुदा ( Draft coustitution ) तयार केला. फ्रान्सच्या इतिहासांत 'आठव्या वर्षाची कॉन्स्टिटय़ूशन' ह्या नांवानें हा मसुदा प्रसिद्ध आहे. या मसुद्यामध्यें नेपोलियननें आपल्या इच्छेनुसार अनेक फेरफार केले व **साईस** यानेंही त्यास विरोध केला नाहीं. मात्र नवीन फेरफारांमुळें दुसऱ्या दोन **कॉन्सलची** सत्ता कमी होऊन ते केवळ नेपोलियनचे सल्लागार होणार असल्यामुळें **साईस** व त्याचा मित्र **ड्युकास** यांनीं **कॉन्सलच्या** जागेचे राजीनामे दिले त्या जागीं नेपोलियननें **कँबेसेरेस्** ( हा न्यायशास्त्रवेत्ता होता. ) व **लेब्रन** ( हा जुन्या राजपक्षांतील हुषार व विद्वान् अधिकारी होता. ) या दोन गृहस्थांची नेमणूक केली. हे दोन्ही गृहस्थ त्याचे चहाते असून त्याच्या तंत्राप्रमाणें वागणारे होते. ह्या नव्या शासनपद्धतीचीं प्रमुख अंगें म्हटलीं म्हणजे, ( १ ) **ट्रिब्युनेट** ( २ ) **सेनेट** ( ३ ) **कौन्सिल ऑफ स्टेट**, अशीं तीन होतीं. नवीन कायद्यांचे मसुदे तयार करण्याचा व ते पुढें आणण्याचा अधिकार 'कौन्सिल ऑफ स्टेट' ह्या संस्थेकडे होता. ह्या संस्थेचा अध्यक्ष ऊर्फ 'फर्स्ट कॉन्सल' नेपोलियन हा होता. ह्या कायद्यांची चर्चा करण्याचा अधिकार 'ट्रिब्युनेट' ह्या संस्थेला होता; परंतु त्यासंबंधानें मत देण्याचा अधिकार तीस नव्हता. ( ही संस्था बडया

---

दिसत आहे. इतालींतून आणलेली अपार संपत्ति मीं तुमच्या स्वाधीन केली होती, परंतु आतां देशांत सर्वत्र कंगालपणा व दैन्य पसरलेलें दिसत आहे ! ''

लोकांच्या सभासदांची होती. ) मत देण्याचा अधिकार 'सेनेट' ह्या संस्थेला होता; परंतु तिला वादविवाद करण्याचा अधिकार नव्हता. याखेरीज अंमलबजावणीखात्याची 'सुप्रीम एक्झुकेटिव्ह कमेटी' नांवाची आणखी एक संस्था होती व तिचा अध्यक्षही नेपोलियन हाच होता. कँबेसेरेस व लेब्रन हे वर सांगितलेले नेपोलियनचे भक्त ह्या कमेटीचे दुसरे सभासद होते. राज्यकारभारासंबंधीं सर्व सत्ता 'फर्स्ट कॉन्सल' उर्फ नेपोलियन याच्या हातीं दिलेली होती. प्रधान व अधिकारी यांची नेमणूक करणें, राज्यकारभाराचें नियमन करणें व त्याचें धोरण ठरविणें वगैरे बाबींसंबंधीं सर्व सत्ता कायदेशीर रीतीनें नेपोलियनच्या हातीं आलेली होती. आणि ही सर्व सत्ता लोकमतानुसार त्याचेकडे आली होती. नवीन शासनपत्रिकेच्या मसुद्यांत फ्रान्सची राजसत्ता तेथील जनतेची असल्याबद्दलचें कलम होतें व तें नेपोलियनला मान्य करावें लागलें. अर्थात्, त्याला ही जी सर्व प्रकारची सत्ता मिळाली, ती जनतेचा लायख प्रतिनिधि ह्या नात्यानेंच मिळाली, हें उघड आहे. प्रथम प्रथम तरी त्यानें ह्या सत्तेचा फार चांगला उपयोग केला व त्यामुळें त्याच्या हातून फ्रान्सचें कायमच्या स्वरूपाचें असें पुष्कळच हित झालेलें आहे.

नेपोलियननें वरीलप्रमाणें जेव्हां फ्रान्सचीं सर्व राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं, तेव्हां प्रथम त्याला जी मोठी सुधारणा करावी लागली, ती जमाबंदी खात्याची होय. फ्रान्सच्या तिजोरीची फार दुर्दशा झाली असल्यामुळें प्रथमतः राज्यकारभारास अवश्यक

असणाऱ्या पैशाची सोय करणें त्यास भाग होतें. जुन्या सरकारनें वसुलाच्या बाबतींत विषम व चमत्कारिक नियम करून अविश्वास व बखेडा उत्पन्न केला होता; तो प्रथम नेपोलियननें मोडून टाकला. **गॉदिन** नामक एका माजी राजवटींतील तज्ज्ञ मनुष्याची ह्या कामावर नेमणूक करून त्यानें वसुलाच्या नियमांची व त्यांचा उपयोग करण्याच्या पद्धतीची सुधारणा केली. त्यामुळें नवीन सरकाराबद्दल लोकांचे मनांत आदर व विश्वास उत्पन्न होऊन सरकारी नोटांची योग्य किंमत येऊं लागली. '**बँक ऑफ फ्रान्स**' आणि '**सिंकिंग फंड** ( बुडितफंड )' ह्या दोन संस्था **गॉदिननें** स्थापल्या. मागील सरकारांनीं नाकबूल केलेल्या राष्ट्रीय कर्जापैकीं दोनतृतीयांश कर्ज कबूल करून तें फेडण्याचीही त्यानें व्यवस्था केली. करांचे बाबतींत असलेली विषमता दूर करून सर्वांवर समान तत्वांच्या आधारें योग्य कर बसविले व ते वसूल करण्याचे मार्गही सुधारण्यांत आले. याप्रमाणें **गॉदिनच्या** मदतीनें नेपोलियननें जी जमाबंदीची पद्धत व शिस्त घालून दिली ती पुष्कळ अंशानें अद्यापही तेथें चालू आहे. यावरून ह्या पद्धतीचें महत्व वाचकांच्या लक्षांत येईल. जमाबंदीची अशी सुव्यवस्था केल्यावर लवकरच सांपत्तिक दृष्ट्या फ्रान्सची भरभराट झालेली दिसूं लागली. त्यामुळें नेपोलियनची लोकप्रियता फारच वाढली. यानंतर **लाव्हेंडी** परगण्यांतील अस्वस्थतेकडे तो वळला. या परगण्यांतील लोक **कॅथोलिक** धर्माचे कट्टे अभिमानी असल्यामुळें माजी लोकसत्ताक सत्ताधिकाऱ्यांना त्यांनीं वरचेवर त्रास दिला होता. हा प्रांत इंग्लंडच्या किनाऱ्या-

नजिक असल्यामुळें व तेथें फ्रान्सच्या माजी राजाचे अनेक पक्ष-पाती असल्यामुळें त्यांच्या साह्यानें हे लोक फ्रेंच राष्ट्रीय सत्तेस वारंवार विरोध करीत. त्यांचा बंदोबस्त करण्याचें काम डायरेक्टरीच्या हातून व्हावें तसें झालें नाहीं; त्यामुळें ते प्रबळ होऊन बंड करण्यास प्रवृत्त झाले होते. त्यांचा पुरा मोड करण्याचें ठरवून सुमारें ६० हजार सैन्यासह नेपोलियननें त्यांच्यावर चाल केली व बंडाचा मुख्य गंड क्रूरपणानें मोडून टाकल्यावर त्यानें बंड-वाल्यांच्या पुढाऱ्यांस सहनशीलता, तडजोड आणि न्याय इत्यादि प्रकारांनीं आपणास अनुकूल करून घेतलें! त्या प्रांतांतील सर-दार व बडे लोक आणि धर्मोपदेशक यांना जाचक होणारे अन्या-याचे कायदे त्यानें रद्द केले, व इतरांप्रमाणें त्यांनाही राष्ट्रीय काय-द्यान्वयें मिळणारें व्यक्तिस्वातंत्र्य प्राप्त करून दिलें. या धोरणामुळें एखाददुसऱ्या अपवादात्मक व्यक्ति खेरीज करून ह्या प्रांतांतील सर्व लोक शांत व संतुष्ट बनले. हेंच धोरण त्यानें फ्रान्सांतून बाहेर निघून गेलेल्या इतर राजपक्षीय लोकांसंबंधानेंही स्वीकारलें. जे लोक तत्कालीन कायदे पाळण्यास कबूल असतील त्यांच्यावर कोण-ताही जुलूम होणार नाहीं व त्यांना मागील अपराधाबद्दल शासन करण्यांत येणार नाहीं, असें त्यानें फर्माविलें. त्यावरून परदेशीं गेलेले हजारों फ्रेंच लोक स्वदेशांत येऊन सुखानें नांदूं लागले. धर्माच्या बाबतींतही त्यानें पूर्वींचे कडक कायदे सौम्य करून लोकांचा संतोष संपादन केला. पूर्वींच्या राजवटींत बंद झालेलीं सार्वजनिक देवालयें यानें प्रार्थनेकरितां पुन्हा खुलीं केलीं व ख्रिस्ती

धर्माचा मुख्य धर्मगुरु जो पोप त्याच्याविषयीं आदर व्यक्त केला. त्याचें ह्या बाबतींतलें धोरण इतकें लोकप्रिय झालें कीं, **बोरबोन** राजाच्या सिंहासनावर हक्क सांगणाऱ्या राजपुत्रासही ( पुढें हाच १८ वा लुई बनला. ) नेपोलियन आपल्यास मदत करील असा भ्रम उत्पन्न झाला व त्यानें एक आशायुक्त आणि स्तुतिपर पत्र नेपोलियनला लिहिलें. नेपोलियननें त्याचा हा भ्रम तत्काळ दूर केला. फ्रान्सच्या जगत्प्रसिद्ध क्रांतीचें समर्थन करणें हेंच आपलें कर्तव्य असल्यामुळें तुम्ही भलतीच आशा धरल्यास त्या कामीं तुम्हांस माझेकडून मदत मिळणार नाहीं, असें त्यानें त्या राजपुत्रास स्पष्ट कळविलें. फ्रेंच राज्यक्रांतीचें समर्थन करणें हें आपलें कर्तव्य आहे असें जरी नेपोलियन मानीत होता, तरी **जॅकोबिन** पक्षाच्या ज्या एका उपपक्षानें सदर क्रांतीला, अत्याचार करून डाग लावला होता, त्या पक्षाच्या लोकांस त्यानें तिळमात्र दया दाखविली नाहीं. इ. स. १८०० च्या २४ दिसेंबरला एका जुन्या राजपक्षीय पुढाऱ्यानें कट करून नेपोलियन नाटकास जात असतां त्याजवर बॉंब टाकून त्यास ठार मारण्याचा यत्न केला; पण तो सफळ झाला नाहीं. ह्या प्रसंगाची सवड साधून, कटवाल्यांना शिक्षा दिल्या तेव्हांच, नेपोलियननें वरील पक्षाचे उत्पातप्रिय असे १३० लोक एकदम हद्दपार केले ! तात्पर्य जेथें सौम्यपणा धरून कार्य होण्यासारखें होतें तेथें सौम्यपणा, व जेथें कठोरपणा पाहिजे तेथें कठोरपणा धारण करून त्यानें आपलें वजन व दरारा वाढवून फ्रेंच लोकांना सुराज्याची जोड करून दिली. नेपोलियनच्या ह्या वेळच्या

धोरणाचा आणखी एक मुख्य विशेष असा होता कीं, त्यानें राजकीय दृष्टया कोणास वरिष्ठ व कोणास कनिष्ठ असें कधींच मानलें नाहीं. सरदार असो, धर्मगुरू असो, कीं सामान्य रयत असो; कायद्याच्या दृष्टीनें सर्वांची योग्यता सारखीच मानली जात असून ज्याच्या अंगीं पात्रता असेल त्यास राज्यकारभारांतील पाहिजे त्या वरिष्ठ जागेवर नेमलें जात असे. तसेंच त्याच्या पूर्वींच्या अंमदानींत जें पक्षभेदाचें प्राबल्य माजलें होतें, तेंही त्यानें अगदीं मोडून टाकलें. ह्या बाबतींतही ‘ पात्रता ’ हीच त्याची कसोटी होती. नेपोलियनची स्वतःची पात्रताही फार मोठी होती. राज्यकारभारांतील बहुतेक सर्व बाबींचा खल, संघटना व त्यांवर देखरेख या गोष्टी तो स्वतः करीत असे. प्रत्येक खात्यासंबंधीं त्यानें इतके सुंदर व शिस्तीचे नियम घालून दिले होते कीं, त्या त्या खात्याचें काम जणूं काय एखाद्या यंत्राप्रमाणें चालत असे. हाताखालचे सेक्रेटरी व त्यांचे कारकून यांच्यावर त्याची इतकी जबर होती कीं, त्यांच्या हातून किंचित् ढिलें वर्तन होऊं लागतांच त्यांच्या डोळ्यापुढें त्याची मूर्ति उभी राहिल्याचा त्यांस भास होई ! त्याचा इतका दरारा बसण्याचें कारण तो प्रत्येक खात्यांतील खांचाखोंचा जाणणारा व दीर्घोद्योग करणारा होता. कोणतेंही प्रकरण त्याजकडे जाऊं द्या; त्याच्या मुळाशीं जाऊन सर्व बाजूंनीं सांगोपांग विचार केल्यावांचून तो त्याचा निकाल कधींही करावयाचा नाहीं; आणि हें सर्व तो अगदीं इतक्या थोडया वेळांत करीत असे कीं, त्याचें तें चापल्य, उत्साह व सहजस्फूर्ति

पाहून त्याच्या समीप असलेले लोक थक्क होऊन जात असत ! दिवसांतून १८ तास काम करण्यासही तो कधीं कधीं तयार असे. कौन्सिलच्या बैठकी तर तो वारंवार आठ आठ, दहा दहा तास सारखा चालवी व त्यांत बोलण्याचें विशेष काम त्याजकडेच असे ! इतकें काम करूनही त्यास कधीं थकवा अगर औदासीन्य येत नसे ! रात्रीच्या अगर सकाळच्या कोणत्याही वेळीं त्याच्याकडे कोणी गेलें तरी त्याच्याशीं बोलतांना त्याचा नेहमींचा उत्साह व तरतरी त्याच्या अंगीं असलेली दिसून येत असे. मुद्द्याशिवाय वायफळ भाषण तो कधीं करीत नसे. निरनिराळ्या तज्ज्ञ लोकांशीं वादविवाद करितांना त्यांची तो अगदीं कसून उलटसुलट तपासणी करीत असे. आहारविहाराच्या बाबतींत तो अगदीं नेमस्त असल्यामुळें त्याचें शारीरिक व मानसिक सामर्थ्य विलक्षण होतें; आणि त्यामुळें उद्योगशीलतेच्या बाबतींत त्याच्या हाताखालच्या सर्व अधिकाऱ्यांस तो कित्त्याप्रमाणें होता. अर्थात्, त्या सर्वांवर त्याचें दांडगें वजन व वर्चस्व बसलें होतें. शिवाय त्याचा आत्मविश्वास तर फारच दांडगा होता. कोणत्याही एखाद्या महत्वाच्या प्रश्नावर जेव्हां त्याच्या सल्लागारांचा व त्याचा मतभेद होई, तेव्हां तो आपलें डोकें खाजवून म्हणे कीं, 'विद्वान् व अनुभविक म्हणून ठरलेल्या लोकांच्या सल्ल्यापेक्षां माझ्या ह्या मस्तकांतील बुद्धिरूपी यंत्रच माझ्या विशेष उपयोगाचें आहे.' त्याची ग्रहणशक्ति व स्मरणशक्ति फार तीव्र होती. तसेंच त्याची इच्छाशक्ति अत्यंत प्रबल व कार्यक्षम होती. जमाखर्चाच्या व हिशेबाच्या बाबींत तर

तो फारच कडक होता. एक पैचीही कोठें चूक झाली अगर अपव्यय झाला तर त्याला खपत नसे ! त्याची लेखनपद्धति सतेज, परिणामकारक व औचित्यपूर्ण अशी होती; व त्याची वाणी रसाळ आणि उद्दीपक होती. ह्या दोहोंतही चैतन्य ऊर्फ जिवंतपणा होता. त्याच्या खलित्यांतील कोणताही भाग कोणत्याही वेळीं जरी कोणी वाचला, तरी त्यापासून त्याच्या विवक्षित मनोवृत्ति जागृत झाल्यावांचून रहात नाहींत. अशा प्रकारच्या प्रतिभावान् मनुष्याचे हातून फ्रेंच लोकांच्या आकांक्षा तृप्त होऊन त्यांना सुराज्याचा लाभ व्हावा हें अगदीं साहजिक आहे. असो; फ्रान्सच्या अंतःस्थ स्थितीची सुधारणा करण्याचें काम सुरू असतांना नेपोलियनला बाह्य शत्रूंशींही तोंड देणें भाग होतें. फ्रान्सचीं राज्यसूत्रें हातीं घेतल्यावर लवकरच त्यानें इंग्लंड व ऑस्ट्रिया या दोन राष्ट्रांशीं तहाचें बोलणें सुरू केलें; परंतु इ० स० १७९९ मध्यें फ्रेंच सैन्याचा नेपोलियनच्या गैरहजिरींत पुष्कळदां पराभव झालेला असल्यामुळें सदर राष्ट्रांनीं नेपोलियनचें तहाचें बोलणें फेटाळून लावलें. अर्थात्, युद्धावांचून त्यास दुसरें गत्यंतर नव्हतें. तथापि या वेळीं आस्ट्रियाखेरीज दुसरें कोणतेंही राष्ट्र फ्रान्सवर स्वारी करण्यास प्रत्यक्ष समरभूमीवर आलेलें नव्हतें. ऑस्ट्रियानें मात्र जर्मनीच्या व इतालीच्या बाजूनें फ्रान्सवर हल्ला करण्याकरितां आपलें सैन्य पाठविलें होतें. ह्या सैन्याशीं तोंड देण्याकरितां नेपोलियननें आपलें सैन्य तयार केलें. त्याच्या ह्या सैन्यांत नवशिक्या लोकांची पुष्कळ भरती होती. परंतु त्यानें मोठ्या

परिश्रमानें त्यांस शिकवून तरबेज केलें होतें. तसेंच **मासेना, मोरयू** वगैरे हुषार सेनानी त्याच्या हाताखालीं असल्यामुळें व स्वतःचे सैन्यावर त्याचें मोठें वजन असल्यामुळें त्यानें नेहमींप्रमाणें दृढ आत्मविश्वास बाळगून शत्रूवर जर्मनी व इताली या दोन्ही बाजूंनीं हल्ले करण्याची तयारी केली. त्याची ह्या वेळची हल्ल्यांची योजनाही लष्करी डावपेंचाचा एक उत्कृष्ट नमुना आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. ह्या युद्धाचें अखेर पर्यवसान **मारेंगो** येथील लढाईंत होऊन त्यांत शत्रूचें सैन्य दिढीनें मोठें असतांही याच्या सैन्यानें विजय मिळविला! मात्र ह्या लढाईंत त्याचा एक पराक्रमी व हुषार जनरल ( **देसेक्स** ) गमावला! आणि त्यांत विशेष दुःखाची गोष्ट ही कीं, याच्याच प्रसंगावधानामुळें नेपोलियनला हा विजय मिळाला होता ( १४ जून स. १८०० ). अर्थात् ह्याच्या मृत्यूमुळें त्यास फार दुःख झालें हें उघड आहे. ह्या विजयानंतर लढाई कांहीं दिवस तहकूब राहिली. परंतु जर्मनीच्या बाजूला अद्याप बलिष्ठ आस्ट्रिया असल्यामुळें तहाकडे त्याची प्रवृत्ति होईना. अर्थात् पुढील हिंवाळ्यांत पुन्हा लढाईस सुरवात झाली. ही लढाई जर्मनीच्या बाजूस **बव्हेरियाच्या** जंगलांत सुरू झाली; व त्यांतही फ्रेंच सेनापति **मोरयु** यानें **होहेनलिंडेन** येथें आस्ट्रियन सैन्याचा पुरा मोड केला ( ता. ३ डिसेंबर स. १८०० ). हा विजय संपादल्यानंतर **मोरयु** आस्ट्रियाच्या राजधानीवर चाल करण्यास निघाला. **व्हियेन्ना** शहरानजिक जेव्हां तो येऊन पोंचला, तेव्हां आस्ट्रियन सेनापतीचा अगदीं नाइलाज होऊन त्यानें तहाची

मागणी केली. तेव्हां खरोखर तह करण्याचा आस्ट्रियाचा विचार आहे, अशाबद्दल खात्री करून घेऊन त्यानें आपली तरवार म्यानांत घातली. पुढें लवकरच लुनेव्हिली ( लॉरेन प्रांताचें मुख्य शहर ) येथें उभय पक्षांचे वकील येऊन तहाचें काम पूर्ण झालें. ह्या तहामुळें फ्रान्सचें वैभव अतोनात वाढलें व तितक्याच मानानें ऑस्ट्रियाची हानि व मानखंडना झाली. मारेंगोच्या लढाईनंतर जर ऑस्ट्रियानें तत्काळ तह केला असता, तर कदाचित् त्याची इतकी अप्रतिष्ठा झाली नसती. परंतु त्या वेळीं तहाचे बाबतींत त्यानें ज्या हुलकावण्या दाखविल्या, त्यांचें पुरें प्रायश्चित्त त्यास देण्याकरितां नेपोलियननें ह्या वेळीं पुष्कळ सक्तीच्या अटी घालून त्या त्याजकडून मान्य करून घेतल्या. '**फ्रेंच मुत्सद्याच्या हातून इतका वैभवशाली तह कोणत्याही काळांत घडून आला नाहीं!**' असें एका इंग्रज इतिहासकाराचें मत आहे. ह्या तहामुळें फ्रान्सला ऱ्हाईन नदीच्या पश्चिम तीरावरील भाग, बेलजम देश व इतालीचा बहुतेक भाग मिळाला. आद्रियाटिक समुद्राच्या किनाऱ्यापासून नेदर्लंडच्या किनाऱ्यापर्यंत फ्रान्सची सत्ता स्थापन झाली. अर्थात् त्यामुळें त्याचें इ० स० १७९९ तलें दौर्बल्य नष्ट होऊन युरोपखंडात त्याचें विशेष महत्व वाढूं लागलें. याप्रमाणें आस्ट्रियाचा पराभव केल्यानंतर रशियाचा झार पहिला पॉल याच्या मदतीनें इंग्लंडचा समाचार घेण्याची एक योजना नेपोलियननें केली होती; परंतु ती परिणत स्वरूपास पोंचण्यापूर्वींच झारचा खून झाल्यामुळें व त्याचा पुत्र अलेक्झांडर यानें निराळेंच

धोरण स्वीकारल्यामुळें ती जागच्या जागींच जिरली. तेव्हां इंग्लंडला शह देण्याची नेपोलियननें एक दुसरी शक्कल काढली. फ्रान्सचें कांहीं सैन्य इजिप्तमध्यें कोंडलें गेलें होतें, हें वाचकांस माहीत असेलच. या सैन्याचा अधिपति क्लेबर यानें तुर्की लोकांवर विजय मिळविला, परंतु त्या लढाईंत तो पडला. तथापि त्याचा दुय्यम जो मेनॉ त्यानें इजिप्तचा जिंकलेला प्रांत ताब्यांत घेऊन सुव्यवस्था राखली होती. ह्या सैन्याच्या मदतीस नवें सैन्य पाठविण्याचा नेपोलियननें घाट घातला. असें केल्यास इंग्लिशांचें आरमार तिकडे जाऊन आपणांस इंग्लंडवर स्वारी करण्याची संधी मिळेल, असा नेपोलियनचा समज होता. परंतु फ्रेंच सैन्य निघण्यापूर्वींच माल्टा येथील इंग्रजी सैन्यानें इजिप्तच्या किनाऱ्यावर स्वारी करून तेथील तुर्की व एका हिंदी पलटणीच्या साह्यानें फ्रेंच सरदाराचा पराभव करून त्यास शरण आणलें; व त्याच्या विनंतीवरून सर्व फ्रेंच सैन्य इंग्लिश आरमारानें फ्रेंच किनाऱ्यावरील तुलोन बंदरांत आणून सोडलें. इकडे नेलसन यानेंही उत्तरसमुद्रांत कोपेनहेगेन येथें डॅनिश आरमाराचा विध्वंस करून तें शहर आपल्या ताब्यांत घेतलें. याप्रमाणें जरी इंग्लंडनें विजय मिळविले, तरी आस्ट्रिया, प्रशिया व जर्मनी यांचा व फ्रान्सचा तूर्ततूर्त तरी स्नेह जमलेला असल्यामुळें फ्रान्सविरुद्ध इंग्लंड एकटेंच उरलें होतें. अशा स्थितींत फ्रान्सशीं विरोध करणें इंग्लंडला धोक्याचें वाटत होतें. शिवाय इजिप्तच्या विजयामुळें त्याचें समुद्रावरचें वर्चस्व कायम झालें होतें. हिंदुस्थानांतील त्याच्या वर्चस्वासही आतां फ्रेंचांकडून धक्का

बसण्याचा संभव नव्हता. कारण इजिप्त फ्रेंच सैन्यानें खालीं केल्या दिवसापासून नेपोलियनच्या हिंदुस्थानविषयक आकांक्षेचा अंकुर करपून गेला होता. ह्या सर्व कारणांमुळें यापुढें युद्ध चालू ठेवण्यापेक्षां तह करण्याकडेच इंग्लिशांची विशेष प्रवृत्ति झाली होती. नेपोलियनलाही ह्या वेळीं इंग्लंडशीं तह करणेंच सोईचें होतें. ह्याप्रमाणें दोन्ही पक्षांची एकच मनीषा झाल्यामुळें इ. स. १८०२ च्या मार्चमध्यें उभयराष्ट्रांत **आमेन्स** येथें तह झाला. हा तह दोन्ही पक्षांस मोठासा समाधानकारक वाटत नव्हता. परंतु दोन्ही राष्ट्रें लढाईला कंटाळून गेलेलीं असल्यामुळें त्यांनीं कसें तरी करून तूर्तातूर्त युद्ध टाळलें!

# प्रकरण ६ वें.

## नेपोलियनच्या वैभवाची अभिवृद्धि.

**आमेन्सच्या** तहानंतर युरोपमध्यें जिकडे तिकडे शांतता होऊन नेपोलियनला फ्रान्सच्या अंतःस्थ स्थितींत आणखी विशेष महत्वाच्या सुधारणा करण्यास अवकाश सांपडला. या सुधारणांपैकीं पहिली महत्वाची सुधारणा स्थानिक स्वराज्यासंबंधाची होय. राज्यक्रांतीपूर्वीं फ्रान्सांतील स्थानिक स्वराज्य लुप्तप्राय झालेलें होतें. व क्रांतीच्या वेळीं स्थापन झालेल्या सरकारानें त्यांत प्रतिक्रियारूपानें जो फेरफार केला, त्यास पुढें स्वैरपणाचें स्वरूप येऊन फ्रान्सचा प्रत्येक भाग ( असे ४० भाग होते. ) आपल्या इच्छेनुसार स्वतंत्रपणें वागूं लागला होता. त्यांच्यावर पॅरिसच्या मुख्य

व मध्यवर्ती सत्तेचा दाब राहीनासा झाला होता. यामुळें जिकडे-तिकडे बजबजपुरी माजून गेली होती. ही स्थिति फ्रान्सच्या राष्ट्रीय संघटनेस विघातक होण्यासारखी होती. किंबहुना तिचे अनिष्ट परिणाम पूर्वीच्या सरकारास भोगावेही लागत होते असें म्हटलें तरी चालेल. **नेपोलियननें** ही अव्यवस्थित स्थिति मोडून टाकली. त्यानें पूर्वीचे ४० विभाग मोडून सोयीस्कर असे थोडेच विभाग केले, व त्या प्रत्येक विभागास जरी पूर्वीच्या स्थानिक स्वराज्याच्या संस्था त्यानें दिल्या, तरी त्यांची सत्ता त्यानें बरीच मर्यादित केली. ह्या प्रत्येक विभागांत व तेथील मुख्य शहरांत त्यानें आपले अधिकारी नेमून दिले व त्यांच्या देखरेखीखालीं हीं स्थानिक स्वराज्यें रहावींत अशी योजना केली. त्यामुळें मध्यवर्ती मुख्य सत्तेचा सर्वत्र दाब राहून राज्यकारभाराचें काम सुयंत्रितपणें चालूं लागलें. **नेपोलियननें** केलेली ही व्यवस्था पूर्ण लोकसत्तावादी लोकांस पसंत पडण्यासारखी नव्हती; परंतु फ्रेंच राष्ट्राची संघटना करून त्यास जोमदार करण्याकरितां त्या वेळीं त्याला वरीलप्रमाणें राजसत्तेचें केंद्रीकरण करणें भाग होतें. त्यानें केलेली ही व्यवस्था अद्यापही फ्रान्समध्यें चालू आहे; यावरून ती तेथील लोकस्थितीस अनुरूप अशीच आहे हें उघड होतें. अर्थात्, त्याबद्दल **नेपोलियनचें** अभिनंदन करणेंच जरूर आहे. त्याची दुसरी सुधारणा न्यायखात्यासंबंधीं होती. क्रांतिजन्य सरकारांनीं न्यायखात्यांतील अधिकाऱ्यांची नेमणूक सर्वस्वीं लोकांच्या मतांवर अवलंबून ठेवलेली असल्यामुळें स्वैराचारी स्थानिक स्वराज्यवाद्यांच्या लहरी-

प्रमाणें न्यायाधीशास वागावें लागे; व या पद्धतीमुळें न्यायाचे बाबतींत पुष्कळ ढिलेपणा व पक्षपात होत असे. **नेपोलियननें** पूर्वींची ' जस्टिस ऑफ दि पीस–' ची संस्था कायम ठेवली, पण तिचे अधिकार त्यानें मर्यादित करून मध्यवर्ती सत्तेशीं तीस संलग्न केलें. तसेंच त्यानें न्यायाचे बाबतींत स्वतंत्र व पूर्णपणें मुख-त्यार असलेलीं हायकोर्टें ठिकठिकाणीं स्थापन केलीं. त्यामुळें न्यायाचें काम चोख होऊं लागलें. दुय्यम प्रकारच्या न्याया-धीशाच्या नेमणुकी सरकारमार्फत करून त्यांनाही न्यायाचे बाब-तींत त्यानें स्वतंत्र अधिकार दिले. याप्रमाणें न्यायखात्यांतील सुधा-रणा केल्यानंतर तो फ्रेंच कायद्यांना व्यवस्थित स्वरूप देण्याच्या उद्योगास लागला. फ्रान्सच्या माजी ' नॅशनल असेंब्ली-'नें ऊर्फ राष्ट्रीयसभेनें हें काम हातीं घेऊन त्यासंबंधीं बरेच परिश्रम केले होते; परंतु पुढें जी अंदाधुंदी माजली, त्यामुळें हें काम तसेंच बंद पडलें होतें; तें नेपोलियननें हातीं घेऊन शेवटास नेलें. ह्या कामा-करितां त्यानें फ्रान्सच्या तत्कालीन कायदेपंडितांचें एक मंडळ नेमलें होतें व ह्या मंडळाच्या अध्यक्षस्थानीं तो स्वतः अनेक वेळ विराजमान होऊन उत्साहपूर्वक चर्चा व वादविवाद करीत असे. त्याचे हे वादविवाद व त्या वेळीं त्यानें केलेलीं भाषणें अद्याप अस्तित्वांत आहेत. तीं वाचलीं म्हणजे कोणासही त्याच्या कल्पनाशक्ती-विषयीं व बौद्धिक तेजाविषयीं सादर कौतुक वाटल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या मंडळानें परिश्रम करून जें कायद्यांचें ' कोड ' निर्माण केलें, त्यास '**द कोड-नेपोलियन**' अशी संज्ञा आहे. याचे, '**कोड**

सिव्हिल, कोड द कॉमर्स, कोड पेनल, व ‘कोड द इन्स्ट्रक्शन क्रिमिनेल’ असे ४ विभाग असून त्यांत फ्रान्सांतील सर्व कायद्यांचा संग्रह आहे. ह्या कोडाबद्दल खुद्द नेपोलियननेंच असे उद्गार काढले आहेत कीं, ‘माझें हें कोड माझ्या विजयाहूनही अधिक काल जिवंत राहील.’ आणि त्याचे हे उद्गार खरे ठरलेले आहेत! नेपोलियनचें साम्राज्य आज लयास गेलेलें दिसत आहे, परंतु त्याचें सदर कोड नुसत्या फ्रान्समध्येंच नव्हे तर युरोपांतील इतर देशांतही अस्तित्वांत आहे. इतकी त्याची रचना सुंदर झालेली आहे! राष्ट्रीय शिक्षणाचे बाबतींतही नेपोलियननें बऱ्याच सुधारणा केल्या. त्यानें खेड्यापाड्यांतून सरकारी खर्चानें प्राथमिक शिक्षणाच्या शाळा उघडल्या; दुय्यम प्रतीचे शिक्षणाकरितां मोठमोठ्या शहरीं शाळा स्थापन करून उच्च प्रकारच्या शिक्षणाकरितां एक विश्व-विद्यालयही स्थापन केलें. लष्करी व इतर कलांचें शिक्षण देण्याकरितांही त्यानें विशिष्ट प्रकारचीं विद्यालयें स्थापन केलीं. तथापि नेपोलियनचा काळ हा लष्करी सत्तेचा काळ असल्यामुळें त्या काळांत शिक्षण अगर विद्या यांचा फारसा प्रसार होण्याचा संभव कमी होता. नेपोलियनची या वेळची आणखी एक महत्वाची कामगिरी म्हटली म्हणजे ‘धर्मसंबंधीं बखेड्याचा निकाल’ ही होय. क्रांतीच्या पूर्वीं कॅथोलिक धर्माच्या उपदेशकांनीं व धर्मगुरूंनीं राजाश्रयाच्या बळावर लोकांस फार त्रस्त केलें होतें. सबब क्रांतिपक्षाच्या लोकांनीं ह्या लोकांचा नायनाट करून त्यांच्यापैकीं बऱ्याच लोकांना देशोधडीस लावलें होतें. त्यांच्या जमिनी काढून

घेऊन त्या सरकारमार्फत निरनिराळ्या कुळांस विकत अगर पट्ट्यानें दिलेल्या होत्या. व सार्वजनिक उपासना बंद करून त्यांच्या निर्वाहाचीं साधनें संपुष्टांत आणून ठेवलीं होतीं. धर्मोपासना बंद झाल्यामुळें बहुतेक लोक धर्मलंड अर्थात् स्वैराचारी बनलेले होते. ही स्थिति सुराज्यास अपायकारक असते, हें **नेपोलियन**ला ठाऊक होतें. सामान्य जनतेला सुव्यवस्थित (Orderly) ठेवण्यास धर्मश्रद्धा हें एक उत्कृष्ट साधन असल्यामुळें राज्ययंत्राचा (State) तो एक मोठा आधार आहे असें **नेपोलियन**चें मत होतें. म्हणून त्यानें धर्मोपदेशकांना पूर्वीची अनियंत्रित सत्ता मिळूं न देतां देशांत पुनः धर्मस्थापना करण्याची खटपट सुरू केली. हे लोकही आतां निराधार झालेले असल्यामुळें त्यांनाही अशी कांहीं तरी स्वतःची सोय झाल्यास हवीच होती. परंतु या बाबतींत कायमचा निर्णय करण्याचें काम **पोप**चें असल्यामुळें त्यानें **पोप**शीं याविषयीं वाटाघाट सुरू केली; व लवकरच उभयतांमध्यें एकमत होऊन 'कंकॉर्ड-' च्या रूपानें ह्या बखेड्याचा कायमचा निकाल लागला. त्या अन्वयें कॅथोलिक धर्म हा राष्ट्रीय धर्म मानण्यांत येऊन पूर्वी बंद केलेलीं सार्वजनिक देवालयें उपासनेकरितां उघडण्यांत आलीं. धर्माचे बाबतींत ह्या धर्मोपदेशकांना इतर लोकांप्रमाणेंच व्यक्तिस्वातंत्र्य देण्यांत आलें; परंतु राजकीयदृष्ट्या ते सर्वस्वीं तत्कालीन राजसत्तेचे अंकित होऊन राहिले. इतर जनतेप्रमाणें राष्ट्राचे कायदे पाळण्याचें बंधन त्यांनाही घालण्यांत आलें; व त्यांच्या योगक्षेमाकरितां सरकारनें त्यांचे पगारही ठरवून टाकले.

तसेंच त्यांच्या नेमणुकी करण्याचा अधिकारही सरकाराकडे देण्यांत आला. या व्यवस्थेमुळें एका बऱ्याच मोठ्या पक्षाचा फ्रेंच राजसत्तेशीं असलेला विरोध दूर झाला. परंतु फ्रान्सांतील लोकसत्तावादी पक्षास नेपोलियनचें हें ' कंकॉर्ड ' मुळींच आवडलें नाहीं. त्यांनीं त्याबद्दल त्याजवर त्या वेळीं बराच टीकेचा भडिमार केला. परंतु पुढें दीर्घकालानंतर, नेपोलियननें केलेली ही व्यवस्था राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें योग्य होती, असेंच भावी फ्रेंच पिढ्यांतील लोकांना आढळून आलें. याप्रमाणें नेपोलियनचा राज्य-कारभार जसजसा सुव्यवस्थित व लोकप्रिय होत चालला, तसतशी त्याची महत्वाकांक्षा जास्तच प्रबळ होत चालली. फ्रान्सच्या पूर्वींच्या राजांचें वैभव त्याच्या डोळ्यांपुढें येऊन त्याला त्या पदवीस जाऊन पोंचण्याचीं स्वप्नें पडूं लागलीं; किंबहुना, तो तशा थाटानें थोडा फार वागूंही लागला होता. त्याची ही प्रवृत्ति त्याच्या भोंवतालच्या व हाताखालच्या कांहीं लोकांस आवडेनाशी झाली. परंतु त्यांच्या अंगीं कर्तृत्वाचा अभाव असल्यामुळें व उलटपक्षीं नेपोलियनची कर्तृत्वशक्ति अचाट असल्यामुळें त्यांना मुकाट्यानें बसण्यावांचून व त्याची सत्ता मान्य करण्यावांचून गत्यंतर नव्हतें. बहुजनसमाज नेपोलियनकडे सादरकौतुकाच्या दृष्टीनें पहात होता. त्यांना सुख व शांतता यांचा लाभ त्यानें करून दिलेला असल्यामुळें ते त्याच्यावर अगदीं खूष होऊन गेले होते. शेतकरी लोकांच्या हक्कांचें त्यानें संरक्षण करून ते हक्क अबाधित केल्यामुळें हा वर्गही भरभराटीस येऊन त्यास दुवा देत होता. अशा

वेळीं कांहीं थोड्या व्यक्तींच्या कुरकुरीस कोण जुमानतो? व त्या कुरकुरीचा उपयोग तरी काय? नेपोलियननें फ्रान्सच्या हिताकरितां त्या वेळीं ज्या ज्या गोष्टी केल्या, त्यांपैकीं एकही करून दाखविण्याचें सामर्थ्य ह्या कुरकूर करणाऱ्या लोकांच्या अंगीं नव्हतें. ते पांडित्य करण्यांत प्रवीण होते; परंतु नुसत्या पांडित्याचा त्या वेळीं फ्रान्सला कांहींएक उपयोग नव्हता. पांडित्याला कर्तृत्वाची जोड पाहिजे होती व ती नेपोलियनच्या अंगीं जितकी होती, तितकी दुसऱ्या कोणाच्याही अंगीं नव्हती. फ्रेंच लोकांचें मन—त्यांची मनोरचना—विकारवश व उच्छृंखल आहे हें तो जाणत होता. तसेंच ते दिलदार व कृतज्ञ आहेत, हेंही त्याला ठाऊक होतें. लोकसत्तेच्या स्वैराचारास ते कंटाळले होते याचीही त्याला पूर्ण जाणीव होती; आणि त्यांना सुखशांतीचा लाभ करून देऊन त्यांची भरभराट केल्यास संतोषाच्या भरांत ते आपणांस पाहिजे त्या श्रेष्ठ पदावर नेऊन ठेवतील—निदान आपण नाचूं तसें नाचण्यास पूर्ण संमति देतील—अशी त्याची खात्री होत चालली होती. आणि तसा प्रकार पुढें लवकरच घडूनही आला. **नेपोलियन**ची प्रथम जेव्हां 'फर्स्ट कॉन्सल' च्या जागीं नेमणूक झाली, तेव्हां ती नेमणूक फक्त दहा वर्षांपुरती होती. परंतु वर सांगितलेल्या उपयुक्त सुधारणा अंमलांत येऊन देशांत सर्वत्र आबादानी झाल्यावर त्याच्या अधिकाराची मुदत आणखी १० वर्षें वाढविण्याची वाटाघाट फ्रेंच 'सेनेट-'मध्यें सुरू झाली. **नेपोलियन** ह्या चळवळीपासून बाह्यतः तरी अलिप्त होता. वास्त-

विक त्याला फ्रान्सचा राजा अगर बादशहा म्हणवून घेण्याची इच्छा होती, परंतु ती त्यानें जाहीर कधींही केली नाहीं. त्यानें आपले सर्व मनोरथ हळू हळू, आपल्या हस्तकांच्या द्वारें अनुकूल लोकमत तयार करून परस्पर लोकांकडून पूर्ण करून घेतले! यापुढें त्याला तहाहयात '**फर्स्ट कॉन्सल**' लोकांनींच नेमलें व पुढें त्याला बादशहाच्या पदवीसही लोकांनींच नेऊन पोचविलें!! असो; त्याची मुदत वाढविण्याची कल्पना त्याला पसंत नव्हती म्हणून त्यानें तो मान नाकारला. तेव्हां त्याचा हस्तक **कँवेसेरेस** यानें त्यास तहाहयात 'फर्स्ट कॉन्सल' नेमण्याची व भावी 'फर्स्ट कॉन्सल'ची नेमणूक करण्याचा अधिकार त्यास देण्याची सूचना पुढें आणली; आणि ती जवळ जवळ एकमतानें पास झाली! अशा रीतीनें **नेपोलियन**च्या भाग्याची अभिवृद्धि झाल्यानंतर तो उघड-पणें राजाप्रमाणें वागूं लागला. त्यानें आपला दरबारी थाट पुरा करण्याकरितां मागील राजवटींतील राजाभोंवतालचे कांहीं नोकर, हुजरे वगैरे फिरून आपल्या पदरीं बाळगिले व त्यानें नवे सरदार व मानकरी यांच्याही प्रभावळी तयार केल्या! उत्तम रीतीनें सरकारी नोकरी करणारांस निरनिराळ्या पदव्या देण्याची योजना त्यानें यापूर्वींच केली होती; अर्थात्, तिचा अंमळ विस्तार करून वरील प्रभावळी निर्माण करण्यास त्यास फारसें जड गेलें नाहीं. लोकांनींही त्याच्या ह्या प्रवृत्तीस उत्तेजनच दिलें. ह्या गोष्टीचा मोबदला म्हणून 'फ्रेंच सेनेट-' ला **नेपोलियनें** कांहीं नवीन अधिकार दिले. ह्या संस्थेला कायदे करण्याचा अधिकार नव्हता, तो

त्यानें या वेळीं दिला. न्यायखात्यासंबंधींही कांहीं विशेष अधिकार सदर संस्थेस मिळाले. तसेंच 'त्रिब्युनेट' नांवाची जी बड्या ( Nobles ) लोकांची संस्था होती, तिचें पूर्वीचें महत्व व विस्तार कमी करून तीस एखाद्या सल्लागार मंडळाप्रमाणें करून ठेवलें. पिढीजाद सरदारांची संख्या कमी करण्यांत येऊन सरदारांच्या मालिकेंत, उत्तम नोकरीबद्दल सरदारकी मिळविणारांचा समावेश करण्यांत येऊं लागला. ही योजना सामान्य जनतेला आवडण्या-सारखी होती; अर्थात् त्याबद्दल नेपोलियनला धन्यवादच मिळाला. याप्रमाणें सुमारें चार वर्षें मोठ्या आनंदांत व शांततेंत गेलीं. अशा प्रकारची शांतता व भरभराट फ्रान्सला या पूर्वींही कधीं लाभली नाहीं व पुढें तर नाहींच नाहीं. या वेळचें फ्रान्सचें वैभव व युरोपखंडांतील त्याचें वर्चस्व हेवा करण्यासारखें होतें. तें पाहूनच युरोपमध्यें फ्रेंच साम्राज्य स्थापन करण्याची तीव्र व अचाट महत्वाकांक्षा नेपोलियनच्या मनांत उद्भवली व त्यानें आपलें सर्व भावी आयुष्य ही महत्वाकांक्षा सफल करण्याप्रीत्यर्थ खर्च केलें. नेपोलियन हा मोठा महत्वाकांक्षी व स्वार्थी तर खराच, परंतु त्याचा स्वार्थ केवळ स्वतःच्या व्यक्तीपुरता नव्हता. फ्रेंच राष्ट्राच्या व्यक्तित्वाशीं त्याच्या व्यक्तित्वाचें पूर्ण तादात्म्य झालेलें होतें. व त्याचा प्रत्येक प्रयत्न स्वतःबरोबरच फ्रेंच राष्ट्रास थोर पद प्राप्त करून देण्याच्या बुद्धीनेंच करण्यांत आलेला आहे. ह्या बाबतींत इरेला पडल्यामुळें त्याच्या हातून पुष्कळ चुका झाल्या असतील, परंतु त्यावरून त्याचे पदरीं, अप्पलपोटेपणाचा अथवा तशाच प्रकारच्या हीन

किंवा क्षुद्र मनोवृत्तीचा दोष घालतां येणार नाहीं. त्याच्या आपत्कालीं-हीं फ्रेंच राष्ट्रावरील त्याचें निस्सीम प्रेम व त्याबद्दल त्याच्या मनांत असलेली खरी कळकळ व्यक्त झालेली आहे; आणि थोर पुरुषांच्या कृतीला सामान्यतः जी कसोटी लावतात त्या कसोटीनें त्याच्या कृतींचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास त्याजवर कोणाही निःपक्षपाती मनुष्यास वरच्यासारखा निंद्य आरोप करतां येणार नाहीं. असो; युरोपखंडांत याप्रमाणें **नेपोलियनचें** वर्चस्व व दरारा वाढलेला पाहून इंग्लंडला फिरून त्याजविषयीं भीति वाटूं लागली. तशांत, स्वदेशांत स्थिरस्थावर झाल्यावर **नेपोलियननें** जर्मनी, ऑस्ट्रिया, इताली येथील प्रदेशांत आपलें वर्चस्व व सत्ता वाढविण्याचा क्रम सुरू केला होता. रशियाच्या झारबरोबरही त्यानें स्नेहदर्शक तह केला होता. अशा रीतीनें युरोपखंडांत त्याचें वर्चस्व वाढूं देणें हें इंग्लंडच्या हितास अपायकारक होण्याजोगें असल्यामुळें त्याच्या सत्तेविरुद्ध ओरड करणारा व इंग्लंडास युद्धास प्रवृत्त करणारा एक पक्ष तेथील पार्लमेंटमध्यें निर्माण होऊन तो प्रबल झाला. **नेपोलियननें** इतालींत जीं लोकसत्ताक राज्यें फ्रान्सच्या अधिसत्तेखालीं निर्माण केलीं होतीं, तीं **आमेन्सच्या** तहांत इंग्लंडनें कबूल केलेलीं नव्हतीं. अर्थात् ह्या राज्यांतील प्रदेशासंबंधानें नेपोलियन त्याला इष्ट ती व्यवस्था करीत असतां इंग्लंड जेव्हां त्याबद्दल कुरकुर करूं लागलें तेव्हां त्यानें 'त्यास ह्या बाबतींत बोलण्याचा अधिकार नाहीं' असे उद्गार जाहीरपणें काढले. त्यामुळें तर उपरोक्त युद्धप्रिय पक्षाचें माथें फारच खवळलें, आणि **नेपोलियनचा** वेळींच बंदोबस्त

न केल्यास पुढें स्वदेशावर मोठें अरिष्ट गुदरेल असें सांगून ह्या पक्षानें इंग्लंडला युद्धास प्रवृत्त केलें. इकडे नेपोलियनसुद्धां कांहीं स्वस्थ बसलेला नव्हता. इंग्लंडशीं दोन हात करून त्याला जिंकल्यावांचून आपणास आपले हेतु सफल कारितां यावयाचे नाहींत हें तो जाणून होता. आणि त्या राष्ट्राशीं लढण्याची तयारीही त्यानें सुरू केलेली होती. परंतु इतक्यांत लढाई सुरू करणें त्यास इष्ट नसल्यामुळें तो इंग्लंडशीं मिळतें घेण्याचा प्रयत्न करीत होता. तथापि पुढें एक अनिष्ट गोष्ट त्याच्या हातून घडून आल्यामुळें त्याचा हा प्रयत्न सफल झाला नाहीं. ईजिप्तमध्यें असलेल्या इंग्रजी सेनेचा एक कमांडर नेपोलियनचा जीव घेण्याकरितां झालेल्या एका गुप्त कटाच्या मसलतींत असल्याची बातमी त्याच्या एका अधिकाऱ्यानें त्यास कळविली. तेव्हां तो रागाच्या भरांत ईजिप्तवर स्वारी करून इंग्रजी सेनेचा पराभव करण्याच्या गोष्टी बोलून गेला व दुसरे दिवशीं त्या ' **मानितर** ' नामक सरकारी फ्रेंच पत्रांत प्रसिद्ध झाल्या. त्यामुळें इंग्लंदांतील युद्धप्रिय पक्षास अतिशय चेव आला. आमेन्साच्या तहान्वयें माल्टा येथून इंग्रजी सैन्य परत नेण्याचा जो करार ठरला होता, तो इंग्लंडनें अद्याप पुरा केलेला नव्हता. नेपोलियनची वरील उक्ति प्रसिद्ध झाल्यानंतर तें ठाणें आत्मसंरक्षणाकरितां आपल्या ताब्यांत तसेंच ठेवावें असें इंग्लंडांतील लोकमतानें तेथील सरकारास कळविलें. नेपोलियननें तहाप्रमाणें वागण्याबद्दल इंग्लंडच्या अधिकाऱ्यांबरोबर बराच काल पत्रव्यवहार केला, परंतु त्याचा कांहींएक उपयोग न

होतां इ० स० १८०३ च्या मे महिन्यांत दोन्ही राष्ट्रांमध्यें युद्ध सुरू झाल्याचें जाहीर करण्यांत आलें! दूरवर विचार केल्यास अशा रीतीनें इंग्लंडशीं युद्ध करण्याचें ठरविण्यांत नेपोलियनची चूक झाली असेंच म्हणावें लागतें. इंग्लंडची समुद्रावरील सत्ता अजिंक्य होती व फ्रान्स त्या बाबतींत अगदीं दुर्बल होतें. अशा स्थितींत इंग्लंडशीं वैर करण्यापेक्षां त्याच्याशीं तडजोड करून त्याची त्रयस्थ या नात्यानें निष्क्रिय सहानुभूति मिळविण्याचा नेपोलियननें यत्न केला असता तर तें त्यास अधिक हितावह झालें असतें. परंतु नेपोलियनची भवितव्यता निराळी होती. म्हणून त्याला तशी वासना झाली नाहीं! दुसरें काय म्हणावयाचें?

---

## प्रकरण ७ वें.

### नेपोलियनच्या वैभवाचा कळस!

इंग्लंडशीं युद्ध जाहीर केल्यानंतर सुमारें २ वर्षेंपर्यंत इंग्लंडवर चाल करण्याच्या हेतूनें **नेपोलियन** आरमार वाढवीत होता. त्यानें फ्रेंच किनाऱ्यापासून तों हालंडच्या किनाऱ्यापर्यंत हजारों लहान-मोठीं जहाजें तयार करण्याचें काम सुरू केलें. हें काम सुरू असतांना मध्यंतरीं फ्रान्समध्यें एक दोन फार महत्वाच्या गोष्टी घडून आल्या. त्यांचा अगोदर विचार करून मग ह्या इंग्लंडवरील स्वारीकडे वळूं. लाव्हेंडे प्रांतांतील रोमन कॅथलिक लोकांचें बंड मोडून त्यांच्या पुढाऱ्यांशीं तडजोड झाली, हें वृत्त मागें आलेंच

आहे. ह्या लोकांपैकींच जार्ज कादोडल नामक एक असंतुष्ट पुढारी इंग्लंडमध्यें जाऊन राहिला होता व त्याला त्या सरकारचा आश्रय होता. ह्या गृहस्थानें नेपोलियनला ठार मारण्याचा एक गुप्त कट केला. त्या कटांत माजी बोरबोन राजघराण्यांतील एक राजपुत्रही सामील होता. याखेरीज आणखी ५०।६० बडे बडे लोक ह्या कटांत होते असें म्हणतात. ह्या कटवाल्यांनीं नेपोलियनचा सेनापति मोरयु यास अनुकूल करून घेतलें होतें. इ० स० १८०३।४ च्या हिवाळ्यांत कादोडल व त्याचे कांहीं अनुयायी आपला बेत सिद्धीस नेण्याकरितां पॅरिस शहरीं आले व त्यांचीं मोरयू-बरोबर खलबतें सुरू झालीं. परंतु ह्या कटाचा नेपोलियनला सुगावा लागल्यामुळें त्यानें तत्काळ हे सर्व लोक पकडले व कायद्याप्रमाणें यांची चौकशी होऊन कादोडल यास व त्याच्या तीन सरदार-अनुयायांस फांशीची शिक्षा फर्माविण्यांत आली. परंतु नेपोलियननें त्याच्या अनुयायांस दयाळूपणानें पूर्ण माफी देऊन सोडून दिलें. मोरयु यास न्यायकोर्टानें कैदेची शिक्षा सांगितली होती. पण त्यालाही नेपोलियननें मुक्त करून अमेरिकेस जाऊं दिलें. परंतु कटांत बोरबोन राजघराण्यातील पुरुषाचा संबंध असलेला पाहून नेपोलियनला फार चीड आली व त्या राजपुरुषास आपले ताब्यांत घेण्याचा त्यानें बराच प्रयत्न केला; पण राजपुत्र इंग्लंडच्या आश्रयास असल्यामुळें त्याचा प्रयत्न विफल झाला. पुढें त्यास असें समजलें कीं, 'ड्यूक द एन्घेन' नामक दुसऱ्या एका त्याच घराण्याशीं संबंध असलेल्या राजपुत्राचाही ह्या कटाशीं संबंध होता. हा राज-

पुत्र जर्मन संस्थानांपैकीं बेडेन येथें रहात होता. त्याला त्यानें संशयावरून पकडून आणलें व त्याच्याविरुद्ध फारसा पुरावा नसतांही त्यास त्यानें देहान्त शासन केलें! त्यानें ही गोष्ट मुद्दाम, जाणून बुजून, बोरबोन घराण्यांतील राजपुरुषांस दहशत घालण्याकरितां केली. परंतु त्यामुळें युरोपांतील बहुतेक प्रमुख राजांचे मनांत त्याच्याबद्दल वैषम्य उत्पन्न झालें. प्रशियाचा राजा, रशियाचा झार व ऑस्ट्रियाचा बादशहा हे पुन्हा नेपोलियनचा पाडाव करण्याचा विचार करूं लागले. परंतु त्याची सत्ता व सामर्थ्य अफाट वाढलेलें असल्यामुळें त्यांना आपले विचार तूर्त तरी मनांतल्या मनांत ठेवणें भाग होतें. कादोडलचा कट फसल्यानंतर नेपोलिनयचा जीव घेण्याचा प्रयत्न करणारे आणखी दोन छोटेसे कट उघडकीस आले. त्यांचीही नेपोलियननें वरील कटांप्रमाणेंच वासलात लाविली. ह्या गुप्त कटांच्या प्रयत्नामुळें नेपोलियनवर त्याच्या प्रजेचें तर विशेषच प्रेम बसलें! व त्याच्या जीवितासंबंधानें विशेष काळजी घेण्याचे उपाय योजण्याबद्दल लोक सूचना करूं लागले. ह्या संधीचा फायदा घेऊन नेपोलियनच्या भक्तांनीं त्याला फ्रान्सचा बादशहा बनविण्याची चळवळ सुरू केली! नेपोलियननें फ्रेंच जनतेला किती सुखी व संतुष्ट केलें होतें, हें मागें सांगितलेंच आहे. त्यांचें हें सुख व संतोष हीं केवळ त्याच्या अस्तित्वावर अवलंबून होतीं, हेंही ते जाणून होते. अर्थात् जेणेंकरून त्याचें सामर्थ्य वाढेल व त्याचें जीवित सुरक्षित रहाण्याचा मार्ग सुकर होईल, अशी हवी ती गोष्ट करण्यास त्याचे प्रजाजन

[library stamp]

तयार होते. फ्रेंच राष्ट्राची मनोवृत्ति सध्या अशा प्रकारची होती. तेव्हां त्याच्या भक्तांनीं सुरू केलेल्या उपरोक्त चळवळीस त्यांच्याकडून उत्साहपूर्वक पाठिंबा मिळाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. परंतु जे लोक १० वर्षांपूर्वी राजाला फाडून खाण्यास व त्याचें सिंहासन उध्वस्त करण्यास तयार झाले होते, त्यांनींच पुन्हा फ्रान्समध्यें राजाची व त्याच्या सिंहासनाची प्राणप्रतिष्ठा करण्यास तयार व्हावें, हा **नेपोलियन**च्या प्रतिभासंपन्नतेचा अलौकिक चमत्कार पाहून मात्र कोणाचेंही मन आश्चर्यातिरेकानें थक्क झाल्यावांचून राहणार नाहीं ! असो. नेपोलियनच्या मस्तकावर बादशाही मुकुट चढविण्याची कल्पना फ्रेंच **सेनेट**लाही पसंत पडली. **त्रिब्युनेटनें** तर त्याच्यापूर्वींच ह्या गोष्टीस आपली संमति देऊन टाकली होती. ह्या दोन्ही राजकीय संस्थांनीं **नेपोलियन**ला कायदेशीर रीतीनें बादशहा करून त्याला आपला वारस नेमण्याचाही हक्क दिला. ही बातमी सरकारी रीतीनें जाहीर होतांच त्याच्या सर्व प्रजेनें त्याचें अभिनंदन करून त्याजवर स्तुतिस्तोत्रांचा वर्षाव केला ! पुढें लवकरच (डिसेंबर २, सन १८०४ ) **पॅरिस** येथें त्याचा राज्याभिषेकसमारंभ मोठ्या थाटानें करण्यांत आला. ह्या समारंभाकरितां **रोमचा ७ वा पोप मुद्दाम पॅरिस येथें आला होता. नेपोलियननें** सरकारी रीतीनें त्याचा मोठा सत्कार करून त्याची एक जंगी मिरवणूक काढण्याची परवानगी दिली होती. **सेंटलुई**च्या राजवाड्यापासून **पॅरिस** येथील **नोटरडेम** नामक देवळांत पोपची मिरवणूक येऊन पोंचल्यावर नेपोलियनही मोठ्या

थाटानें, आपले लष्करी व मुलकी अधिकारी, सेनेटचे व ट्रिब्युनेटचे सभासद व लष्करी लोक यांच्या लवाजम्यासह मिरवत मिरवत, तेथें येऊन दाखल झाला. ह्या दोन्ही मिरवणुकी सदर देवळांत एकत्र झाल्या. तेथें नेपोलियनला राज्याभिषेक करण्याची सर्व तयारी पूर्वींच सिद्ध करून ठेवलेली होती. त्या ठिकाणीं त्याला नेण्यांत आल्यावर पोपनें आशीर्वादपूर्वक त्याच्या मस्तकावर पवित्र तेलाचा अभिषेक करून त्याच्या एका हातांत बायबल व एका हातांत तरवार दिली. नेपोलियन ह्या वेळीं गुडघे टेंकून बसला होता. कॅथोलिक पंथाच्या धर्मविधीप्रमाणें राज्याभिषेकाचें काम संपल्यावर त्यानें आपल्या मस्तकावर राजमुकुट धारण केला व आपली भार्या ऊर्फ राणी हिचें मस्तकही त्यानें महाराणीच्या भूषणानें मंडित केलें. नंतर हें जोडपें तेथें तयार असलेल्या उच्च सिंहासनावर आरूढ झालें; तेव्हां सर्व सरदार, मानकरी व अधिकारी आपापल्या जागेवर येऊन उभे राहिले व रीती-प्रमाणें धार्मिक प्रार्थना व पोपचा आशीर्वादविधि आटोपल्यावर सर्वांनीं त्यांस बादशहा व महाराणी ह्या नात्यानें मुजरे केले. त्या वेळीं बाहेरच्या लोकांनीही उत्साहपूर्वक त्यांच्या नांवाचा जयघोष केला! आनंदसूचक तोफांच्या सरबत्तींनीं सर्व पॅरिस शहर दुमदुमून गेलें! शहरांतील लोकांत जिकडे तिकडे आनंद व उत्साह यांचें साम्राज्य पसरलें होतें! लोकांनीं आपण होऊन अशा प्रकारें मनः-पूर्वक फ्रेंच बादशहाचें अभिनंदन केल्याचा हा देखावा फ्रान्स-मध्यें खरोखर अश्रुतपूर्व व ' न भूतो न भविष्यति ' ह्या कोटींतील

होता यांत कांहीं शंका नाहीं! असो; रशियाखेरीज बाकीच्या सर्व राष्ट्रांनीं **नेपोलियन**ची ही नवीन पदवी खुषीनें वा नाखुषीनें मान्य केली. रशियानेंही त्याबद्दल उघडपणें विरोध प्रकट केला नाहीं. याप्रमाणें कॉर्सिका बेटांतील एक सामान्य शिपाईगडी आपल्या शौर्याच्या व बुद्धिबलाच्या जोरावर जगांतील अत्युच्च अशा वैभवाच्या शिखरावर जाऊन पोंचला! आणि जर त्यानें आपल्या महत्वाकांक्षेस या वेळीं आळा घातला असता तर त्याचें हें वैभव अखेरपर्यंत टिकून फ्रान्सचें युरोपखंडांत वाढलेलें वर्चस्वही पुष्कळ अंशीं कायम राहिलें असतें. परंतु बादशहा बनल्यानंतर **नेपोलियन**च्या महत्वाकांक्षेस हळुहळू आसुरीवृत्तीचें स्वरूप येऊं लागलें. व त्या कारणानें त्याच्या मनाचा पूर्वींचा समतोलपणा कमी होत जाऊन त्याच्या पुढील राज्यकारभारासही जुलमी सत्तेचें स्वरूप प्राप्त होत गेलें. तें कसें, हें पुढें क्रमाक्रमानें कळून येईलच. सध्या, **नेपोलियन**नें इंग्लंडवर स्वारी करण्याची जी तयारी सुरू केली होती त्याचें काय झालें तें आपण पाहूं. ही तयारी सुरू केल्यापासून सुमारें दोन वर्षांच्या अवधींत नेपोलियननें २३०० जहाजें तयार करून त्यांवर तीन हजार तोफा चढविण्याची सोय केली. ह्या जहाजांना सुरक्षितपणें फिरतां यावें, म्हणून त्यानें समुद्रांतील सर्व रस्ते दुरुस्त केले व ठिकठिकाणीं त्यांचीं सुव्यवस्थित ठाणीं बनविलीं. ह्या जहाजांवरून नेण्याकरितां त्यानें सुमारें एक लक्ष निवडक सैन्य फ्रेंच किनाऱ्यावर तयार करून ठेवलें होतें. या सैन्याच्या रक्षणाकरितां लढाऊ जहाजांचें एक मोठें थोरलें आरमार त्यानें तयार

केलें होतें. या आरमारच्या साह्यानें इंग्लंडवर स्वारी करण्याच्या तीन योजना त्यानें केल्या होत्या. व त्या तिन्ही योजना कसकशा अमलांत आणावयाच्या, हें तो जातीनें स्वतः आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांस समजावून सांगत असे. तसेंच ह्या स्वारीसंबंधी प्रत्येक गोष्टीवर त्याची स्वतःची देखरेख होती. परंतु इंग्रजी राष्ट्राचें दैव बलवत्तर असल्यामुळें, इंग्लिश चॅनल ओलांडणें हें निसर्गतःच अत्यंत कठिण असल्यामुळें आणि त्या चॅनलची पूर्ण माहिती व अनुभव असणारें इंग्रजी आरमार त्याचें संरक्षण करण्यास तयार असल्यामुळें नेपोलियनच्या तिन्ही योजना निष्फळ ठरल्या. याप्रमाणें इंग्लंडवर स्वारी करण्याचे बाबतींत जरी नेपोलियनला यश आलें नाहीं, तरी डावपेचांच्या दृष्टीनें त्याची सदर योजना वाखाणण्यासारखी आहे.[१] यावरून नेपोलियनची अचाट बुद्धि व अगाध सामर्थ्य यांची उत्कृष्ट कल्पना होण्यासारखी आहे !

इंग्लंडवर स्वारी करण्याचे बाबतींत नेपोलियनला वरीलप्रमाणें अपेश आलेलें पाहून राशिया व आस्ट्रिया यांनीं त्याच्या विरुद्ध लढण्या-

---

१ प्रो० मॉरिस नामक एक इंग्रजी ग्रंथकार यासंबंधीं म्हणतो:— "...... his efforts ended in a disastrous failure. What he accomplished, however, remains a monument of his comprehensive genius in war, of his characteristic organising powers, of his extraordinary gifts in arranging details, of his indefatigable and most fruit ful energy, of his distinctive peculiar skill in stratagem &c" ह्या स्वारीचें विस्तृत व सुंदर वर्णन ॲडमिरल कोलंबो याच्या 'नॅव्हल वारफेअर' या पुस्तकांत सांपडल, तें जिज्ञासूंनीं पहावें.

करितां पुन्हा डोकें वर काढलें. ह्या संयुक्त राष्ट्रांच्या मसलतींत इंग्लंडही समील झालें. जर्मनीदेखील त्यांस मदत करण्यास तयार होण्याच्या बेतात होतें. ही सर्व परिस्थिति नेपोलियनच्याही लक्षांत येऊन चुकली होती; व समुद्रावर नाहीतर नाहीं, पण जमिनीवर मात्र आपण इंग्लंडची खास खोड मोडूं, अशा भावनेनें प्रेरित होऊन त्यानें इंग्लडवर स्वारी करण्याकरितां फ्रेंच किनाऱ्यावर जमविलेलें सर्व सैन्य फ्रान्स व जर्मनींतून डयानुब नदीकडे वळविलें. नेपोलियनजवळ या वेळीं २ लक्ष उत्तम व २ लक्ष साधारण प्रतीचें असें ४ लक्ष सैन्य होतें. त्याचे त्यानें ७ विभाग करून प्रत्येक विभाग कसलेल्या, अनुभविक आणि आज्ञाधारक सेनापतीच्या ताब्यांत दिलेला होता. याशिवाय त्याचा 'रिझर्व्ह इंपिरियल गार्ड' (या नांवाची फलटण) व पुष्कळ तोफा आणि घोडेस्वार खुद्द त्याच्या स्वतःच्या ताब्याखालीं होते. ह्या बादशाही सैन्याला '**ग्रँड आर्मी**' (भव्य लष्कर) अशी संज्ञा होती. संख्येच्या दृष्टीनें पाहतां शत्रूंच्या संयुक्त सैन्यापेक्षां नेपोलियनचें सैन्य पुष्कळ कमी होतें. परंतु तें कसलेलें, जोमदार व उत्साहशाली असून त्याची संघटना फार कुशलतेनें केलेली होती. नेपोलियनसारख्या विजयी व प्रतिभाशाली पुरुषाकडे त्याचें नेतृत्व असल्यामुळें त्यांतील शिपायांचे ठायीं विलक्षण प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न झालेला होता. शिपाय नेपोलियनचें योजनाचातुर्य अप्रतिम असल्यामुळें त्याला संख्याबलाचें न्यूनत्व तेव्हांच भरून काढतां येत असे. असो; या पुढें होणाऱ्या युद्धांत शत्रुपक्षानें नेपोलियनवर चार बाजूंनीं हल्ले

करण्याचा घाट घातला होता. रशियन व ब्रिटिश सैन्य हानोवर व हॉलंडच्या बाजूनें हल्ला करणार होतें; त्यांचेंच दुसरें सैन्य इतालीच्या खालच्या प्रदेशांत हल्ला करणार होतें[1]; इतालीच्या वरच्या अंगास ऑस्ट्रियन सैन्य हल्ला करणार होतें; व दक्षिण जर्मनींतून -ऱ्हाइन नदीच्या सरहद्दीवर ऑस्ट्रिया व रशिया यांचें संयुक्त सैन्य नेपोलियनच्या सैन्याचा प्रतिकार करणार होतें. शत्रुपक्षाच्या ह्या हालचाली नेपोलियनला समजल्या होत्या व त्या त्याच्या फायद्याच्या होत्या. कारण विभागलेल्या शत्रुसैन्याचा पाडाव करण्यांत नेपोलियनचा अगदीं हातखंडा होता. शत्रुपक्षाच्या हाल-चालींच्या अनुरोधानें त्यानेंही आपल्या सैन्याचे योग्य विभाग करून शत्रूस तोंड देण्याची तयारी केली. इतक्यांत आस्ट्रियन सेनापति जनरल मॅक यानें रशियन सैन्याची मदत ठरल्याप्रमाणें येऊन पोंचण्यापूर्वींच दक्षिण जर्मनीच्या बाजूनें फ्रेंच सरहद्दीवर चाल केली. मॅक एकटाच येत आहे असें पाहून त्यास दुसऱ्या कोण-त्याही सैन्याची मदत मिळूं न देण्याची व स्वतःच्या सैन्याच्या जाळ्यांत त्यास कोंडून मार देण्याची उत्कृष्ट योजना नेपोलियननें तयार केली. ही योजना सफळ करण्याकरितां त्यानें मॅक याला फसविण्यासाठीं आपल्या सैन्याची एक तुकडी त्याच्या सैन्याच्या अघाडीस चाल करून जाण्याला पाठविली व आपण बरेंच

१ नेपोलियन बादशहा झाल्यावर त्यानें हानोवर, हालंड व इताली ह्या तिन्ही देशांवर आपली सत्ता स्थापन केली. इतालींत तर मिलान येथें त्यानें पुन्हा राज्याभिषेकही करून घेतला !

मोठें सैन्य घेऊन तो त्याच्या पिछाडीला घेरण्याकरितां निघाला. **मॅक** ह्या वेळीं डान्युब नदीच्या वरच्या अंगास असलेल्या **इलर** नामक किल्ल्यावर येऊन पोंचला होता. तेथें सुमारें ३ आठवड्यां-च्या आंत नेपोलियननें त्यास गांठून आपल्या योजनेप्रमाणें त्याचा पूर्ण पराभव केला (१९ आक्टोबर १९०५). **मॅकचें** सैन्य पळत सुटलें, व त्याचा नेपोलियनच्या सैन्यानें पाठलाग करून विध्वंस करून टाकला. **मॅकच्या** ८५००० सैन्यापैकीं सुमारें २० हजार सैन्य काय तें पळ काढून निभावूं शकलें. याप्रमाणें नेपोलियन इकडे शत्रूच्या मुख्य सैन्याचा समाचार घेत असतां **मासेना, आगन्यु** वगैरे त्याचे इतर प्रख्यात सेनापति इतर ठिकाणच्या शत्रु-सैन्याचा समाचार घेत होते. मुख्य सैन्याचा वरीलप्रमाणें परा-भव झाल्यावर शत्रूंच्या इतर ठिकाणच्या सैन्यांचाही भराभर मोड होत गेला. त्यानंतर नेपोलियननें डॅन्युब नदीच्या खोऱ्यांतून ऑस्ट्रियाची राजधानी **व्हियेन्ना** येथें चाल केली. नेपोलियनचें सैन्य पुढें येतांच **मॅकच्या** मदतीस येणारें रशियन सैन्य **इन्** नदीच्या पलीकडे मागें हटलें. त्या सैन्यानें चाल केल्यास त्याच्या-पासून आपल्या सैन्याचें रक्षण करण्याची तजवीज करून तो ता० १४ नोव्हेंबर सन १८०५ रोजीं **व्हियेन्ना** शहरांत शिरला. त्या-

१ नेपोलियनची ही योजना अगदीं ठरल्याप्रमाणें सिद्धीस गेली. इतकी सिद्धि त्यास अगर दुसऱ्या कोणत्याही योद्ध्यास कोणत्याही युद्धांत प्राप्त झालेली नाहीं. यासंबंधानें खुद्द नेपोलियननें 'My plan was carried out exactly as I conceived it.' असें लिहिलें आहे.

पूर्वींच तेथील बादशहा आपल्या कुटुंबासह पळून गेला होता! नेपोलियननें शहरांतील लोकांस फार सौम्यपणानें वागवून मोठ्या युक्तीनें तेथील रशियन व ऑस्ट्रियन लोकांत परस्पर भांडणें लावून दिलीं. आणि त्यामुळें त्या शहरांत आपली सत्ता स्थापन करण्यास त्यास फारसें जड गेलें नाहीं.

नेपोलियन **अल्म** ( युल्म ) काबीज करून **व्हियेन्नावर** चाल करीत असतां इकडे दुसरी एक महत्त्वाची गोष्ट घडून आली. इंग्लंडवर स्वारी करण्याचे प्रयत्न विफल झाल्यानंतर त्यानें आपल्या आरमाराचा एक काफिला इतालींतील दक्षिणेकडच्या आपल्या सैन्याच्या संरक्षणाकरितां पाठविला होता. ह्या काफिल्याचा अधिपति व्हिलेन्युव्हे याची व ब्रिटिश ॲडमिरल **नेल्सन** याची भूमध्यसमुद्रांत **ट्राफलगार**जवळ लढाई जुंपली. या लढाईत दोन्ही पक्षाच्या सरदारांनीं आपल्या शौर्याची पराकाष्ठा केली. **नेल्सन** तर त्यांत मरणच पावला! परंतु विजयश्रीनें ब्रिटिशांच्या गळ्यांत माळ घातली व फ्रेंच आरमाराचें फार नुकसान होऊन त्याचा पराभव झाला. फ्रेंच व ब्रिटिश यांची समुद्रावरील ही शेवटची लढाई होय. यानंतर फ्रेंचांनीं समुद्रावर ब्रिटिशांचा पराभव करण्याचा हव्यास सोडून दिला. फ्रेंच राष्ट्राच्या भावी स्थितीवर व धोरणावर परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीनें ही लढाई अत्यंत महत्वाची आहे.

**ट्राफलगार**च्या पराभवाची बातमी **नेपोलियन**ला समजली, तेव्हां त्याला वाईट वाटलें; परंतु ऑस्ट्रियन रणभूमीवर मोठा थोरला

विजय मिळाल्यामुळें व पुढेंही मिळण्याचा संभव दिसत असल्या-मुळें त्याला ह्या पराभवाचें फारसें दुःख वाटलें नाहीं. ' इंग्लंड समुद्रावर अजिंक्य असलें तरी जमिनीवर विजय मिळवून त्यास आपण मेटाकुटीस आणूं ' अशा भावनेनें प्रेरित होऊन तो आपल्या पुढील कार्यास प्रवृत्त झाला.

पण तो **व्हियेन्ना** शहरांत दाखल झाल्यावर थोड्याच दिव-सांत त्याची स्थिति मोठी धोक्याची झाली. त्यानें ऑस्ट्रियन सैन्या-वर चाल करून येत असतां प्रशियाच्या तटस्थ संस्थानांतून आपलें सैन्य आणलें होतें. त्यामुळें प्रशियाचा राजा मनांतल्या मनांत संतप्त झाला होता. ही संधी साधून रशियाच्या झारनें त्याला त्याच्या विरुद्ध उभारलेल्या युरोपियन राष्ट्रांच्या संघांत सामील करून घेण्याची खटपट चालविली होती. त्यास यश देऊन प्रशियानें **नेपोलियन**च्या पिछाडीवर हल्ला करून त्याचें आपल्या प्रांताशीं असलेलें दळणवळण तोडून टाकावें, असा संकेत ठरला होता. इकडे डॅन्युब नदीच्या तीरावरून रशियन सेनापति **कुट-सॉफ** हा सैन्याची हालचाल करीत होता व इतालीकडे गेलेलें ऑस्ट्रियन सैन्य डॅन्युब नदी ओलांडून **व्हियेन्ना**च्या समोर असलेल्या **मोरव्हिया** प्रांतांतील मैदानाकडे चाल करून येत होतें. या सर्व सैन्यांच्या हालचाली पूर्ण झाल्यास नेपोलियन **व्हियेन्ना** येथें कोंडला जाऊन त्याच्या सैन्याची दुर्दशा होण्याचा संभव होता. ही धोक्याची परिस्थिति लक्षांत येतांच त्यानें आपल्या पिछाडीचें व दळणवळणाच्या मार्गाचें संरक्षण करून सुमारें ७०

हजार सैन्यासह मोरव्हियाच्या मैदानांत उतरण्याचें धाडस केलें! शत्रुसैन्याच्या योजनेचा विचार करतां हें धाडसच म्हटलें पाहिजे. परंतु नेपोलियनच्या सुदैवानें रशियाच्या झारकडून चूक झाल्यामुळें त्याचें हें धाडस विफळ झालें नाहीं. नेपोलियनचें सैन्य शत्रुसैन्यापेक्षां अगदीं कमी होतें. तेव्हां त्याच्यावर समोरून चाल करून त्याच्या उजव्या बाजूवर हल्ला करण्याची कल्पना एका ऑस्ट्रियन सैनिकानें झारच्या मनांत भरविली. आपल्या सरदारांसही ती फार पसंत पडलीसें पाहून झारनें त्यास आपली संमति दिली. झारचा सेनापति **कुटसॉफ** याला मात्र ती कल्पना पसंत नव्हती; परंतु झारच्या सरदारांच्या आग्रहामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. ती कल्पना पसंत ठरतांच रशियन सैन्य एकदम चाल करून पुढें निघालें; ऑस्ट्रियन सैन्याचा कांहीं भागही त्यास येऊन मिळाला. हें संयुक्त सैन्य ता. १ डिसेंबर सन १८०५ रोजीं मोरव्हियांतील **ऑस्टर्लिट्झ** नामक टेंकड्यांवर येऊन लढाईस सिद्ध झालें. शत्रुपक्षानें केलेली चूक नेपोलियनच्या तेव्हांच लक्षांत आली व तो मोठ्या आनंदानें "that army is mine" असें उद्गारला! त्यानें शत्रुपक्षाची ही चूक आपल्या सैन्याच्या लक्षांत आणून दिली व निकरानें लढल्यास जय हा खात्रीनें ठेवलेला आहे असें बोलून त्यानें त्यास उत्तेजित केलें. शत्रूला फसविण्याकरितां दुसरे दिवशीं त्यानें मुद्दाम भीतिसूचक असा केवळ आत्मसंरक्षणाचा आविर्भाव आणला. परंतु, वस्तुतः विजयाविषयीं त्याची इतकी खात्री होती कीं, तो शत्रुपक्षाच्या हल्ल्यास सुरवात

नं.

झाल्यावरही कांहीं वेळ अगदीं स्वस्थ होता. आपला दुय्यम सेनापति **सौल्ट** यास त्यानें तारीख २ दिसेंबर रोजीं युद्ध सुरू होण्याचे सुमारास '**प्रॅटझेन**' च्या टेकडीवर चढून जाण्यास तुम्हांस किती वेळ लागेल ?' म्हणून विचारलें. 'वीस मिनिटांपेक्षांही थोडासा कमी वेळ लागेल.' असें त्यानें उत्तर दिलें. तें ऐकून तो म्हणाला 'तर मग आपण आणखी पाव तासपर्यंत थांबण्यास कांहीं हरकत नाहीं.' त्यांच्या ह्या संवादावरून त्याचें मन या वेळीं किती स्वस्थ ( easy ) व जयाविषयीं खात्री बाळगून होतें याची साक्ष पटण्यासारखी आहे. जेव्हां लढाईस तोंड लागून शत्रुसैन्यानें ठरल्याप्रमाणें **नेपोलियन**च्या उजव्या बाजूवर हल्ला केला, तेव्हां त्यानें आपले मार्शल्स **मुराट, बर्नाडोते** व **सौल्ट** यांस शत्रुसैन्याच्या मध्यभागावर—केंद्रस्थानावर—तुटून पडण्यास पाठविलें. त्यांनीं दोन प्रहरच्या सुमारास त्या भागांतील सैन्याचा मोड करून त्यास पळावयास लावलें! इकडे **लेनेस** नामक फ्रेंच सेनानीनें शत्रूच्या संयुक्त सैन्याच्या उजव्या बाजूवर हल्ला करून तेथेंही त्यांचा पराभव केला. पुढें फ्रेंच व रशियन यांच्या रिसाल्यांचें बराच वेळ घनघोर युद्ध झालें, पण अखेरीस रशियन रिसाल्यास मागें हटावें लागलें. याप्रमाणें संयुक्त सैन्याची दाणादाण होऊन तें **ऑस्टरालिट्झ** नामक गांवाकडे पळत सुटलें. इकडे **नेपोलियन**नें आपल्या उजव्या बाजूवर हल्ला करणाऱ्या ४ तुकड्यांचा इतका खरपूस समाचार घेतला कीं, त्यांची दाणादाण उडून त्या मागें हटूं लागल्या. इतक्यांत वरील विजय मिळविलेलें त्याचें सैन्य

त्याच्या उजव्या बाजूच्या सैन्यास येऊन मिळालें. मग ह्या एकत्र झालेल्या सैन्यानें ऑस्ट्रियन व रशियन सैन्यावर तोफांचा इतका भयंकर मारा केला कीं, त्यामुळें त्यांची फारच दुर्दशा झाली. त्यांच्या ८० हजार सैन्यापैकीं निम्में-अधिक सैन्य ठार झालें; आणि बाकीचें युद्धाला निरुपयोगी होऊन गेलें ! त्यांच्या सर्व तोफा फ्रेंच सैन्यानें काबीज केल्या. नेपोलियनचा हा विजय त्याच्या इतालींतील विजयाइतकाच आश्चर्यकारक व महत्वाचा आहे. ह्या विजयामुळें ऑस्ट्रियाचे इतालींतील शेष राहिलेलें वर्चस्व नष्ट होऊन तेथें नेपोलियनची सत्ता पूर्णपणें स्थापन झाली. ऑस्टरलिट्झच्या लढाईनंतर रशियानें युद्धांतून आपलें अंग काढून घेतलें. त्यामुळें ऑस्ट्रियन बादशहाला नेपोलियनशीं तह करण्यावांचून दुसरें गत्यंतर नव्हतें. ह्या पराभवाची वार्ता ऐकून नेपोलियनविरुद्ध उठणारा प्रशियाचा राजाही भीतिवश होऊन नेपोलियनची खुषामत करण्यास तयार झाला. अशा वेळीं नेपोलियननें जर नेमस्तपणाचें धोरण स्वीकारून सर्वांना आपले—फ्रान्सचे—स्नेही करून घेतलें असतें, तर तें शक्य होतें; व त्यामुळें फ्रान्सचें वैभव कायम राहून यूरोपमध्येंही शांतता झाली असती. त्याचा हुषार व राजकारण-कुशल मंत्री **टॅलेरांद** यानें ह्याच हेतूनें या वेळीं ऑस्ट्रियाशीं सौम्यपणानें वागून त्याला फ्रान्सचा दोस्त करून ठेवण्याची इषारत नेपोलियनला दिली. परंतु नेपोलियन या वेळीं विजय-मदानें धुंद होऊन गेलेला होता. त्याला आपल्या सामर्थ्याविषयीं अत्यंत अहंकार आणि गर्व वाटूं लागला होता. तशांत ऑस्ट्रियानें त्यास वारं-

वार सतावून सोडण्याचें व्रत स्वीकारलेलें पाहून त्याची त्याला पुरी चीड आलेली होती. या सर्व कारणांमुळें **टेलेरांद**च्या इषारतीकडे दुर्लक्ष करून त्यानें ऑस्ट्रियाशीं तह करण्याचे बाबतींत अत्यंत कठोरपणानें वागून ऑस्ट्रियाचें युरोपांतील महत्व नाहींसें करून टाकण्याचा निश्चय केला. या निश्चयानें प्रेरित झाल्यामुळें ता० २६ डिसेंबर रोजीं **प्रेसबर्ग** येथें जो तह झाला, त्या तहाअन्वयें त्यानें ऑस्ट्रियाचें व्हेनिस, **इस्ट्रिया, दलमशिया, टायरोल** व जर्मनीच्या आग्नेयीकडे असलेला त्याचा सर्व प्रदेश, इत्यादि मुलुख घेऊन त्यास दुय्यम प्रतीचें राष्ट्र बनविलें ! इताली-चा तर तो आतां पूर्ण स्वामी बनला. व्हेनिस, **रोम** व **नेपल्स** हीं राज्येंही त्यानें आपल्या सत्तेखालीं आणलीं. तसेंच **बेडन, विर्टेंबर्ग** व **बव्हेरिया** ह्या जर्मन संस्थानांनीं त्याच्याशीं तह करून त्यास **ऑस्टरलिट्स**च्या लढाईंत मदत केल्यामुळें त्यांनाही त्यानें नवीन मिळालेल्या मुलखांपैकीं कांहीं मुलूख देऊन संतुष्ट केलें व त्यांच्या राजघराण्यांतील ३ मुलींशीं आपल्या कुटुंबांतील पुरुषांचे विवाह केले. याप्रमाणें ऑस्ट्रिया व रशिया यांना स्तब्ध केल्यावर नेपोलियन आपल्याविरुद्ध गुप्त कारस्थानें करणाऱ्या प्रशियाची खोड मोडण्याच्या कामास लागला. **प्रेसबर्ग**चा तह झाल्यानंतर नेपोलियननें **हानोवर** संस्थान प्रशियन राजास दिलें. तें घेण्याची त्याची इच्छा नव्हती; परंतु, नेपोलियनच्या धाकामुळें त्यास तें स्वीकारावें लागलें. ह्या संस्थानाशीं इंग्लंडचा विशेष निकट संबंध असल्यामुळें प्रशियानें तें घेतांच त्यावर इंग्लंडचा रोष होऊन

त्यानें त्याच्या बंदरांशीं दळणवळण बंद केलें. याप्रमाणें इंग्लंडचा रोष होऊं देणें प्रशियाला इष्ट वाटत नव्हतें. शिवाय नेपोलियनही ह्या सुमारास इंग्लंडशीं तहाचें बोलणें करीत होता. अर्थात् आपणा एकट्यासच इंग्लंडचें शत्रुत्व करीत रहावें लागणार—व नेपोलियनचा उद्देशही तोच आहे—असें वाटून प्रशियानें एकदम नेपोलियनबरोबर प्रत्यक्ष दोन हात करण्याची सिद्धता केली. प्रशियन राजाप्रमाणें त्याची प्रजाही नेपोलियनच्या कारस्थानास व त्याला वारंवार द्याव्या लागणाऱ्या खंडणीमुळें होणाऱ्या नुकसानास कंटाळलेली होती. म्हणून तीही अशा प्रसंगाची वाट मोठ्या उत्सुकतेनें पहात होती. परंतु या वेळीं युरोपांतील बाकीचीं सर्व राष्ट्रें स्तब्ध असल्यामुळें प्रशियाला एकट्यालाच **नेपोलियन**शीं लढावें लागणार होतें; म्हणून प्रशियाचा राजा किंचित् मागें पुढें पहात होता; परंतु त्याच्या राणीनें युद्धप्रिय पक्षाचें नेतृत्व स्वीकारून लढाई जाहीर करण्यास त्यास प्रोत्साहन दिलें. **नेपोलियन**ला या वेळीं प्रशियाशीं युद्ध करण्याची मनापासून इच्छा नव्हती. म्हणून प्रशियाचीं त्याच्या विरुद्ध चाललेलीं गुप्त कारस्थानेंही त्यानें कांहीं काळ पोटांत घातलीं होतीं. परंतु अखेरीस प्रशियानेंच जेव्हां लढाईची तयारी केली, तेव्हां **नेपोलियन**लाही त्यास तोंड देणें भाग पडलें. त्याची तयारी होतीच. त्याच्या सैन्यानें **ऑस्टरलिट्झ** येथें प्रतिकूल परिस्थिति असूनही नुकताच दिग्विजय संपादिलेला असल्यामुळें तें विजयोत्साहानें पूर्ण भरलेलें होतें. अर्थात्, त्याला प्रशियाशीं युद्ध करण्यास मुळींच जड वाटलें नाहीं. **नेपोलियन**नें ह्या वेळींही

आपल्या नेहमींच्या डावपेंचांप्रमाणें शत्रूला हुलकावणी दाखवून आपलें सैन्य निराळ्याच मार्गानें शत्रूच्या मुलखांत नेलें. प्राशियन सेनापति ड्यूक ऑफ ब्रुन्स्विक् हा नेपोलियनचें सैन्य ऱ्हाईन नदीच्या बाजूनें येत आहे अशा भावनेनें त्याच्यावर हल्ला करून त्याचें पिछाडीचें दळणवळण तोडून टाकण्याच्या हेतूनें थरंजियन्‌च्या जंगलांत येऊन दाखल झाला. नेपोलियन ह्या रस्त्यानें जाता, तरी त्याला विजय मिळाला असता; परंतु त्यामुळें जर्मन सैन्याचा पुरा मोड त्यास करितां आला नसता. म्हणून त्यानें मेन नदीच्या तीरावर आपली फौज जमा करून वायव्य दिशेनें सॅली नदीच्या खोऱ्यांतून शत्रुसैन्याच्या पिछाडीकडे वळविली. तेथून त्यानें आपल्या सैन्याचे तीन विभाग करून शत्रुसेनेच्या निरनिराळ्या भागांवर पाठविले. यापैकीं एका भागाचें आधिपत्य खुद्द नेपोलियनकडेच होतें. त्यानें शत्रुपक्षाकडील दुय्यम सेनापति जो होहेनलो त्याचे सैन्यावर एकदम झडप घालून त्याला चकित करून टाकलें. त्याबरोबर तो पळ काढूं लागला. व नेपोलियनच्या सैन्यानें आपल्या पिछाडीवर हल्ला करण्याचा रोंख धरला आहे असें दिसून येतांच ब्रुन्स्विकही एल्ब नदीकडे माघारीं वळला. त्याच्या सैन्याचा पाठलाग करण्याचें काम, डॅव्हौस्ट व बर्नाडोने या दोन सैनिकांकडे सोंपवून तो जेनाकडे पळत असलेल्या होहेनलोच्या सेनेचा पाठलाग करून तिच्यावर तुटून पडला. इकडे डॅव्हौस्टनें एका लहानशा तुकडीच्या साह्यानें युरेस्वाड येथें ब्रुन्सविकच्या हाताखालीं जमलेल्या मुख्य

सेनेशीं निकरानें लढून त्यास पळावयास लावलें. ब्रुन्सविक यानें जेन्ना येथें असलेल्या होहेनलोच्या सैन्यास जाऊन मिळण्याचा उपक्रम केला. परंतु तिकडे नेपोलियननें त्या सैन्याचाही पराभव करून त्यास पळावयास लावलें होतें. हीं दोन्ही सैन्यें पळत सुट-लेल्या स्थितींत एकमेकांस आदळतांच त्यांचा दम सुटला व तीं सैरावैरा धावूं लागलीं. तेव्हां फ्रेंच रिसाल्यानें त्यांचा धुव्वा उडवून दिला. अशा प्रकारें प्रशियाचीं दोन्ही सैन्यें उध्वस्त केल्यावर नेपोलियननें त्यांचे सर्व किल्ले आपल्या हस्तगत केले व तो बर्लिन येथें आपल्या मुख्य लष्करी अधिकाऱ्यांसह येऊन दाखल झाला. व्हियेन्नाप्रमाणेंच येथील मध्यमवर्गाच्या लोकांशीं त्यानें फार सौम्य-पणाचें वर्तन ठेवलें. मात्र तेथील सरदारांना त्यानें फार कडक-पणानें वागविलें. जेन्ना येथील हा विजय नेपोलियनच्या अद्वितीय विजयांपैकींच एक आहे. मात्र या विजयाचें बरेंचसें श्रेय त्याचा शूर व करारी मार्शल डॅव्हौस्ट याजकडे आहे. असो; प्रशियन सैन्याचा पराभव केल्यानंतर नेपोलियन कांहीं महिने बर्लिन येथें राहून जिंकलेल्या मुलखांतून युद्धसामुग्री व सैन्य जमा करण्याच्या उद्योगास लागला. हा उद्योग करीत असतांना फ्रान्सचा राज्यकारभार चालविण्याचें कामही त्यानें अगदीं चोख-पण व दक्षतेनें चालविलें होतें. राज्यकारभाराच्या सर्व बाबींवर त्याची स्वतःची नेहमीं देखरेख असे, हें मागें सांगितलेंच आहे. युद्धाच्या काळजीमुळें अगर परिश्रमामुळें त्यानें आपली ही देखरेख कधींही ढिली होऊं दिली नाहीं. यावरून त्याचें मानसिक व

शारीरिक सामर्थ्य किती विलक्षण होतें, याची वाचकांस पूर्ण कल्पना होईल. जेन्ना येथील विजयानंतर तीनचतुर्थांश युरोपखंड नेपोलियनच्या साम्राज्यसत्तेखालीं आलें. या अबाढ्य सत्तेच्या साह्यानें इंग्लंडची खोड मोडण्याच्या हेतूनें त्यानें इंग्लंडशीं व्यवहार बंद ठेवून त्यांच्या मालावर बहिष्कार घालण्याचा हुकूम सर्व युरोपखंडास सोडला! व हा हुकूम अमलांत आणण्याकरितां त्यानें युरोपखंडांतील राहिलेले देशही आपल्या ताब्याखालीं आणण्याचा निश्चय केला!! या हुकमावरून (Berlin decree) नेपोलियनच्या महत्वाकांक्षेचें आसुरी स्वरूप सर्व युरोपखंडाच्या स्पष्टपणें निदर्शनास आलें; आणि तेव्हांपासून त्याचा पाडाव करण्याची वासना बहुतेक बलाढ्य युरोपियन राष्ट्रांचे मनांत प्रबल होत चालली. परंतु नेपोलियनचें सामर्थ्य अद्याप कांहीं कालपर्यंत वाढतच जावयाचा योगायोग असल्यामुळें त्यांच्या त्या वासनेस मूर्त स्वरूप येण्यास अवकाश होता. युरोपियन बलाढ्य राष्ट्रांचे स्वभाव नेपोलियनला माहीत असल्यामुळें जेन्ना येथील विजयानें लढाईचें तोंड मिटेल असें त्यानें कधींच मानलें नाहीं. आणि म्हणूनच बार्लिन येथें आल्यावर तो फिरून आपल्या सैन्याची कडेकोट तयारी करण्यांत गुंतला होता. प्रशियाचें राहिलेलें सैन्य रशियन सैन्याच्या मदतीनें आपणावर चाल करून आल्यास बार्लिन येथें आपली स्थिति चमत्कारिक होण्याचा संभव आहे, असें मनांत आणून त्यानें आपल्या सैन्याचा कांहीं भाग पोलंड देशांत पाठविला ( नोव्हेंबर १८०६ ). हा देश रशिया व प्रशिया

यांनीं वांटून घेतलेला होता व ही गोष्ट तेथील प्रजेस मान्य नव्हती. **पोलंडला** स्वतंत्रता देण्याचें फ्रान्सचें धोरण होतें. म्हणून फ्रेंच सैन्य तेथें जातांच **पोलिश** लोकांनीं त्याचा मोठा सत्कार केला. थोड्याच दिवसांत **नेपोलियनही** आणखी सैन्य घेऊन तेथें येऊन पोंचला. त्याचें देखील **पोलीश** लोकांनीं मोठ्या थाटानें स्वागत केलें व त्यानेंही त्यांना स्वातंत्र्याची लालूच दाखवून संतुष्ट केलें. **नेपोलियननें** जानेवारीचा ( इ० स० १८०७ ) सबंध महिना **वार्सा** येथें आनंदांत व ख्यालीखुशालींत घालविला. इतक्यांत त्याला रशियन फौज आपणावर चाल करून येत असल्याचें वृत्त समजलें. तो गाफिल नव्हताच. त्यानें तत्काळ शत्रूस तोंड देण्याची तयारी केली. **बेनिंगसेन** नामक हुषार रशियन सेनापतीनें व्हिश्चुला नदीनजीक येऊन फ्रेंच सैन्यावर निकराचा हल्ला केला. तेव्हां प्रथम फ्रेंचांनीं थोडीशी माघार घेतली. परंतु **नेपोलियननें** त्याच्या पिछाडीवर जोराचा हल्ला सुरू करतांच तो पळ काढूं लागला. तेव्हां फ्रेंच सैन्य त्याचा पाठलाग करूं लागलें. पळतां पळतां रशियन सैन्यही ठिकठिकाणीं मोठ्या निकरानें लढलें. अखेरीस **बेनिंगसेननें** **यालु** नामक गांवाशेजारीं निकराची लढाई करण्याच्या उद्देशानें तळ दिला. तेथें ता. ८ फेब्रुवारी १८०७ रोजीं फ्रेंच व रशियन सैन्यांची गांठ पडून निकराची लढाई झाली. या लढाईंत फ्रेंचांचीच अखेर सरशी झाली; परंतु हा विजय त्यांना फार कष्टानें मिळाला. त्यांचे २५००० लोक या युद्धांत पडले! शिवाय त्या गांवानजीक त्या वेळीं बर्फ पडलेलें असल्यामुळें इतर रीतीनेंही फ्रेंच सैन्याची

फार खराबी झाली. या लढाईनें युद्धाचा शेवट झाला नाहीं. रशियन सैन्य पराभव पावून जरी मागें हटलें, तरी तहाचें बोलणें त्याच्या सेनापतीकडून सुरू झालें नाहीं. तेव्हां नेपोलियन आणखी पुढें चाल करून गेला. तो जसजसा पुढें जात चालला, तसतशी त्याची स्थिति फार नाजुक होत गेली. ऑस्ट्रिया व प्रशिया हीं राष्ट्रें फिरून त्याच्याविरुद्ध खलबतें करूं लागलीं. तेव्हां त्यांच्याशीं साम करून त्यांना शांत ठेवण्याचा त्यानें पुष्कळ यत्न केला; पण त्याचा जेव्हां कांहीं उपयोग होईना, तेव्हां त्यानें आपल्या पिछाडीच्या संरक्षणाची योग्य तजवीज करून नवीन सैन्य व नवीन युद्धसामुग्री जमा करण्याचा सपाटा लावला. नेपोलियनची ही तयारी मे महिन्यांत पूर्ण झाली व पुढें लवकरच जून ता. १४ इ. स. १८०७ रोजीं ॲले नदीकांठीं असलेल्या फ्रेडलँड गांवानजिक त्याचें व रशियन सेनेचें घनघोर युद्ध होऊन त्यांत त्यानें त्या सेनेचा पुरा मोड केला. हा मोड करून त्यानें आपलें सैन्य रशियन सरहद्दीच्या आंत नेलें. तेव्हां निरुपाय होऊन रशियन झार अलेक्झांडर यानें मोठ्या नम्रतेनें तहाचें बोलणें सुरू केलें. नेपोलियनला ह्या वेळीं युरोपखंडांत कोणीही मित्र नव्हता. ऑस्ट्रिया व प्रशिया यांचा स्नेह संपादण्याचा त्यानें पुष्कळ यत्न केला, पण तो व्यर्थ गेला. तेव्हां रशियन झारशीं स्नेह करून त्याला इंग्लंडच्याविरुद्ध आपल्या बाजूस अनुकूल करून घेण्याचा त्यानें यत्न चालविला. या तहानिमित्त उभयतांची एकांतांत भेट झाल्यावर नेपोलियननें आपल्या मिठास भाषणानें झारचें मन आकर्षून

टाकलें व उभयतांच्या विचारें युरोपमध्यें शांतता राखण्याकारितां टिलसिट येथें एक तहाची योजना नक्की करण्याचें ठरलें. प्रशियाचा राजा व राणी यांनाही हा तह पूर्ण करण्याकारितां मुठींत नाक धरून टिलसिट येथें यावें लागलें. कारण प्रशियाचा पराभव झाल्यानंतर त्याच्याशींही नेपोलियननें अद्याप तह केलेला नव्हता. ह्या तहाचीं सर्व कलमें झार व नेपोलियन यांनीं संगनमतानें ठरविलीं होतीं. प्रशियाच्या राजाला त्यांवर निमुटपणें सही करावी लागली. ह्या तहान्वयें ह्या युद्धाचा सर्व खर्च प्रशियाचे माथीं पडला व त्याचे एल्ब नदीच्या पश्चिमेकडील प्रांत व पोलंडांतील प्रांत नेपोलियनच्या ताब्यांत जाऊन तें तिसऱ्या प्रतीचें राष्ट्र बनलें! वेस्टफिलिया व हेसे हे प्रांत नेपोलियननें आपला भाऊ जेरोम यास दिले. वॉर्सा येथें नेपोलियनच्या सत्तेखालीं एक ग्रँड ड्यूक नेमण्यांत आला. पोलंडचा कांहीं भाग सॅक्सनीच्या राजास देण्यांत येऊन पोलिश लोकांना स्वातंत्र्याची आशा लावून ठेवण्यांत आली. व ही सर्व व्यवस्था राशिया व प्रशिया यांनीं मान्य केली! झारला राग येण्यासारखें कांहीं कृत्य या वेळीं इंग्लंडच्या हातून घडलें होतें. त्यामुळें नेपोलियनच्या मोहक भाषणास तो तत्काळ भुलला व इंग्लंडच्या मालास बहिष्कार घालण्याच्या धोरणास ( Coutinemtal system ) मदत करण्याचें त्यानें कबुल केलें. याबद्दल नेपोलियननें त्यास फिनलंड आपल्या राज्यास जोडण्याची व तुर्कस्तानची वांटणी करून त्याचा मुलुख बळकावण्याची मुभा दिली! या तहामुळें युरोपखंडांत नेपो-

लियनचें वर्चस्व अपरंपार वाढलें. आणि ह्या वाढत्या वर्चस्वाबरोबर त्याच्या अंगीं साम्राज्यमदाची धुंदीही सारखी वाढत चालली. यापुढें तर तो या धुंदीनें अगदीं बेहोष बनत चालला. त्याची ही बेहोषवृत्तिच अखेर त्यास रसातळास नेऊन पोंचविण्यास कारण झाली. ती कशी, ही करुणास्पद कथा यापुढील प्रकरणांतून वाचकांपुढें मांडावी लागणारच आहे!

---

## प्रकरण ८ वें.

### नेपोलियनचा बेहोषपणा.

टिलसिट येथील तहानंतर नेपोलियन फ्रान्समध्यें परत आला. या वेळीं त्याच्या साम्राज्याची मर्यादा फार वाढली होती, व त्याच्या निरनिराळ्या भागांत त्यानें आपले बंधु व इतर निकट आप्त यांची आपले प्रतिनिधींच्या जागीं नेमणूक केलेली होती. नेपोलियनची ही साम्राज्याची हांव फ्रान्सांतील पुष्कळ लोकांस नापसंत होत चालली होती. परंतु त्याच्या लढायांचा बोजा फ्रेंच राष्ट्रावर फारसा पडत नसल्यामुळें तेथील लोकमत त्यास अद्याप प्रतिकूल झालेलें नव्हतें. साम्राज्याप्रीत्यर्थ होणाऱ्या सर्व युद्धांचा खर्च नेपोलियननें मोठ्या कुशलतेनें साम्राज्यास जोडलेल्या निरनिराळ्या भागांवर लादलेला होता. यामुळें फ्रेंच लोकांवर कोणताही नवा कर बसविण्यांत आला नव्हता. उलट हालंड, जर्मनी व इताली देशांत

फ्रेंचांचा व्यापार वाढण्यास विशेष सवलती मिळाल्यामुळें सांपत्तिक दृष्ट्या फ्रान्सची भरभराटच होत होती. तसेंच स्थानिक राज्यकारभार अत्यंत दक्षतेनें, काटकसरीनें व सुव्यवस्थितपणें

---

१ नेपोलियनचा अंतस्थ–फ्रान्सचा–राज्यकारभार किती दक्षतेनें व काटकसरीनें चालत असे, याबद्दल इंग्रज इतिहासकार हर्बर्ट फिशर पुढील प्रमाणें लिहितो:—

'Thre is a quality of permanance in all that part of Napoleon's works which affects the organisation of historic France. ......... Napoleon devised a scheme for combating this inherent vice of official representation, and ordered the debates of council of state to be followed by a number of chosen youths, drawn from every part of the Empire, and possessed of intelligence, zeal and a competent fortune. ......... The French Empire pursued the system of impartial regulation and establishment. It disciplined and controlled the Jew, the Protestant and the Catholic, regarding the members of these communious as equal citizens of the Empire, equally and fully subject to all its burdens. ......... Napoleon was the genius of economy. Not weliington, not Pitt, not Gladstone, all of them jealous husbands both of time and money, approached Napoleon in this particular ...,..... Frugal in dress, sparing in food and drink, parsimonious of time, and contemptuous of amusement, he turned his jealous and challenging eye on every frank expended in the public service. There was, we imagine, in the whole course cf history, no great state managed with so scrupulous an intenfion of paring down all unnecessary expenses &c &c.'

-Fisher's Napoleon-the qualities of Empjre.

चालू असल्यामुळें सामान्य जनतेस तक्रार करण्यास फारशी जागा नव्हती. आणि नेपोलियन जर या पुढें शांततेचें धोरण स्वीकारता, तर त्याच्या व फ्रान्सच्या वैभवास ओहोटी लागण्याचा जो प्रसंग पुढें ओढवला तो बहुधा ओढवला नसता. परंतु टिल्सिटच्या विजयशाली तहामुळें तो फार बेहोष बनत गेला. सर्व युरोपखंड पादाक्रांत करून फ्रान्सच्या बादशाही सत्ते-पुढें त्यास नमावयास लावावें, अशी अनिवार व परिस्थितीचा विचार करितां कांहीं अंशीं अशक्य भावना त्याच्या अंतःकरणांत प्रज्वलित झाली. या उद्दाम मनोवृत्तीच्या जाळ्यांत सांपडून तो यापुढें बेहोषपणानें—अर्थात् अविचारानें—वागूं लागला. साम्राज्यप-दाभिमानी पुरुषाच्या ठिकाणीं एकदां अशा प्रकारचा अविचार उत्पन्न झाला म्हणजे त्याच्या हातून कशा एकसारख्या चुका होत जातात, व इभ्रतीच्या संरक्षणाकरितां म्हणून त्यांचें समर्थन करण्याची त्यास आवश्यकता भासून अखेर 'बुडत्याचा पाय खोलांत' याप्रमाणें त्याची स्थिति कशी होत जाते, हें नेपोलियनच्या यापुढील चारित्र्यावरून वाचकांच्या चांगलें ध्यानांत येईल. असो.

नेपोलियन फ्रान्समध्यें येतांच त्यानें प्रथम आपलें सर्व लक्ष इंग्लंडच्या व्यापारास जबरदस्त धक्का देऊन त्यास जेरीस आणण्याच्या कामीं लावलें. त्यानें साम्राज्यसत्तेखालीं आलेल्या सर्व देशांस इंग्लंडच्या मालावर सक्त बहिष्कार घालण्याचा हुकूम सोडला व इंग्लंडशीं पुन्हा एकवार समुद्रांत दोन हात करण्याच्या उद्देशानें त्यानें आपलें आरमार वाढविण्यास फिरून सुरवात केली.

**पोर्तुगाल व स्पेन** या देशांसही, इंग्लंडच्या व्यापारास प्रतिबंध करण्याची व प्रसंग पडल्यास त्याप्रीत्यर्थ त्यांशीं युद्ध करण्याची त्यानें आज्ञा केली. परंतु पोर्तुगालचा राजा ही आज्ञा पाळण्यास तयार होईना. इतक्यांत इंग्लंडनें, आत्मसंरक्षणाच्या हेतूनें डेन्मार्कच्या राजास आरमाराची मदत मागितली असतां ती त्यानें नाकार-ल्यावरून, कोपेनहेगेनवर हल्ला केला व तेथील सर्व आरमार ब्रिटिश बंदरांत नेलें. तटस्थ राष्ट्राच्या शांततेचा याप्रमाणें इंग्लंडनें निष्कारण भंग केलेला पाहून युरोपांतील इतर राष्ट्रांचें मत त्याज-विषयीं प्रतिकूळ होऊं लागलें. या संधीचा फायदा घेऊन नेपो-लियननें ऑस्ट्रियादि प्रमुख युरोपियन राष्ट्रांना इंग्लंडच्या विरुद्ध आपले बाजूस आणण्याचा पुष्कळ यत्न केला व इंग्लंडच्या व्यापा-रास प्रतिबंध करण्याचें कामीं त्याची अवज्ञा करणाऱ्या पोर्तुगाल देशावर त्यानें स्वारी केली (इसवी सन १८९७). पोर्तुगालचें सरकार व सैन्य त्या वेळीं फार दुर्बल स्थितींत असल्यामुळें नेपो-लियनचा कमांडर **जूनॉट** यानें फार थोड्या अवकाशांत तो देश नेपोलियनच्या सत्तेखालीं आणला. तेथील रीजंट राजघराण्यां-तील माणसांसह ब्रेझिल प्रांतांत पळून गेला, व नेपोलियननें तो देश फ्रान्सच्या साम्राज्यास जोडल्याचें जाहीर केलें! **पोर्तुगाल** देश जिंकल्यावर **स्पेन** देश जिंकण्याचीही **नेपोलियनला** उत्कट इच्छा झाली. परंतु तो देश जिंकण्यास सबब काय काढावी, याचा त्याला बराच वेळ विचार करावा लागला. कारण आज सुमारें १५ वर्षेपर्यंत तो देश नेपोलियनच्या इच्छेप्रमाणें वागत आला होता.

११२९

त्यानें स्वतःचें हिताहित बाजूस ठेवूनही अनेक वेळ नेपोलियनची मर्जी राखली होती. अशा देशावर हल्ला करून त्यास पादाक्रांत करणें हें धोक्याचें व अन्यायाचें आहे असें नेपोलियनला खुद्द त्याचें मनही सांगत होतें. परंतु तो या वेळीं साम्राज्यमदानें अत्यंत धुंद झालेला असल्याकारणानें व इंग्लंडसंबंधानें तो पूर्ण विकारवश बनल्यामुळें त्याला विवेक करतां आला नाहीं. इंग्लंडशीं विरोध करण्याच्या धोरणास बळकटी आणण्याकरितां स्पेन देश जिंकणें अवश्य आहे असेंच त्याच्या विकारवश मनानें घेतलें व तो त्याप्रमाणें वागूं लागला. स्पेनच्या राजघराण्यांत व सरदार-मंडळींत त्या वेळीं अत्यंत कलह माजलेला होता. या कलहाचा फायदा घेऊन नेपोलियननें बरेंच मोठें सैन्य स्पेनमध्यें आणलें. इतक्यांत स्पेनची राजाराणी, राजपुत्र आणि त्याचा एक मुख्य अधिकारी–प्रधान–यांच्यांत वाद उपस्थित होऊन ते सर्वजण तो वाद तोडण्याकरितां नेपोलियनकडे आले. तेव्हां त्यांना आपल्या नजरेखालीं ठेवून व गोड गोड बोलून इकडे नेपोलियननें त्यांची सत्ता नष्ट करून टाकण्याचा उद्योग सुरू केला. तें पाहून राजा व राणी भयानें पळून जाऊं लागलीं, तेव्हां लोकांनीं त्यांना जाऊं दिलें नाहीं. त्यांनीं त्यांच्याकडून आपल्या गादीचा राजीनामा घेतला व प्रिन्स फर्डिनंड यास त्यांजकडून वारस नेमून घेतलें. परंतु पुढें लवकरच स्पेनच्या बादशाहानें, ही नेमणूक लोकांनीं आपणाकडून जबरदस्तीनें करवून घेतली आहे असें जाहीर करून, ती रद्द केली. तेव्हां तेथील गादीसंबंधानें साहजिकच वाद उपस्थित झाला.

इतका प्रकार होईपर्यंत नेपोलियनच्या सैन्यानें सुमारें $\frac{1}{3}$ स्पेन देश आपले कबजांत घेतला होता. त्यानें तत्काळ आपला सेनापति म्युरात यास माद्रिड येथें पाठवून, प्रिन्स फर्डिनंडची नेमणूक आपणांस पसंत नसल्यामुळें लवकरच त्या बाबीचा निर्णय आपण स्वतः करणार आहों, असें जाहीर केलें. तेव्हां मॅाद्रिड शहरीं मोठा दंगा सुरू झाला. अर्थात् फर्डिनंड व राजाराणी हीं सर्व पुन्हा नेपोलियनच्या आश्रयास आलीं. तेव्हां त्यानें त्यांच्याशीं युक्तिवाद करून व गोड बोलून स्पेनच्या गादीवरील आपल्या हक्कांचा राजीनामा घेतला व त्यांना मोठ्या नेमणुका करून देऊन आपल्या नजरेखालीं ठेवलें. याप्रमाणें त्यांचा कांटा काढून टाकल्यानंतर नेपोलियननें वेनिसच्या राज्याचा अधिपति असलेला आपला बंधु जोसेफ बोनापार्त यास स्पेनच्या गादीवर बसविलें व वेनिसचें राज्य या प्रसंगीं उत्तम कामगिरी केल्याबद्दल म्युरात यास देण्यांत आलें. आपल्या बंधूस गादीवर बसविल्यावर तेथील सरदारांचें एक नवें कौन्सिल त्याच्या मदतीस देऊन व फ्रान्सच्या राज्यकारभाराच्या अनुरोधानें तेथील राज्यकारभाराचें धोरण ठरवून तो पुढील उद्योगास लागला. स्पेनचें राजघराणें दुर्बल झाल्यामुळें नेपोलियनला जरी ही क्रांति सहज करितां आली, तरी स्पेनचें राष्ट्रीयत्व अद्याप नष्ट झालेलें नसल्यामुळें ती फार वेळ टिकूं शकली नाहीं. नेपोलियन फर्डिनंडला गादीवर बसवून आपल्या देशाच्या सुधारणेस मदत करील अशी प्रथम स्पॅनिश लोकांची कल्पना होती. परंतु त्याच्या उपरोक्त कृतीवरून जेव्हां त्यांचा हा भ्रम दूर झाला, तेव्हां

ते हळुहळू एकत्र जमून परकीयांची सत्ता झुगारून देण्यास उत्सुक झाले. थोड्याच दिवसांत त्यांनीं एक भयंकर बंड उभारलें, व फ्रेंच सैन्याची दाणादाण उडवून त्यांतील २५००० लोक त्यांनीं मारले. बंडवाल्यांपुढें फ्रेंच सैन्याचा जेव्हां टिकाव लागेना, तेव्हां जोसेफ व त्याची दरबारी मंडळी यांनीं मॅड्रिड शहराहून पळ काढला व ते आपल्या सैन्यासह एब्रोनदी-च्या पिछाडीस येऊन उतरले. याच सुमारास इंग्रज सेनापति सर आर्थर वेलस्ली यानें पोर्तुगालांतील फ्रेंच सैन्याचा पराभव करून त्यास फ्रान्समध्यें आणून सोडलें. या दोन्ही पराभवांची वार्ता नेपोलियनच्या कानावर येतांच तो फार संतप्त झाला व त्यानें स्वतः आपली प्रचंड सेना ( Grand Army ) घेऊन स्पेनवर स्वारी करण्याचा ठराव केला. ऱ्हाईन, ओडर, व्हिश्चुला या नद्यांच्या कांठीं असलेल्या प्रदेशांतील बहुतेक सैन्य त्यानें या स्वारीप्रीत्यर्थ जमा केलें, व आपल्या तर्फे या प्रदेशाचें संरक्षण कर-ण्याचें काम त्यानें नुकताच त्याचा दोस्त बनलेल्या रशियन झारकडे सोंपविलें. नेपोलियन स्पेनकडे निघण्यापूर्वीं झारही त्याला भेट-ण्याकरितां जेन्नापासून जवळच असलेल्या एर्फूर्ट शहरीं आला होता. येथें त्यांची प्रेमपुरःसर एक मुलाखत झाली, व उभयतांनीं पूर्वीचा स्नेह कायम ठेवण्याबद्दल एकमेकांस आश्वासनें दिलीं. या ठिकाणीं जर्मन संस्थानांतीलही कित्येक राजे नेपोलियनला मुजरा करण्यास व त्याची मर्जी राखण्याकरितां जमा झाले होते ! इतकेंच नव्हे, तर जर्मनीं-तील प्रख्यात कवि व तत्ववेत्ते—गेटे व वैलंड हेही नेपोलियनची

खुषामत करण्याकरितां तेथें आलेले होते!! हा सर्व देखावा खरोखर एका दृष्टीनें अश्रुतपूर्व प्रेक्षणीय व हेवा करण्यासारखा होता, असें कोण म्हणणार नाहीं? नेपोलियनला तो पाहून केवढी धन्यता वाटली असेल, याचा वाचकांनींच अंदाज करावा! **गेटे, वैलंड** यांच्याबरोबर **नेपोलियननें** ' फ्रेंच रंगभूमि, ' ' ग्रिक राजनीति ' वगैरे विषयांवर संभाषणें करून त्यांचीं मनें त्यानें रिझविलीं! या ( त्याच्या दृष्टीनें ) शुष्क गोष्टी चालू असतां इकडे त्यानें आपल्या स्वारीच्या तयारीचें कामही जोरानें चालविलेलें होतें. स्पेन देश पादाक्रांत करण्याचे कामीं त्यानें झारची संमतिही मिळविली; व हें कार्य पार पडल्यानंतर उभयतांनीं मिळून इंग्लंडलाही आपल्या इच्छेबरहुकूम तह करण्यास भाग पाडावयाचें अशी मसलतही त्यांनीं ठरवून टाकली! त्यानंतर आपल्या साम्राज्याच्या उत्तर भागाचें रक्षण करण्याचें काम झारवर सोंपवून **नेपोलियन** इ. स. १८०८ च्या हिंवाळ्यांत २ लक्ष ५० हजार फौज घेऊन स्पेनच्या सरहद्दीवर येऊन पोंचला. त्याचें तयार व उत्साही सैन्य स्पेनमध्यें शिरतांच त्यास भराभर जागजागीं विजय मिळूं लागले; व थोड्याच दिवसांत त्यानें **मॅाद्रिड** शहरांत प्रवेश करून **जोसफ**ला पुन्हा तेथील गादीवर बसविलें! याप्रमाणें त्याला सकृद्दर्शनीं मोठा विजय मिळाला खरा; परंतु तेवढ्यानें स्पेनमध्यें शांतता झाली नाहीं. बंडवाल्यांची धामधूम कांहीं काळानें पुन्हा जोरांत येऊं लागली व त्यांनीं गनिमी काव्याचें युद्ध सुरू केलें. गनिमी काव्याच्या युद्धास तेथील देशस्थिति फार अनुकूल अस-

त्यामुळें त्यांच्यापुढें फ्रेंच सैनिकांस अनेक वेळ हात टेकावे लागले. **सारागोसा** येथें स्पॅनिश लोकांनीं फारच शौर्य दाखविलें. ह्या जगत्प्रसिद्ध वेढ्यांत नेपोलियनचा अत्यंत शूर सेनापति **लॅनेस** ह्याच्या ताब्यांतलें उत्तमोत्तम सैन्य ठार झालें. ह्या वेळीं **नेपोलियन** पश्चिमोत्तर स्पेनमध्यें आलेल्या ब्रिटिश सेनेचा समाचार घेण्याकरितां गेला होता; त्यालाही वाटेंत फार अडचणी उपस्थित होऊन त्याच्या सैन्याचे हाल होत होते. फ्रेंच सैन्याच्या स्थितीची ही माहिती ऑस्ट्रियन बादशहा व सेनापति यांस कळतांच **नेपोलियन**च्या गैरहजिरीचा फायदा घेऊन त्याच्या मुलखावर स्वारी करण्याचा त्यांनीं बेत केला. ही वार्ता नेपोलियनला कळतांच तो घाईघाईनें **पॅरिस** शहरीं परत आला. त्याच्या मागें इंग्रजी सेनापति **मूर** याचें व त्याचा सैनिक **सौल्ट** याचें युद्ध होऊन त्यांत **मूर** पतन पावला. त्यामुळें ब्रिटिश सैन्य परत गेलें. **नेपोलियन**चें वय या वेळीं सुमारें ४० वर्षांचें होतें. तो बराच स्थूल झाला होता, तथापि त्याची तरुणपणची धमक व सामर्थ्य अद्याप कमी झालें नव्हतें. अद्याप रोज १८–२० मैलांची मजल तो सहज करीत असे. स्पेन मधून **पॅरिस**ला परत येण्याचे वेळीं तर तो याहीपेक्षां अधिक वेगानें चालला. त्याचा उत्साह व तरतरी अद्याप कमी झालेली नव्हती. यामुळें जरी त्याचें उत्तमपैकीं ३ लक्ष सैन्य स्पेनमध्यें गुंतून राहिलें होतें, तरी बाकीच्या ३।४ लक्ष सैन्याच्या जोरावर ऑस्ट्रियाची खोड मोडून टाकूं असा त्यास भरंवसा वाटत होता. तथापि ऑस्ट्रियाखेरीज इतर राष्ट्रेंही त्याच्या स्पेनमधील

कुटिल राजनीतीचें उदाहरण पाहून मनांतल्या मनांत संतप्त झाली होती. प्रशिया व 'ऱ्हाईन संघा'तील इतर जर्मन संस्थानें आणि रशियन दरबारचे बहुतेक लोक यांच्या मनांत त्याच्याविषयीं फिरून आढी उत्पन्न झाली; तथापि त्यांनीं अद्याप उघडपणें त्याच्याशीं वैर मांडलें नव्हतें. तें फक्त एकट्या ऑस्ट्रियानेंच मांडलें होतें. दुसरी एक महत्वाची गोष्ट अशी कीं, नेपोलियननें स्पेनश- केलेलें कारस्थान त्याच्या देशांतील लोकांसही आवडलें ... यामुळें आजपर्यंत फ्रान्सच्या लोकांचें जें नैतिक पाठबळ नेपोलियनला होतें, तें कमी होत चाललें. त्याच्या सामर्थ्याला हा एक जबर धक्काच बसला असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. परंतु साम्राज्य-मदानें धुंद झाल्यामुळें नेपोलियनला या वेळीं या गोष्टीची फारशी परवा वाटली नाहीं. असो; ऑस्ट्रियन सेनापती आर्कड्यूक चार्लस यानें दीड लक्ष सैन्यासह १८०९ च्या एप्रिल महिन्यांत रॅटिस-बोन शहराकडे आपला मोर्चा वळविला. नेपोलियननें याच शहरा-नजीक आपली सर्व फौज जमा करण्याचा आपल्या सेनानींस हुकूम केला होता; मात्र जर शत्रूचें सैन्य त्या शहरावर चाल करून येऊं लागलें तर फ्रेंच सैन्यानें एकदम मागें सरावें अशी त्याची ताकीद होती. परंतु त्याच्या सेनानींकडून त्या ताकिदीकडे दुर्लक्ष करण्यांत आल्यामुळें त्यांचें सैन्य मोठ्या पेचांत सांपडलें. इतक्यांत नेपोलियन पॅरिसहून आणखी सैन्य घेऊन तेथें येऊन पोंचला. फ्रेंच सैन्याची नाजुक स्थिति लक्षांत घेऊन त्यानें आपल्या बुद्धि-कौशल्यानें त्याची अशी खुबीदार रचना व हालचाल केली कीं,

५ दिवसांचे आंत त्यानें आर्कड्यूक चार्लस याचा एकमुहल येथें पराभव करून त्यास पळावयास लावलें. या युद्धांत ५० हजार ऑस्ट्रियन लोक पडले! इटालींतील फ्रेंच मुलखावरही ऑस्ट्रियानें एक मोठें सैन्य पाठविलें होतें. आर्कड्यूकच्या वरील पराभवाची बातमी कळतांच हें सैन्यही घाबरून पळूं लागलें. तेव्हां फ्रेंच सेनानी युजेने यानें त्याचा पाठलाग करून त्यास उत्तरेकडे हांकून लावलें. इकडे नेपोलियन, आर्कड्यूक चार्लसचा पराभव केल्यावर व्हियेन्नावर चाल करून जात होता, त्याची व ह्या सैन्याची वाटेंत एबर्सवर्ग येथें गांठ पडून एक भयंकर लढाई झाली. त्यांतही ऑस्ट्रियन लोकांचा पराभवच झाला. मात्र त्यांचें कांहीं थोडें सैन्य वचावून आर्कड्यूक चार्लसच्या सैन्यांत जाऊन मिळूं शकलें. नेपोलियन ता० १३ मे रोजीं व्हियेन्ना येथें येऊन पोंचला. तेव्हां पूर्वीप्रमाणेंच ऑस्ट्रियाचा बादशहा आपल्या कुटुंबांतील मंडळीसह पळून गेला! नेपोलियननेंही मागील खेपे-प्रमाणेंच शहरांतील मध्यम वर्गाच्या लोकांना फार सौम्यपणानें व गोडीगुलाबीनें वागविलें. व्हियेन्ना येथें आल्यावर त्यानें आपल्या पिछाडीकडील दळणवळणाच्या मार्गाचें रक्षण करण्याची तजवीज केल्यानंतर तो शत्रुसैन्याचा कायमचा मोड करण्याच्या उद्योगास लागला. परंतु या वेळीं त्याच्या मार्गांत बऱ्याच मोठ्या अडचणी होत्या. डान्युब नदीवरचे सर्व पूल त्याच्या ताब्यांत आलेले नव्हते. अशा स्थितींत एक लक्ष सैन्य नदीपार करण्याची त्यास पहिली मोठी अडचण होती. शिवाय त्याचे सैन्यांत नवीन अपरि-

पक पोरांची व भाडोत्री लोकांची बरीच भरती असल्यामुळें अशा आणीबाणीच्या वेळीं कसलेल्या ऑस्ट्रियन सैन्यापुढें त्यांचा कसा काय टिकाव लागेल, याबद्दलही त्यास थोडीशी चिंता वाटत होती. परंतु नेपोलियनच्या सद्दीचा जोर अद्याप कायम होता, व त्याची कुशाग्रबुद्धिही त्यास सोडून गेलेली नव्हती. यामुळें या असामान्य अडचणीसही घाव्यावर बसवून आपलें इष्टकार्य साधण्यास तो मोठ्या उत्साहानें प्रवृत्त झाला. केवळ एका पुलाच्या साह्यानें डान्युब नदी उतरून व्हियेन्नाच्या खालच्या अंगास असलेल्या **लोबो** नामक बेटाच्या आश्रयानें तो डान्युबनदीच्या उत्तर किनाऱ्यावर असलेल्या **अस्पर्न** व **एसलिंग** ह्या गांवीं आला. तेव्हां ता० २१ व २२ मे रोजीं ऑस्ट्रियन सेनापति आर्कड्यूक चार्लस यानें त्याजवर जोराचा हल्ला केला. प्रारंभीं फ्रेंच सैन्यानें वरील दोन्ही ठिकाणांचें संरक्षण फार शिताफीनें केलें, परंतु फ्रेंच सैन्यापेक्षां ऑस्ट्रियन सैन्य फार जास्त असल्यामुळें व त्यानें डान्युब नदीवरील उपरोक्त पूल उडवून दिल्यामुळें फ्रेंचांची स्थिति फार नाजुक झाली. त्यांचें आपल्या सैन्याच्या पिछाडीकडील दळणवळण तुटून त्यांस अन्नसामुग्री व युद्धसामुग्री यांची टंचाई पडूं लागली; तरीदेखील फ्रेंच सेनापति **लॅनेस** व **मासेना** यांनीं आपली शिकस्त करून युद्ध केलें; **लॅनेस** तर त्यांत पडलाच, परंतु अखेर फ्रेंच सैन्यास माघार घ्यावी लागून **लोबो** बेटांत शिरावें लागलें! ह्या ठिकाणीं नेपोलियनचें सैन्य कोंडलें गेल्यामुळें त्याची स्थिति फारच धोक्याची झाली. इतक्यांत, ब्रिटिश सेनापति

वेलस्ली यानें स्पेनमध्यें असलेल्या एका फ्रेंच सेनापतीच्या सैन्याचा पराभव केल्याची व ब्रिटिश आरमार अँटवर्पवर स्वारी करण्याच्या तयारींत असल्याची निरुत्साहात्मक बातमी नेपोलियनला समजली. इकडे त्याचे सेनापतीहि हातपाय गाळून त्यास मागें परतण्याचा सल्ला देऊं लागले. अशा वेळीं केवढाही शूर मनुष्य असता तरी तो थोडासा तरी कचरला असता; परंतु नेपोलियनची प्रवृत्ति कांहीं निराळीच होती. जों जों संकट जास्त धोक्याचें, तों तों त्याचें धैर्य अधिकाधिक दुणावत जाई आणि या नियमाप्रमाणें ह्या वेळींही त्यानें आपल्या सैनिकांच्या निराशात्मक सल्ल्याचा अव्हेर करून मोठ्या धाडसानें शत्रूवर तुटून पडण्याचा निश्चय केला! सुमारें एक महिन्याच्या आंत त्यानें डान्युब नदीच्या उताराची व आपल्या दळणवळणाच्या मार्गाची उत्कृष्ट सोय करून तो युद्धास तयार झाला. एवढ्या अवकाशांत आर्कड्युक चार्लस यानें कांहींही महत्वाची हालचाल केली नाहीं. नेपोलियनच्या सैन्याला डान्युब नदी उतरतां येणार नाहीं, अशा भ्रमांत तो होता व कांहीं अंशीं त्याची ही कल्पना बरोबरही होती. शिवाय आर्कड्यूक जॉन याच्या सैन्याचीही तो वाट पहात होता. शत्रूच्या ह्या स्तब्धतेचा नेपोलियनला फार चांगला उपयोग झाला. त्याला त्यामुळें स्वसैन्याच्या व्यूहाची यथायोग्य रचना करण्यास फुरसत सांपडली. नेपोलियनची डॅन्युब नदी उतरून जाण्याची सर्व तयारी ता० ४ जुलईस पूर्ण झाली व त्या दिवशीं रात्रीं त्यानें मुद्दाम तयार केलेल्या पुलाच्या मार्गावरून

अंधाराच्या आश्रयानें आपली फौज पैलतीरास नेण्यास सुरवात केली. सकाळपर्यंत त्यानें सुमारें ७० हजार फौज नदीपार नेली व बाकीची दोन प्रहरपर्यंत येऊन मिळाल्यानंतर त्या दिवशीं तिसऱ्या प्रहरीं आपल्या व्यूहाची रचना पूर्ण करून तो लढाईस तयार झाला. परंतु शत्रुपक्षानें एका लहानशा चकमकीशिवाय विशेष कांहीं हालचाल न केल्यामुळें तो दिवस तसाच निघून गेला. दुसरे दिवशीं म्हणजे ता० ६ जुलई रोजीं पहाटे दोन्ही सैन्यांना स्फुरण चढून लढाईचें तोंड लागलें. ही लढाई **वॅग्रॅम**च्या टेकड्यां-वर झाली. या लढाईंत दोन्ही पक्ष अगदीं निकरानें लढले, परंतु नेपोलियनच्या कुशाग्रबुद्धीमुळें अखेर फ्रेंचांचाच विजय झाला. तथापि या युद्धांत त्यांचें सैन्यही पुष्कळ पडलें. ऑस्ट्रियन सैन्याची तर पुरी दाणादाण उडून गेली. त्यांचें राहिलेलें सैन्य भयानें पळत सुटलें. पण नेपोलियनच्या सैन्याचीही फार खराबी झालेली असल्यामुळें नेहमींप्रमाणें त्यानें शत्रूचा पाठलाग केला नाहीं. ह्या पराभवामुळें ऑस्ट्रियाचें सामर्थ्य अगदींच खालावलें व त्यानें तहाचें बोलणें सुरू केलें. परंतु अँटवर्पवर इंग्लंडची जी स्वारी होणार होती, तिचा निकाल लागेपर्यंत त्यानें तहाचें काम तसेंच रेंगाळत चालविलें होतें. अखेर सदर स्वारीचें ओंफस झाल्याचें वृत्त आस्ट्रियास समजलें, तेव्हां नेपोलियन सांगेल त्या शर्तीवर त्याच्याशीं तह करणें त्यास भाग पडलें. हा तह **व्हियेन्ना** येथें इसवी सन १८०९ च्या आक्टोबर महिन्यांत पूर्ण करण्यांत आला. त्या अन्वयें नेपोलियननें ऑस्ट्रियाचा भाणखी बराच

मुलूख फ्रेंच साम्राज्यास जोडला व दीड लक्षापेक्षां जास्त सैन्य ऑस्ट्रियानें ठेवूं नये, असें बंधन घालून त्यानें ऑस्ट्रियन राष्ट्रास तिसऱ्या प्रतीचें राष्ट्र बनवून टाकलें. हा तह झाल्यावर नेपोलियन फ्रान्सला निघून गेला. ह्याच सुमारास त्याच्या आयुष्यांतील आणखी एक महत्वाची घडामोड झाली. त्याला त्याची स्त्री जोसेफाईन हिच्यापासून संतति होण्याचा संभव दिसेना; व त्याचें साम्राज्य तर अवाढव्य वाढत चाललें होतें. या साम्राज्याला त्याच्या सरळ वंशांतला वारस असावा असा विचार त्याच्या भोंवतालच्या मंडळींत निघून त्यांनीं त्यास दुसरें लग्न करण्यास प्रवृत्त केलें. हें लग्न अर्थात्च आतां एखाद्या मरूयात राजघराण्यांतील मुलीशीं करणें अवश्य होतें. नेपोलियनला योग्य अशा दोन राजकन्या त्या वेळीं पुढें आल्या होत्या. एक झारच्या घराण्यांतली व दुसरी ऑस्ट्रियन ऊर्फ हॅप्सबर्ग घराण्यांतली. पैकीं दुसरी नेपोलियननें पसंत केली. व अशा रितीनें निकट संबंध जडल्यामुळें तरी फ्रान्स व ऑस्ट्रिया या दोन राष्ट्रांत कायमचा स्नेह नांदेल अशा भावनेनें ऑस्ट्रियन बादशहानें ह्या लग्नास आपली संमति दिली. तत्कालीन कायद्याप्रमाणें हें लग्न होण्यापूर्वीं पहिलें लग्न रद्द करणें जरूर असल्यामुळें नेपोलियननें मोठ्या दुःखानें ( कारण, जोसेफाईनवर त्याचें खरें प्रेम होतें. ) तें रद्द करविलें. नंतर (इ. स. १८१० त) लवकरच येणाऱ्या वसंतऋतूंत ऑस्ट्रियन राजकन्या **मराया लुसी** हिच्याशीं पॅरिस येथील **टुलरीज** नामक राजवाड्यांत नेपोलियनचें मोठ्या थाटानें लग्न झालें ! ह्या लग्नामुळें सामाजिक

दृष्टयाही नेपोलियनच्या वैभवाचा कळस झाला ! कोठें यःकश्चित् कॉर्सिकन शिपाई व कोठें अत्यंत जुनाट व अभिमानी—ताठर—ऑस्ट्रियन राजघराणें ! कशास कांहीं संबंध ? पण दैवाची लीला अशी कांहीं विचित्र आहे कीं, त्यामुळें अनेक वेळ सामान्य दृष्टीला अगदीं असंभाव्य वाटणाऱ्या गोष्टीही प्रत्यक्ष घडून येत असतात ! आणि त्यांपैकींच नेपोलियनच्या भाग्योदयाचा हा प्रकार आहे ! नेपोलियनच्या चारित्र्यांत जिकडे तिकडे कर्तृत्वाचें तेज तर चमकत आहेच; पण त्यांत दैवाच्या अद्भुत लीलेचा भागही कांहीं कमी नाहीं, असें त्याकडे सूक्ष्मदृष्टीनें पहाणारास तेव्हांच कळून येईल.

---

## प्रकरण ९ वें.

### उतरती कळा.

नेपोलियनचा भाग्यसूर्य आतां माध्यान्हीं येऊन ग्रीष्मऋतूंतील तप्त सूर्याप्रमाणें युरोपांतील राजे लोकांस असह्य पीडा देऊं लागला होता. त्याचा सर्वांत मोठा कटाक्ष इंग्लंडवर होता. इंग्लंडचा व्यापार हाणून पाडण्याकरितां त्यानें 'Continental system' या नांवाचा जो एक प्रतिबंधक कायदा केला होता, तो धाब्यावर बसवून यूरोपांतील कित्येक तटस्थ व स्वतंत्र राष्ट्रें इंग्लंडच्या संमतीनें तेथील माल लबाडीनें आणि गुप्तपणानें युरोपखंडांत

आणीत होतीं. अशीं सुमारें १०० जहाजें भरून माल त्यांनीं निरनिराळ्या युक्त्या करून युरोपच्या किनाऱ्यावर आणला. ही गोष्ट नेपोलियनला समजतांच त्यानें सदर कायदा कडक रीतीनें अंमलांत आणण्याचे उपाय योजले. उत्तरेस डँझिगपासून तो दक्षिणेस मार्सेलसपर्यंत व तेथून पूर्वेस ट्रियेस्टपर्यंत युरोपियन किनाऱ्यावर त्यानें लष्करी शिपायांचा सक्त पहारा ठेवला. तसेंच तटस्थ राष्ट्रांच्या तटस्थवृत्तीचा भंग करणारांस त्यानें जबर शासन करण्यास सुरवात केली. या कडक बंदोबस्तामुळें इंग्लंडचें पुष्कळ नुकसान होऊं लागलें. त्याच्या नोटांचा भाव उतरला, व तेथील कामकरी वर्गास काम मिळेनासें होऊन गेलें! तसेंच युरोपांतील राष्ट्रांना—खुद्द फ्रान्सलासुद्धां—नित्य व्यवहारांत लागणाऱ्या वस्तू दुर्मिळ होऊं लागल्या. त्यामुळें नेपोलियनच्या ह्या कायद्यामुळें तीं राष्ट्रेंही असंतुष्ट होत चाललीं. हालंड व बेल्जम हे नेपोलियनच्या साम्राज्यांतले देश तर केवळ उद्योगधंद्यावर जगणारे होते. त्यांच्या व्यापारास धक्का बसल्यामुळें त्यांची दुर्दशा होऊं लागली. हीच स्थिति थोड्या फार अंशानें इतर व्यापारी देशांचीही होऊं लागली. साम्राज्यांतील व्यापारास हा जो धक्का बसूं लागला, तो दूर करण्याकरितां नेपोलियननें परकीय माल कांहीं विशेष शर्तींवर युरोपांत आणण्याची सवलत दिली व स्वदेशांतील व्यापारास उत्तेजन देऊन त्यानें परदेशी मालावर जबर जकात बसाविली. परंतु या उपायानें युरोपियन व्यापाऱ्यांच्या स्थितींत फारशी सुधारणा होऊं शकली नाहीं. इंग्लंडचेंही त्यामुळें व्हावें तितकें नुकसान झालें नाहीं.

अर्थात्, इंग्लंडला शह देण्याचें कार्य तर ह्या प्रतिबंधक कायद्यानें झालें नाहींच, पण उलट युरोपांतील प्रमुख राष्ट्रें मात्र असंतुष्ट बनलीं. हा कायदा करण्यांत नेपोलियनची मोठी चूक झाली. ह्यामुळें प्रशिया, ऱ्हाईन संघांतील संस्थानें, रशिया, हालंड व ऑस्ट्रिया येथील सामान्य जनतेलाही तो अप्रिय होत गेला. यापूर्वी युरोपांतील सामान्य जनता त्याच्या अद्भुत पराक्रमांनीं दिपली जात असे व त्याचें एक प्रकारें कौतुक करीत असे. परंतु ती स्थिति आतां झपाट्यानें बदलत चालली. खुद्द फ्रान्स देशांतही लोकमत त्याच्याविरुद्ध होऊं लागलें. इतके दिवस फ्रेंच लोक त्याला आपला पुरस्कर्ता व हितकर्ता मानून त्याचा गौरव करीत होते; त्यांना आतां त्याच्या कृति जुलमी व भीतिदायक वाटत चालल्या. त्याच्या लढाईच्या धोरणास तर ते लोक आतां पूर्णपणें कंटाळून गेलेले होते. नवीन नवीन मुलूख जिंकून फ्रान्सच्या साम्राज्याची मर्यादा वाढविणें त्यांना पसंत वाटत नव्हतें. परंतु त्यांचें आतां त्याच्यापुढें कांहींएक चालण्यासारखें नसल्यामुळें त्यांनीं आपला असंतोष अद्याप विशेष रीतीनें प्रकट केलेला नव्हता. तथापि त्यांचें नैतिक पाठबळ नेपोलियनला आतां उरलें नव्हतें, हें मात्र कोणा-सही सहज कळून येण्यासारखें होतें. तशांत त्याचा राज्यकारभार-ही दिवसानुदिवस एकतंत्री व कांहींसा जुलमी होत चालला होता. स्पेनसारख्या निरुपद्रवी देशांतील राजघराण्याचा त्यानें व्यर्थ उप-मर्द केल्यामुळें त्या घराण्याचा अभिमान बाळगणारें आस्ट्रियन राजघराणें व त्याच्या प्रभावळींतील सरदार लोक हे फार संतप्त

झाले व या कृत्याबद्दल नेपोलियनचा सूड उगविण्याची संधी पाहूं लागले. ह्या सुमारास नेपोलियननें रोमच्या **पोपलाही कैदेंत टाकून त्याचा सर्व मुलुख खालसा केल्यामुळें युरोपियन राष्ट्रांचा द्वेषाग्नि फारच भडकत चालला.** त्याचा स्नेही रशियन झार याचेंही मन आतां त्याच्याविषयीं बिघडत चाललें. त्यानें स्पेनमध्यें तीन लक्ष सैन्य ठेवून जें युद्ध सुरू केलें होतें, त्यांत, स्पॅनिश लोकांना इंग्रजी सेनापति **वेलिंगटन** यानें वेळोवेळीं मदत केल्यामुळें, त्यास अपयश येत चाललें होतें. त्याचा मुख्य जनरल **मासेना** ह्यानें त्यास आणखी सैन्याची मदत पाठविण्याविषयीं सारखें टुमणें लावलें होतें. **मासेना**च्या मदतीस स्वतः जाण्याचा नेपोलियनचा बेत होता. परंतु अंशतः त्याच्या नव्या लग्नामुळें व अंशतः बदलत चाललेल्या परिस्थितीच्या काळजीमुळें त्याच्याकडून तो बेत सिद्धीस गेला नाहीं. नेपोलियनची ही दुसरी मोठी चूक होय. या चुकीचा परिणाम असा झाला कीं, इंग्लंडला स्पेनमध्यें त्याच्याविरुद्ध कारस्थान करण्यास व तेथून त्यास शह देण्यास आयतीच संधी सांपडली. त्याच्या गैरहजिरीमुळें त्याचे सैन्याचा दम सुटत चालला; व जरी **मासेना** यानें आपल्या शौर्याची पराकाष्ठा केली, तरी त्याला स्पेन व पोर्तुगाल यांच्या दरम्यान **टोरेस व्हेद्रास** येथें पराभव पावून परत फिरावें लागलें. नेपोलियननें त्याबद्दल त्याचा दर्जा कमी केला; परंतु असें करणें न्यायाचें नसल्यामुळें अर्थात्‌च तो त्याच्यावर नाराज झाला. तसेंच साम्राज्यामध्यें सक्तीनें लष्करी चाकरी घेण्याचा कायदा असल्यामुळें व त्या योगानें सतत युद्ध चालू राहून प्रजेची फाजील प्राणहानि होत असल्या-

मुळें आणि त्या मानानें फायदा कांहीं नसल्यामुळें तिकडूनही लोक हवालदील व नाराज होत चालले होते. याप्रमाणें नेपोलियनच्या साम्राज्यावर चारी बाजूनें ढग जमा होत चालले होते. परंतु ते अद्याप स्पष्ट दिसत नव्हते. नेपोलियनची भरभराट अद्याप तशीच चालू होती. त्याला अद्याप महत्वाचा असा अपजय आलेला नव्हता; त्यामुळें पॅरिसमधील त्याचें वैभव व थाटमाट यांत कांहीं कमी पडलेलें नव्हतें. पॅरिस हें गतकालीन रोम शहर बनलें होतें. अर्थात् रोमन साम्राज्याची जी वाट लागली, तीच ह्या साम्राज्याचीही लागावयाची, हें सूक्ष्मदृष्टीनें पहाणारांस मात्र कळून येण्यासारखें होतें. परंतु अद्याप तशा प्रकारचीं कांहीं स्पष्ट चिन्हें ठळकपणें दिसून येत नव्हतीं. तथापि नेपोलियनला ह्या बदललेल्या परिस्थितीची कल्पना येत चालली होती; व तो तिचा शक्य तितका प्रतिकार करण्याच्या प्रयत्नांतही होता. इंग्लंड, रशिया व ऑस्ट्रिया यांचें सामर्थ्य नष्ट केल्यावांचून आपलें साम्राज्य सुरक्षित रहावयाचें नाहीं हें तो जाणून होता. पैकीं ऑस्ट्रियाची पुरती खोड त्यानें नुकतीच मोडली होती व रशियाशीं स्नेह संपादून इंग्लंडची खोड मोडण्याच्या उद्योगास तो लागला होता. परंतु स्पेनमध्यें ब्रिटिश लष्करच्या साह्यानें स्पॅनिश लोकांनीं नेपोलियनच्या सैन्याचा पराभव केलेला पाहून रशियाही नेपोलियनशीं स्पर्धा करून त्याच्याविरुद्ध गुप्त कारस्थान करूं लागला. ही गोष्ट नेपोलियनच्या लक्षांत येऊन चुकल्यामुळें तो रशियाची खोड मोडण्याच्या तयारीस लागला. रशियासारख्या विस्तृत व अंशतः

ओसाड भूप्रदेशांत सैन्याची हालचाल करणें किती दुर्घट आहे, याची नेपोलियनला पुरी कल्पना असल्यामुळें त्यानें आपली मोहीम यशस्वी करण्याचे अटोकाट प्रयत्न चालविले. त्यानें अनेक महिनेपर्यंत गुप्तपणें रशियन सरहद्दीवर रसद पोंचविण्याचें काम सुरू ठेवलें व सैन्याचीही जमवाजमव सुरू केली. ही सर्व तयारी होईपर्यंत त्यानें झारला आपल्या हेतूचा मागमूसही लागूं दिला नाहीं. त्यामुळें तो गैरसावध राहिला. त्यानें अगदीं आयत्या वेळे-पर्यंत त्याच्याशीं मिठास भाषण चालू ठेवलें होतें. नेपोलियनची तयारी इसवी सन १८१२ च्या उन्हाळ्यांत पूर्ण झाली. त्या वेळीं झारनें तुर्कस्थानावर स्वारी केली होती. ही संधी साधून नेपोलियननें मे महिन्यांत आपलें सैन्य झारच्या सरहद्दीवर जमविलें; आणि ह्या मोहिमेची व्यवस्था करण्याकरितां तो स्वतः आपल्या नव्या राणी-सह पॅरिसहून निघाला. परंतु या वेळीं पॅरिसमध्यें त्याचा कोणीं जयजयकार केला नाहीं. त्याची ही मोहीम तेथील लोकांस पसंत नव्हती. यामुळें ते त्यासंबंधानें पूर्ण उदासीन होते. परंतु तो ड्रेसडेन येथें आल्यावर मात्र त्याच्याभोंवतीं त्याच्या मांडलिकांचा घोळका जमा झाला व त्यांनीं चार दिवस त्याचें मोठ्या थाटानें आगत-स्वागत करून त्याचें व त्याच्या राणीचें मन रिझविलें! त्याच्या मांडलिकांनीं या वेळीं त्याची खूप स्तुति केली व अशा 'थोर व परा-क्रमी बादशहाशीं विरोध करण्यांत झारचा मूर्खपणा मात्र दिसून येत आहे' अशा अर्थाचे उद्गारही त्यांनीं काढले! याप्रमाणें चार दिवस ख्यालीखुशालींत घालवून नेपोलियन तत्काळ रणभूमीकडे

वळला. तो जूनच्या ३ ऱ्या आठवड्यांत **नेमन** नदीजवळ येऊन दाखल झाला व तोंपर्यंत त्याचें सैन्यही सुरक्षितपणें रशियन सरहद्दीवर येऊन पोंचलें. ता० २४ जून स. १८१२ रोजीं नेपोलियन ही नदी ओलांडून **कौनो** येथें आला व तेथून **पोलंड**मध्यें शिरण्याचा व त्याच्यावर चाल करून येणाऱ्या दोन विभागलेल्या रशियन सैन्यांचा एकदम पाडाव करण्याचा त्याचा विचार होता. परंतु या वेळीं त्याचें सैन्य त्याच्या पूर्वींच्या सैन्याच्या तोडीचें नव्हतें. त्यांत पोरांची व भाडोत्री शिपायांचीच फार भरती होती. तसेंच त्याचे प्रमुख, कसबी व शूर सेनापति ह्या स्वारींत नव्हते. कांहीं वारले होते व कांहीं त्याच्या रोषास पात्र झाल्यामुळें स्वस्थ बसले होते. सैन्याची ही उणीव भरून काढण्याकरितां **नेपोलियन**नें पुष्कळ परिश्रम केले. परंतु अखेरीस त्याच्या योजनेप्रमाणें त्याच्या सैन्याच्या हालचाली होईनात. यामुळें शत्रूवर एकदम छाप बसविण्याचा **नेपोलियन**चा बेत फसला. तो **पोलंड**मध्यें येऊन **विलना** येथें आपल्या सैन्याची वाट पहात बसला. परंतु त्यास येण्यास उशीर लागल्यामुळें रशियन सेनापतीस सुरक्षितपणें मागें हटण्यास सवड सांपडली. पुढें, सैन्य आल्यावर **नेपोलियन**नें रशियन सैन्याचा पाठलाग केला, पण त्यांत कांहीं विशेष निष्पन्न झालें नाहीं. तेव्हां त्याला **रिटेप्स्क** येथें दीर्घकालपर्यंत मुक्काम करावा लागला. त्याचें सैन्य तेथें येऊन पोहोंचेपर्यंत त्यापैकीं सुमारें १॥ लाख लोक रोगराई, उपासमार व पळपुटेपणा इत्यादि कारणांमुळें नाहींसे झाले होते! लढाईचें तोंड लागण्यापूर्वींच सुमारें

एकतृतीयांश सैन्य नष्ट झालेलें पाहून कोणत्या सेनापतीस विषाद वाटणार नाहीं ? तथापि **नेपोलियन** डगमगला नाहीं. त्यानें स्वारीचें काम तसेंच पुढें चालू ठेवलें! ता० १७ आगष्ट रोजीं तो **स्मोलेन्स्क** येथें येऊन दाखल झाला. परंतु त्याच्या शत्रूंनीं तो येण्यापूर्वींच तें शहर उध्वस्त करून टाकलें होतें! इतक्या अवकाशांत रशियन सैनापति **बार्के** व **बाग्रेशन** यांच्या फौजा एकत्र होऊन **डिना** आणि **डेनियर** या नद्यांच्या मध्यभागीं असलेल्या मैदानांत येऊन दाखल झाल्या. या वेळीं हिंवाळाही सुरू झाला होता. अशा स्थितींत हिंवाळा संपेपर्यंत पुढें चालून जाऊं नये म्हणून **नेपोलियन**च्या सैनिकांनीं त्यास पुष्कळ उपदेश केला; परंतु तो त्यानें ऐकला नाहीं. कारण **स्मोलेन्स्क** शहरापासून **मास्को** हें राजधानीचें शहर नजिक होतें; आणि तें काबिज केल्यास झार तत्काळ तह करण्यास तयार होईल, असा त्याचा समज होता. म्हणून त्यानें आपल्या पिछाडीच्या रक्षणाची योग्य व्यवस्था करून ( प्रत्येक युद्धांत **नेपोलियन** ह्या गोष्टीविषयीं फार दक्ष असे. ) पुढें चाल करून जाण्याचा निश्चय केला. त्यानें आगष्टच्या शेवटच्या आठवड्यांत **स्मोलेन्स्क** शहर सोडलें. त्याच्याबरोबर सुमारें १॥ लक्ष सैन्य होतें. बाकीच्या सैन्याचे ३ मोठे विभाग करून ते त्यानें बालटिक समुद्र, काळा समुद्र आणि कास्पियन समुद्र यांस मिळणाऱ्या नद्यांच्या खोऱ्यांतून पसरून दिले होते. नेपोलियनचें सैन्य जसजसें पुढें येत चाललें, तसतसे रशियन सेनापति आपला प्रदेश ओसाड व उध्वस्त करून मागें हटूं

लागले. त्यामुळें फ्रेंच सैन्याचे फार हाल होऊं लागले. नेपोलियनचें सैन्य मुख्यतः जिंकलेल्या मुलुखावर जगत असे. परंतु ही गोष्ट स्पेनमध्यें व प्रस्तुत युद्धांत रशियामध्यें साधण्यासारखी नसल्यामुळें दोन्ही ठिकाणीं त्याच्या मार्गांत भयंकर अडचणी उत्पन्न झाल्या. ह्या अडचणींचा नेपोलियनच्या मनावरही इतका परिणाम झाला कीं, तो परत मागें फिरण्याचा विचार करूं लागला. इतक्यांत रशियन सैन्य माघार घेण्यास नाखूष असल्याचें वर्तमान त्याला समजलें व तें खरें होतें. रशियन सैन्याच्या संतोषाकरितां झारनें **बार्क्ले** यास परत बोलावून त्याची जागा **कुटसॉफ** यास दिली. त्यानें लढाई करण्याचा संकल्प करून **बोर्डिनो** गांवानजिक आपल्या सैन्याचा तळ दिला. येथें त्याची व नेपोलियनची गांठ पडून एक बरीच महत्त्वाची लढाई झाली व त्यांत **नेपोलियन**चा विजय झाला. या लढाईंत जरी सुमारें ५० हजार रशियन सैन्य पडलें, तरी तेवढ्यानें **कुटसॉफ** याचा पुरा मोड झाला नाहीं. तो राहिलेलें सैन्य घेऊन पुन्हा पळत सुटला. नेपोलियन ह्या वेळेस आजारी पडला. त्यामुळें तो त्याचा पाठलाग करण्याच्या भरीस पडला नाहीं. मात्र त्यानें लवकरच **मास्को** शहर गांठलें. परंतु हें शहरही रशियन लोकांनीं तो येण्यापूर्वींच उजाड करून टाकलें होतें ! **नेपोलियनचा मास्को** येथें तळ पडल्यावर रशियन लोकांनीं आसपासच्या रानांस आग लावून दिली ! या सर्व चिन्हांवरून **नेपोलियननें** जो धडा घ्यावयाचा, तो त्यानें घेतला नाहीं. झार आतां लवकर तहास सिद्ध होईल, या आशेनें तो तेथेंच पडून

राहिला. परंतु पुष्कळ दिवस झाले तरी तहाचें कांहींएक लक्षण दिसेना. उलट **मास्को**पासून पलीकडे कांहीं अंतरावर रशियन सेनापति नवीन सैन्य जमा करीत असल्याचें त्यास आढळून आलें. तेव्हां त्यानें **सेंटपिटर्सबर्ग**वर चाल करण्याविषयीं आपल्या सैनिकांचें मन वळविण्याचा यत्न केला. पण **मास्को**च्या कडक थंडीमुळें त्याच्या सैन्याची दुर्दशा होत चालली होती; अशा स्थितींत पुढें जाणें धोकयाचें वाटून त्यांनीं त्याचें म्हणणें ऐकलें नाहीं. तेव्हां नाइलाज होऊन त्यानें परत फिरण्याचा हुकूम दिला. परत येतांना थंडी, दुष्काळ व रोग यांमुळें त्याचें बहुतेक सैन्य दगावलें. त्याचें राहिलेलें सैन्य वाटेंत एका लहानशा नदीवर शत्रूच्या आटोक्यांत सांपडलें होतें; परंतु **नेपोलियन**नें मोठ्या कुशलतेनें व धाडसानें ह्या प्रसंगांतून तें सोडविलें. नंतर ह्या सैन्यास **स्मोरगोनी** येथें सोडून व आपल्या सर्व सैन्याचें आधिपत्य **म्युराट** यास देऊन तो **पॅरीस**ला निघून आला. त्याच्या मागून त्याचें सैन्य आलें, पण त्याची संख्या आतां फारच थोडी उरली होती. थंडी, उपासमार, रोग व इतर हालअपेष्टा यांनीं त्याच्या ४। लक्ष सैन्यापैकीं ४ लक्ष सैन्याचा चुराडा केला ! व सुमारें २५ हजार सैन्य कसें तरी रडतखडत परत आलें ! **नेपोलियन**चा हा पराभव व सैन्यनाश त्याच्या चरित्रांत अत्यंत महत्वाचा आहे. कारण त्यामुळें त्याचें माहात्म्य व वैभव यांस उतरती कळा लागत जाऊन पुढें क्रमाक्रमानें तो रसातळास जाऊन पोंचला ! इटालींतील पहिला दिग्विजय हा जसा त्याच्या भाग्योदयाचा पाया, तसाच हा परा-

भत्र व ही सैन्यहानि हा त्याच्या नाशाचा पाया होय! येथून पुढें **नेपोलियन**ला स्वास्थ्य मिळालेंच नाहीं. त्याचें पुढील सर्व आयुष्य कष्टांत, काळजींत व आपत्तींत गेलें. असो; रशियांतून नेपोलियन परत येतो तों **मॅलेट** नांवाच्या एका जुन्या राजवटींतील लोकसत्तावादी मनुष्यानें त्याचा खून करण्याप्रीत्यर्थ केलेला कट उघडकीस आला! ह्या कटाचें निमूर्लन केल्यानंतर तो आपल्या सैन्याची नवी जमवाजमव करूं लागला. त्यानें रशियावर केलेली स्वारी जरी फ्रेंच राष्ट्रास पसंत नव्हती, तरी त्या स्वारीचे जे अनिष्ट परिणाम झाले त्यायोगानें फ्रेंच राष्ट्राच्या वैभवास व इभ्रतीस धक्का बसण्याचा संभव असल्यामुळें फ्रान्सचें लष्करी सामर्थ्य कायम राखण्याकरितां तेथील सर्व लोकांनीं पैसा व माणसें यांचा **नेपोलियन**ला मोठ्या उत्सुकतेनें पुरवठा केला. इतक्यांत जर्मन संस्थानांच्या प्रजेनें त्याच्या सत्तेविरुद्ध बंड सुरू केल्याची व त्या बंडवाल्यांच्या मदतीस रशियन सैन्य येत असल्याची खबर त्यास लागली. नेपोलियन सैन्याची जमवाजमव करीत होताच. सुमारें ३ महिन्याच्या आंत त्यानें दोन लक्ष सैन्य युद्धास तयार केलें व त्याचे सात विभाग करून त्यानें तें सैन्य **ऱ्हाइन** व **एल्ब** या नद्यांच्या नजिक पाठविलें. याखेरीज आणखी थोड्या दिवसांत त्यानें सुमारें ३ लक्ष सैन्य नवीन तयार केलें. नेपोलियननें हें सर्व सैन्य जरी कुशलतेनें शिकवून तयार केललें होतें, तरी तें अगदीं नवाशिक्या अर्थात् अनुभवशून्य लोकांनीं भरलें असल्यामुळें **आस्टरलित्झ, जेन्ना, फ्रेडलँड** वगैरे ठिकाणीं लढलेल्या सैन्याच्या योग्यतेचें तें नव्हतें. परंतु सैन्याच्या अंगची ही उणीव

आपण आपल्या लष्करी डावपेंचांनीं व कुशलतेनें भरून काढूं, असा आत्मविश्वास बाळगून नेपोलियन रणभूमीकडे निघाला. तो एप्रिलच्या ३ ऱ्या तारखेस ( १८१३ ) **मेयन्स** शहरांत येऊन पोंचला. ऱ्हाईन-संघांतील संस्थानें आपल्या बाजूस वळविण्याकरितां तो येथें आला. तें कार्य करून तो पुढें तसाच निघाला, व जेव्हां शहर ओलांडून त्यानें आपला लेफ्टनंट **यूजेने**—जो त्याच्या सैन्यास मिळण्याकरितां **एल्ब** नदीच्या पश्चिम तीरावरून येत होता—त्यास गांठलें. येथें रशियन स्वारींतून परत आलेलें कसलेलें सैन्य व अधिकारी आणि फ्रान्सांतून नुकतेंच आलेलें नवशिकें सैन्य यांची परस्पर भेट झाली. तेव्हां भावी रणसंग्रामाची कल्पना मनांत येऊन सर्वांच्या मनोवृत्ति उचंबळून गेल्या; व ते एकमेकांच्या हातांत हात घालून समरभूमीकडे निघाले. ह्या सुमारास प्रशियानेंही फ्रान्सविरुद्ध युद्ध जाहीर केलें असून प्रशिया व रशिया यांचें सुमारें एक लक्ष सैन्य **ओडर** व **व्हिश्चुला** यांच्यामध्यें असलेल्या किल्ल्यांना वेढा देण्याकरितां चालून येत होतें. जर्मनींत सुरू असलेल्या बंडाच्या चळवळीस उत्तेजन देण्याकरितां हें सैन्य इतक्या तांतडीनें पुढें निघालें होतें. **नेपोलियननें** ह्या सैन्यास एल्ब नदीनजिक गांठून खूप मार देण्याचा बेत योजिला; व त्या हेतूनें त्यानें आपलें सैन्य **लेप्झिक्** शहराच्या रोखें चालविलें. वाटेंत **लुट्झेन्** येथें रूसो-प्रशियन सैन्याची व त्याच्या सैन्याची गांठ पडून लढाई जुंपली. ह्या लढाईस प्रारंभ होतांच इतालींतील दिग्विजयापासून त्याचे सन्निध असलेला **बेसेरेस** नामक हुशार

सेनापति एकाएकीं आकस्मिक रीतीनें गोळी लागून मरण पावला! परंतु ह्या अपशकुनास धैर्यानें बाजूस ठेवून नेपोलियननें लढाईचें काम कसून चालविलें. त्याचें फळ त्याला लवकरच मिळालें. थोड्याच वेळांत त्याच्या शत्रूंचा पराभव होऊन ते पिछेहाट करूं लागले. नंतर नेपोलियन ड्रेसडेन शहरांत शिरला. तेथें त्यानें आपलें आसपासचें सर्व सैन्य जमेपर्यंत मुक्काम केला व नंतर शत्रु-सैन्यावर पुन्हा चाल करून त्यानें त्यांचें बोट्झेन नामक ठाणें जिंकून घेतलें. याप्रमाणें जरी त्याला लागोपाठ दोन विजय मिळाले, तरी तेवढ्यानें लढाईचा शेवट लागेना. रूसो-प्रशियन सैन्य सारखें मागें हटत चाललें; परंतु त्यांचा पाठलाग करण्याचें धाडस नेपोलियनच्या नवशिक्या लष्कराचे हातून होईना. तेव्हां त्याला आणखी एखादी लढाई करून शत्रूचा पुरा मोड करण्याची संधी येण्याची वाट पहात बसावें लागलें. इतक्यांत आस्ट्रिया व रशिया यांची गुप्त खलबतें चालू असल्याची बातमी त्यास समजली. तेव्हां ऑस्ट्रियाला आपल्या बाजूस वळविण्याकरितां त्यास त्यानें सिलेसिया प्रांताची लालूच दाखविली. आस्ट्रियाचीं राज्यसूत्रें या वेळीं मेटरनिच नामक एक हुषार मुत्सद्दी चाळवीत होता. त्यानें नेपोलियनची सूचना मान्य केल्यासारखें दाखवून आपल्या सैन्याची जय्यत तयारी केली; व ती झाल्यावर मग प्रशिया व रशिया यांचा फ्रान्सशीं तह जुळवून आणण्याचे कामीं आपण मध्यस्थी करण्यास तयार आहों, असें त्यानें नेपोलियनला कळविलें! तसेंच तहाच्या अटींचा एक मसुदाही त्यानें त्याच्याकडे पाठविला! ह्या तहान्वयें हानसे, टाउन्स

व इलरियन परगणे, ऱ्हाईन संघांतील संस्थानें व वार्सा प्रांत इतका मुलुख सोडावा लागणार होता. तसेंच सिसली व स्पेन येथें जर पूर्वींचे बोरबोन घराण्यांतील राजे गादीवर बसविले, तर इंग्लंडचेंही समाधान करतां येईल, असें मेटरनिच याचें म्हणणें होतें. परंतु नेपोलियन एक इंचभर जमीन सुद्धां सोडण्यास तयार नव्हता. ऑस्ट्रियन मुत्सद्याचा हा मसुदा त्याला अत्यंत उर्मटपणाचा वाटला व त्यानें रशिया व प्रशिया यांस स्वतंत्रपणें तहाचें बोलणें करण्याची सूचना केली. परंतु ऑस्ट्रिया ह्या दोन्ही राष्ट्रांस मदत करण्यास तयार झालेला असल्यामुळें त्या राष्ट्रांनीं नेपोलियनची सदर सूचना अमान्य केली. तेव्हां मेटरनिच याचे सर्व डावपेंच नेपोलियनच्या लक्षांत येऊन त्यानेंही ऑस्ट्रियाची पुन्हा एकदां खोड मोडण्याचा निश्चय केला. व त्या तिन्ही शत्रूंशीं तोंड देण्यास पुरेसें सैन्य व सामुग्री जमविण्यास अवकाश मिळण्याकरितां त्यानेंही मेटरनिच याची मध्यस्थी कबूल करून तात्पुरती लढाई बंद करण्याच्या करारनाम्यावर सही केली.[1]

तहाच्या वरील अटी कबूल न करण्यांत नेपोलियननें मोठी चूक केली, असें लष्करी तज्ज्ञांचें मत आहे; मुत्सद्यांचेंही तसेंच मत आहे. फ्रान्सचें युरोपांतील वर्चस्व केवळ लष्करी सामर्थ्यावर अवलंबून होतें; व या वेळीं नेपोलियनचें सैन्य अनेक प्रकारें कमकुवत झालेलें असल्यामुळें त्यानें ३।४ शत्रूंशीं एकट्यानें सामना देण्याचा हा

१ हा करारनामा 'The armistice of pleisnity' ह्या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे.

प्रसंग टाळावयास पाहिजे होता. म्हणजे त्याला आपल्या सैन्याची योग्यता वाढविण्यास अवसर सांपडून पुन्हा सर्व युरोपखंड आपल्यापुढें वांकवितां आलें असतें. परंतु नेपोलियनचा विनाशकाल जवळ येऊन ठेपलेला होता, यामुळें इभ्रतीच्या खोट्या इरेस पेटून त्यानें वरील तहान्वयें युरोपांत शांतता स्थापन करण्याची अनायासें आलेली संधी दवडली! असो; नेपोलियन याप्रमाणें ड्रेसडेन येथें नवीन सैन्य जमा करीत असतां इकडे स्पेनमध्यें ब्रिटिश सेनापति वॅलिंगटन व फ्रेंच सेनानी यांचें युद्ध जुंपलें. या युद्धाचा शेवट व्हिटोरियाच्या मैदानावर होऊन त्यांत फेंच सैन्याचा पुरा मोड झाला. त्यामुळें स्पेन देशांतील नेपोलियनचें वर्चस्व आपोआप नष्ट झालें! स्पेनवर स्वारी करण्यांत व तेथील लोकांना त्रस्त करण्यांत आपली मोठी चूक झाली, हे पुढें नेपोलियननें स्वतःच कबूल केलेलें आहे. स्पेनमधल्या ह्या पराभवाची वार्ता ऐकतांच रशिया व प्रशिया यांना नेपोलियनच्या विरुद्ध लढण्यास अधिक अवसान चढलें व आतां ऑस्ट्रियाही उघडपणें त्यांना जाऊन मिळाला! तथापि ऑस्ट्रियानें वरील शर्तींवर तह करण्याविषयीं आणखी एकदां नेपोलियनला विनंती केली. परंतु ती त्यानें तिरस्कारपूर्वक फेटाळून लावली. तहाची वाटाघाट सुरू झाल्यापासून सुमारें दोन महिन्यांचे आंत नेपोलियनची युद्धाची-तयारी झाली. आपल्या पिछाडीचे संरक्षणाकरितां मुख्य मुख्य ठाण्यांवर अवश्य तितकी फौज ठेवून सुमारें ३॥ लक्ष निवडक सैन्य घेऊन तो पुढें निघाला. त्यानें आपल्या सैन्यांत शिस्त

व उत्साह उत्पन्न केला होता; पण त्यास अनुभवाची जोड नसल्यामुळें व तसेच त्याचे दुय्यम अधिकारीही नवशिके असल्यामुळें तें यशस्वी होईलच असा भरंवसा नव्हता. परंतु सैन्याचा जरी भरंवसा नसला तरी नेपोलियनला स्वतःच्या बुद्धीचा मोठा विश्वास होता व तिच्या जोरावर तो विपरीत अशा परिस्थितींतही ३ प्रबळ संयुक्त शत्रूंशीं तोंड देण्यास तयार झाला ! शत्रूंचें सैन्य सुमारें ८ लक्ष होतें. त्यापैकीं ५ लक्ष समरभूमीवर सज्ज होतें. त्याचे तीन मोठे विभाग केलेले असून ते शुवर्त्झनबर्ग ( बोहिमिया प्रांतांत ), ब्लूचर ( ओडर नदीच्या वरल्या बाजूस ) व बर्नाडोटे ( बर्लिनजवळ ) या तीन मुख्य सेनापतींच्या स्वाधीन करण्यांत आले होते. हीं सर्व सैन्यें मोरयूच्या योजनेप्रमाणें हालचाल करीत होतीं. नेपोलियननें ह्या तिन्ही सैन्यांवर हल्ला करण्याची एक योजना केली. ब्लूचरच्या सैन्याचा समाचार घेण्याचें काम त्यानें स्वतःकडे घेतलें, व बाकीच्या दोन सैन्यांवर त्यानें आपले दुय्यम सेनापति पाठविले. मोरयूची योजना अशी होती कीं, होतां होईल तोंपर्यंत प्रत्यक्ष नेपोलियनशीं लढाई करण्याचा प्रसंग टाळून त्याचे दुय्यम

---

१ नेपोलियनची स्थिति ह्या वेळीं फारच अनिष्ट होती. त्याच्या सैन्यांत भाडोत्री लोकांचा भरणा विशेष होता व ह्यापैकीं बऱ्याच लोकांची जर्मन बंडवाल्यांशीं सहानुभूति होती. तसेंच त्याचे जुने लेप्टेनंट मोरयु व बर्नाडोटे हे शत्रुसैन्यास जाऊन मिळाले होते ! त्याच्या शत्रूंचें सैन्य चांगलें कसलेलें होतें. त्याची संख्याही नेपोलियनच्या सैन्यापेक्षां दीडपट जास्त होती. ह्या सर्व प्रतिकूल गोष्टींस धाब्यावर बसविणारा धाडसी नेपोलियन एका दृष्टीनें जगाच्या कौतुकास पात्र नाहीं काय ?

सेनापति सांपडतील तेथें त्यांस लोळवावयाचें. या योजनेस अनुसरून नेपोलियन पुढें येतांच ब्लूचर मागें हटूं लागला. त्याच्या सैन्याशीं कांहीं चकमकी करून नेपोलियन परत ड्रेसडेन येथें आपल्या मुख्य तळावर आला. तो तेथें येण्यापूर्वी शुवर्झनबर्ग हा आपल्या सैन्यासह तेथें आलेला होता, तो आयताच नेपोलियनच्या तावडींत सांपडला. त्याच्या सैन्याचा नेपोलियननें तेव्हांच धुव्वा उडवून त्यास पळ काढावयास लावलें. ह्या लढाईंत मोरयु मारला गेला. ह्या पळणाऱ्या सैन्याचा पाठलाग करण्याकरितां त्यानें म्युराट व दुसरे दोन सेनापति पाठवून तो स्वतः पिरना येथें चालून गेला. परंतु नंतर लवकरच तो आजारी पडल्यामुळें त्याला ड्रेसडेन येथें परत यावें लागलें. यानंतर या युद्धाचा भार बहुतेक त्याच्या दुय्यम सेनापतींवरच पडल्यामुळें व ते त्याच्या इतके कलाभिज्ञ नसल्यामुळें लेप्झिग येथें झालेल्या मोठ्या लढाईंत नेपोलियनच्या सैन्याचा पूर्ण पराभव झाला. तेव्हां तेथून तें सैन्य परत फिरलें. शत्रुसैन्यानें त्याचा पाठलाग करून त्यास फार जेरीस आणलें. अखेर त्यांच्या मार्गांतल्या एल्स्टर नदीवरचा पूल त्यांनीं उडवून दिल्यामुळें फ्रेंच सैन्याची फार दाणादाण झाली. इतक्यांत बव्हेरियानें नेपोलियनविरूद्ध शस्त्र उचललें. परंतु हानो येथें नेपोलियननें त्या सैन्याचा पराभव करून आपल्या माघारी फिरलेल्या सैन्यास रस्ता मोकळा करून दिला. ह्या लढाईंत नेपोलियनचें सैन्य फार मेलें. सुमारें २ लक्ष सैन्यापैकीं ९० हजार सैन्य काय तें सुरक्षितपणें माघारें

आलें ! हा पराभव झाल्यानंतर आपल्या दुय्यम सेनापतींवर पुढील युद्धाची जबाबदारी टाकून आणखी नवीन सैन्याची जमवाजमव करण्याकरितां नेपोलियन **पॅरिस** शहरीं येऊन दाखल झाला.

---

## प्रकरण १० वें.

### अधःपतन.

नेपोलियन **पॅरिस**ला आल्यावर रणभूमीवरील त्याच्या सैन्याचे आणखी पराभव झाल्याची बातमी त्याला समजली. तसेंच स्पेन-मध्यें ब्रिटिश सेनापति **वेलिंग्टन** याजबरोबर जें त्याचें सैन्य लढत होतें, त्याचा मोड करून **वेलिंग्टन** फ्रेंच सरहद्दींत शिरला होता. इकडे रशियन व ऑस्ट्रियन सैन्यही ऱ्हाईन नदीच्या बाजूनें फ्रान्सवर चाल करून येण्यास निघालें होतें. **नेपोलियन**जवळ आतां लढाईस खरें उपयुक्त असें सैन्य फार थोडें उरलें होतें. तथापि १८१४ च्या उन्हाळ्यापर्यंत हें संयुक्त सैन्य ऱ्हाईन नदीच्या सरहद्दीवर येऊन पोंचणार नाहीं, अशी त्याची समजूत असल्यामुळें १८१५ सालाकरितां नोंदलेल्या शिपायांस बोलावून त्यांस शक्य तितकें शिक्षण देऊन युद्धास तयार करण्याचा त्यानें संकल्प केला. खुद्द फ्रान्सवर परकीय शत्रूंची स्वारी होणार, असें पाहून **पॅरिस** येथील प्रमुख लोक ह्याप्रसंगीं आपणांस शक्य तितकी पैशाची व माणसांची मदत करतील, असें त्यास वाटत होतें. व

सेनेटनें तर त्यास लागेल तितका पैसा व माणसें देण्याचा ठरावही केला होता. ह्या गोष्टींमुळें त्यास विशेष उत्तेजन येऊन तो सर्व युरोपचा समाचार घेण्याकारितां जारीनें तयारी करूं लागला. परंतु त्याची तयारी पूर्ण होण्यापूर्वींच शत्रूंचें संयुक्त सैन्य ऱ्हाईन नदीच्या तीरावर येऊन पोंचलें. हें सैन्य फ्रान्सांत नेण्यापूर्वीं संयुक्त युरोपियन राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं **नेपोलियनशीं** समेट करण्याचा एक प्रयत्न केला. **आल्प्स, पिरनिज** व **ऱ्हाइन** या सरहद्दींच्या आंतील प्रदेश व **मेयन्स, कोलोन** आणि **अँटपर्व** हे भाग **नेपोलियनच्या** ताब्यांत ठेवून बाकीचा त्यानें जिंकलेला सर्व मुलुख ज्याचा त्यास परत मिळावा, अशी त्यांची इच्छा होती. **नेपोलियननें** त्यांची ही मागणी स्पष्टपणें नाकारली नाहीं, परंतु त्यांना अखेरचा निकाल कळविण्याचें त्यानें लांबणीवर टाकलें. ही त्याची चूक त्यास लवकरच भोंवली! हें तहाचें बोलणें सुरू असतां इकडे जर्मनींतील राष्ट्रीय बंडाच्या संसर्गानें **हॉलंड** व **बेलज्यम** येथेंही **नेपोलियनच्या** विरुद्ध बंडें सुरू झालीं! तसेंच त्याचा पराक्रमी व विश्वासुक सरदार—ज्याला त्यानें **नेपल्सच्या** गादीवर बसविलें होतें तो—**म्युराट** हा ऑस्ट्रियन मुत्सद्दी **मेटरनिच** याच्या जाळ्यांत सांपडून शत्रुपक्षास जाऊन मिळण्याच्या बेतांत आला होता! स्वित्सर्लंडांतील सरदारांनींही त्याची अधिसत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न चालविला होता! या सर्व परिस्थितीचा फायदा घेऊन अर्थातच **नेपोलियनच्या** शत्रूंनीं तहाचें बोलणें सोडून दिलें व एकदम फ्रान्सवर चाल केली. इ. स. १८१३ च्या डिसेंबर महि-

ज्यांत त्यांच्या सैन्याचे दोन मोठमोठे विभाग ऱ्हाईन नदी ओलांडून फ्रान्सकडे येण्यास निघाले. पैकीं एक भाग ब्लूचरच्या हाताखालीं असून तो मॅनेहेम व त्याच्या आसपासच्या किल्ल्यांच्या बाजूनें येत होता. ह्या सैन्यांत सुमारें ८० हजार लोक होते. दुसरें सैन्य १॥ लक्ष असून त्याचा अधिपति शुवर्टझेनबर्ग हा होता. हें सैन्य स्विट्सर्लंडमधून फ्रान्सच्या पूर्व सरहद्दीवर येत होतें. शत्रुसैन्याची ही आकस्मिक हालचाल पाहून नेपोलियन क्षणभर गोंधळला. कारण त्याचेपाशीं अद्याप शत्रुसैन्यास तोंड देण्याजोगें सैन्य जमलेलें नव्हतें. परंतु त्यानें धीर सोडला नाहीं. ह्या नाजुक व अत्यंत अडचणीच्या प्रसंगीं शूर व धीर वीरास साजेशीच कृति त्यानें केली. त्यानें आपली राणी मराया लुसी हिला रीजंट नेमून आपला भाऊ जोसेफ यास पॅरिसचा लष्करी अधिपति नेमलें, व आपण स्वतः होतें तेवढें सर्व सैन्य घेऊन युद्धाकरितां शत्रुसैन्याकडे वळला (जानेवारी १८१४). थोड्याच अवकाशांत तो मार्न नदीकांठीं असलेल्या चॅलॉन्स शहरीं आला. तेथें त्याला त्याचे दुय्यम लष्करी अधिकारी भेटले. शत्रुसैन्याचा वेग आंवरून धरण्यास असमर्थ झाल्यामुळें ते गांगरून गेलेले होते. त्या सैन्यांतील एक मुख्य अधिपति ब्लूचर हा मार्न नदीच्या वरच्या अंगास येऊन दाखल झाला होता, व दुसरा शुवर्टझेनबर्ग नामक सेनापति यूब व सेन नदीच्या दरम्यानच्या टापूंत आला होता. पॅरिसकडे जाणारे वरील दोन्ही रस्ते शत्रुसैन्यानें व्यापले होते व नेपोलियनपेक्षां त्यांचें सैन्य तिपटीनें अधिक असल्यामुळें हीं

दोन्हीं सैन्यें लवकरच एकत्र होऊन पॅरिस गांठणार, असा रंग दिसत होता. एकंदरींत प्रसंग मोठा धोक्याचा व अत्यंत आणीबाणीचा प्राप्त झाला होता. आणि याच कारणामुळें त्याचे दुय्यम सेनापति हताश व निरुत्साह झालेले होते. परंतु नेपोलियननें त्यांना धीर दिला व शत्रूचा पाडाव करण्याची एक उत्कृष्ट डावपेंचाची क्लृप्ति काढून त्यानें त्यांस उत्साहपूर्वक आपापलें काम बजावण्यास सांगितलें. वरील दोन शत्रुसैन्यांचा मिलाफ होण्यापूर्वी त्यांपैकीं एक म्हणजे ब्लूचरचें सैन्य गांठून त्याचा अगोदर मोड करावा, अशा हेतूनें नेपोलियन सुमारें ४० हजार फौज घेऊन शत्रुसैन्यास घेरण्याकरितां व्हित्रेच्या ओढ्यापर्यंत आला. तो पुढें येत आहे असें पाहून ब्लूचर मागें सरूं लागला. पण नेपोलियननें त्यास ब्रेने येथें गांठून त्याच्या सैन्याचा पुष्कळ खराबा केला. तथापि तो त्याच्या तावडींतून निसटला व लवकरच शुवर्टझेनबर्ग याच्या सैन्याच्या एका बगलेस जाऊन मिळाला. नेपोलियन मध्यंतरीं ला रोथेरे येथें आला, पण तेथें त्यास शत्रुसैन्यानें अचानकपणें गांठलें. तेव्हां मोठ्या मुष्किलीनें त्यांच्या पेचांतून तो निसटला. यापुढें त्याची स्थिति विशेष भयप्रद व धोक्याची होत चालली. तरी पण त्यानें धीर सोडला नाहीं. स्वतःच्या लष्करी डावपेचांतील कौशल्याविषयीं त्याचे ठायीं पूर्ण आत्मविश्वास असल्यामुळें ह्या कौशल्याच्या जोरावर अजूनही आपण शत्रूचा पाडाव करूं, असें त्यास वाटत होतें; आणि सुदैवानें त्याप्रमाणें त्याला पुढें लवकरच त्या कामीं यशही आलें. शत्रूचें सैन्य फक्त मार्ने

व सेन या दोन नद्यांच्या जवळून गेलेल्या दोन मोठ्या रस्त्यांनींच काय तें पॅरिसवर येणें शक्य होतें. आणि त्या स्थितींत सदर सैन्याचे दोन विभाग होणें अपरिहार्य होतें. तेव्हां ह्या दोन्ही रस्त्यांच्या बाजूस आपलें सैन्य ठेवून वेळ पडेल तेव्हां प्रत्येक सैन्यावर अगर त्याच्या विभागावर हल्ला करण्याचा नेपोलियननें विचार केला; आणि त्याप्रमाणें त्यानें आपल्या सैन्याची रचना केली. थोड्याच अवकाशांत त्याच्या योजनेप्रमाणें ब्लूचर त्याच्या सपाट्यांत सांपडला. तेव्हां त्यानें आपले दोन लेफ्टनंट शुवर्टझेनबर्गच्या सैन्यास थोपवून धरण्याकरितां पाठविले व आपण दुसऱ्या तीन दुय्यम अधिकाऱ्यांसह सुमारें ३० हजार फौज घेऊन ब्लूचरवर चाल करून गेला. सुमारें ४ दिवसपर्यंत त्यानें त्याच्या सैन्याशीं युद्ध करून अखेर ब्लूचॅम्स येथें ब्लूचरचा त्यानें पूर्ण पाडाव केला. हें युद्ध ता. १० ते १४ फेब्रुवारीपर्यंत सारखें चालू होतें. त्यांत नेपोलियननें शत्रूचे १५ हजार लोक कैदी केले व त्याच्या पुष्कळशा तोफा काबीज केल्या. याखेरीज ब्लूचरचे पुष्कळ लोक समरांगणांत मेले, तें निराळेंच! याप्रमाणें ब्लूचरचा मोड केल्यानंतर नेपोलियन शुवर्टझेन-बर्गच्या सैन्याकडे वळला. त्याच्या सैन्यास थोपवून धरण्याकरितां नेपोलियननें आपले दोन अधिकारी पाठविल्याचें मागें सांगितलेंच आहे. ह्या अधिकाऱ्यांच्या सैन्यास मागें रेटीत रेटीत तो सेन नदीच्या कांठानें पॅरिसनजिक येऊन पोंचला होता. व पॅरिसवर लवकर जातां यावें म्हणून त्यानें आपलें सैन्य सेन नदीच्या

दोन्ही तीरांनीं चालविलें होतें. त्यामुळें त्याचें सैन्य विभागलें जाऊन त्याच्या दोन्ही बगला नेपोलियनच्या माऱ्याच्या टप्यांत येण्याजोग्या होत्या. ह्या स्थितीचा फायदा जर नेपोलियनला घेतां आला असता, तर त्यानें थोड्याच अवकाशांत ह्या सैन्याचाही चक्काचूर करून टाकला असता. परंतु हें सैन्य पॅरिसनजिक आल्यामुळें त्या शहरांतील लोकांत भीतीनें घांदल उडून गेली. तेव्हां नाइलाजास्तव नेपोलियनला पॅरिसजवळ येऊन ह्या सैन्याच्या तोंडाशीं जाऊन समोरासमोर सामना द्यावा लागला. पॅरिसच्या तोंडावर नेपोलियन येतांच तेथील लोकांस धीर आला व त्यालाही जास्त सैन्याची कुमक मिळाली. परंतु शत्रूच्या बगलेवर (मागें सांगितल्याप्रमाणें) हल्ला करण्यापासून जसें इष्ट कार्य साधणारें होतें, तसें तें समोरासमोर सामना केल्यानें साधण्याचा संभव नव्हता. तथापि प्राप्त स्थितींतच आपल्या अंगचें कौशल्य दाखवून विजय संपादण्याचा नेपोलियननें निश्चय केला. नुकत्याच मिळालेल्या विजयामुळें त्याच्या सैनिकांचे ठायींही पुन्हा आत्मविश्वास उत्पन्न झाला होता. तेव्हां त्यांनींही ह्या सैन्याचा मोड करण्यास नेटानें मदत केली. अखेर श्वार्टझेनबर्ग याचा व त्याच्या कसलेल्या सैन्याचा नांजिस व मॉंट्र्यु येथें नेपोलियननें इतका निकराचा पराभव केला कीं, जरी ह्या सेनापतीच्या मदतीला आणखी एक लक्ष सैन्य मिळण्यासारखें होतें, तरी त्यानें मागें पळ काढला! ह्या चकमकींत त्याचें सुमारें १ लक्ष सैन्य खराब झालें. नेपोलियननें हा विजय केवळ ७० हजार सैन्याच्या जोरावर

मिळविला. ह्यांपैकीं बरेच लोक नवशिके व अगदीं तरुण होते. नेपोलियननें आजपर्यंत पुष्कळ विजय संपादन केलेले होते, परंतु त्या सर्वांहून हा विजय विशेष महत्वाचा आहे. ह्या विजयामुळें त्यानें फ्रान्सवर आलेलें प्राणसंकट कांहीं काल तरी दूर लोटून दिलें; व पॅरिसवर हल्ला करणें सोपें काम नाहीं, याची तीव्र जाणीव त्यानें युरोपच्या ठायीं उत्पन्न केली. लष्करी कौशल्याच्या दृष्टीनेंही त्याचा हा विजय मोठा कौतुकास्पद आहे, असें अनेक तज्ज्ञांचें मत आहे.

याप्रमाणें दोन्ही सैन्यांचा पराभव झाल्यानंतर तहाचें बोलणें सुरू होऊन कांहीं दिवस युद्ध तहकूब राहिलें. वस्तुतः ला रोथेरे येथें जेव्हां नेपोलियनची स्थिति फार बिकट झाली, तेव्हांपासूनच उभय पक्षांत तहाचीं बोलणीं सुरू झालीं होतीं. युरोपांतील संयुक्त राष्ट्रांनीं या वेळीं फार सक्तीच्या अटी पुढें मांडल्या होत्या. त्या कबूल केल्यास नेपोलियननें संपादन केलेला सर्व मुलूख फ्रान्सला सोडावा लागणार होता. शिवाय युरोपच्या पुनर्घटनेंत फ्रान्सचें बिलकूल अंग नसावें, अशीही एक अत्यंत अपमानास्पद शर्त यांत

---

१ ह्या विजयासंबंधानें मॉरिस नामक इंग्रज इतिहासकार लिहितोः—

"The coalitio , which, a few days before, believed that Paris was in its grasp, had been driven back in to the midst of Champagne, by operations which will live in history as among the finest masterpieces of war. It is doubtful, indeed, if the difficultexploit of moving an army between divided enemies has been illustrated by a grander example."

होती. ह्या अटींची वाटाघाट चालू असतांच नेपोलियननें वरील विजय संपादन केला; अर्थात् यापुढें असल्या अटी नुसत्या ऐकून घेण्या-सही तो तयार नव्हता. त्यानें त्या तेव्हांच धुडकावून लावल्या. त्यामुळें पुन्हा युद्धास सुरवात झाली. ब्लूचर व शुवर्टझेनबर्ग या दोघांच्या हातून पॅरिसवर चाल करण्याचें काम निभत नाहींसें पाहून संयुक्त सैन्याचा आणखी एक मोठा भाग त्यांच्या मद-तीस आला. शिवाय वरील दोन्ही सैन्यांतही कमी झालेल्या लोकांचे ठिकाणीं नवीन लोकांची भरती करण्यांत आली. ह्या तिन्ही सैन्यांना जेरीस आणण्याचा प्रयत्न नेपोलियननें चालविला होता. परंतु खुद्द पॅरिस शहरांत त्याच्या सत्तेविरूद्ध टॅलिरांद नामक त्याच्या जुन्या मंत्र्यानें एक गुप्त कट करून त्यांतील कांहीं लोकांनीं शत्रुसैन्यांत येऊन त्यांना प्रोत्साहन दिल्यामुळें हीं तिन्ही सैन्यें होईल तें नुकसान सोसून नेपोलियनवर तुटून पडूं लागलीं. ह्या वेळीं त्यांच्या व त्याच्या दरम्यान अनेक लहान मोठ्या चक-मकी होऊन त्यांत त्यानें आपलें कौशल्य अनेक ठिकाणीं प्रकट केलें; परंतु त्याचें सैन्य अगदींच थोडकें असल्यामुळें व त्याच्या दुय्यम सेनापतींतही भेदबुद्धीचा प्रवेश झाल्यामुळें अखेर त्यास हार खावी लागली. व ज्या पॅरिसचें वैभव वाढविण्याकरितां तो इतकीं वर्षें झटला, त्या पॅरिस शहरामध्यें शत्रुसैन्याचा शिरकाव झालेला पाहण्याचें त्याच्या नाशिबीं आलें ! ह्या वेळीं नेपोलियनची मनोवृत्ति फार क्षुब्ध व खिन्न झालेली होती. शत्रुसैन्याचा पाडाव अजूनही आपण करूं, असें त्यास वाटत होतें; व तसें त्यानें आपल्या दुय्यम

सेनापतींस व इतर अधिकाऱ्यांस बोलूनही दाखविलें. त्याला ह्या वेळीं ह्या लोकांनीं व पॅरिसच्या पुढाऱ्यांनीं एकदिलानें मदत करावयास पाहिजे होती. त्याची सत्ता झुगारून देण्याची असली खोटी संधि साधण्यांत त्यांनीं मोठी चूक केली व तिचें प्रायश्चित्त लवकरच पुढें त्यांस भोगावें लागलें! तात्पर्य, **नेपोलियन**चें अधःपतन होण्यास शत्रूच्या पराक्रमापेक्षां **त्याच्या राष्ट्रांतील लोकांची हीन मनोवृत्तिच विशेष कारणीभूत झालेली आहे.** **नेपोलियन**चा पाडाव करण्याकरितां फ्रान्सशीं सदैव वैर करणाऱ्या शत्रूंच्या गळ्याशीं मिठ्या मारण्यांत **पॅरिस**च्या लोकांनीं आपल्या राष्ट्रीय शीलाची जबर हानि केली, यांत कांहीं शंका नाहीं. **नेपोलियन** कितीही उन्मत्त झालेला असला, तरी फ्रेंच राष्ट्राचें वैभव वाढविणें हेंच त्याचें अंतिम साध्य होतें; अशा स्थितींत त्या राष्ट्रांतील लोकांनीं शत्रूचा पाय घरांत शिरला असतां त्याच्याशीं दगा करावा, हें अत्यंत शोचनीय व निंद्य कृत्य आहे. असल्या कृतीनें कोणत्याही राष्ट्राचा खरा फायदा केव्हांही होत नसतो. फ्रेंच राष्ट्राला पुढें असाच अनुभव येत गेला. असो; स्वजनांच्या आग्रहामुळें शत्रुसैन्यास **पॅरिस**मध्यें येऊं देऊन फ्रान्सची हवी ती व्यवस्था लावण्यास युरोपला पूर्ण मुभा देणें **नेपोलियन**ला भाग पडलें. या वेळीं हट्ट धरल्यास सर्व देशांत अंतःकलह ( Civil war ) उत्पन्न होऊन फ्रान्सची दुर्दशा होईल, हें लक्षांत आणून नेपोलियननें बादशाही सत्तेचा राजीनामा दिला. तो देतांना त्यानें मोठ्या गर्हिवरानें असे उद्गार काढले आहेत कीं,

" आपली इच्छा असेल तर अद्यापही आपण शत्रूचा मोड करूं; परंतु आपलाच हट्ट धरुन अंतःकलह माजविण्यापेक्षां लोकांच्या इच्छेनुरूप गादीवरील आपला हक्क सोडण्यास तयार होणेंच मला इष्ट वाटतें. फ्रान्सच्या कल्याणाकरितां तख्तच काय, पण वेळ पडल्यास मी आपला प्राण देण्यासही तयार आहें!" केवढें प्रशंसनीय मनौदार्य व धैर्य हें! नेपोलियनच्या ह्या मनोवृत्तींत व त्याच्या भोंवतालच्या आणि पॅरिसच्या लोकांच्या वरील मनोवृत्तींत केवढें महदंतर! नेपोलियनचा पाडाव झाल्यानंतरही त्याच्यासंबंधानें आदर व कौतुक वाटण्यास त्याची ही उच्च मनोवृत्तिच मुख्यतः कारण आहे. त्याची ही मनोवृत्ति लपंडावाची नसून केवळ खरी आहे; याबद्दल कोणाही विचारी मनुष्यास शंका घेतां येण्यासारखी नाहीं[1].

---

१ पूर्वोक्त मॉरिस म्हणतो:—

" His first thoughts were of France in this hour of agony; he mourned with Canlaincourt on her departed greatness; he lamented that she had not seconded his efforts to maintain her place in Europe ......... he towers supreme over all other Frenchmen; he stands, seperated from the low-minded rulers who look only to their own ends and is placed among the great names of history."

# प्रकरण ११ वें.

## नेपोलियन पुन्हा डोकें वर काढतो !

आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांच्या आग्रहावरून नेपोलियननें राजीनाम्यावर सही करण्याचें जेव्हां कबूल केलें, तेव्हां त्याच्या मुलास फ्रान्सच्या गादीवर बसविण्याची वाटाघाट चालू होती. परंतु कृतघ्न बनलेला नेपोलियनचा पूर्वींचा विश्वासुक सल्लागार जो टॅलिरांद यानें रशियाच्या झारचे कान भरल्यामुळें त्यानें ती गोष्ट नाकारली. तेव्हां जुन्या बोरबोन राजवंशांतील राजपुत्रास फ्रान्सची गादी देण्याचें ठरून त्याला १८ वा लुई या नांवानें राज्याभिषेक करण्यांत आला व नेपोलियनला भूमध्य समुद्रांतील एल्बा नांवाचें एक छोटेंसें बेट देण्यांत येऊन कांहीं नक्त वार्षिक नेमणूक व थोडासा लष्करी लवाजमा ठरवून देण्यांत आला. सर्व युरोपखंडावर सत्ता गाजविण्याची ज्याची प्रतिज्ञा व ज्यानें त्या प्रतिज्ञेस अनुसरून थोड्या दिवसांपूर्वीं बहुतेक युरोपखंड पादाक्रांतही केलें होतें, त्याला एल्बासारख्या छोट्याशा बेटाचा धनी होऊन राहण्याची पाळी यावी, हा दैवाचा विचित्र खेळ नव्हे काय? ही स्थिति पाहून नेपोलियनला अत्यंत वाईट वाटलें असेल व क्षणभर त्याचें मन फार खिन्न व उदास झालें असेल, यांत शंका नाहीं. परंतु अशा वेळीं विषप्रयोग करून घेण्याइतकी त्याच्या मनाची दुर्बल अवस्था झाली असेल, असें त्याच्या एकंदर स्वभावावरून व शीलावरून मुळींच दिसून येत नाहीं. तथापि याप्रमाणें एकाएकीं

आपलें अध:पतन झालेलें पाहून तो आपल्या जिवाला कंटाळला व त्यानें विषप्रयोग करून घेतला, अशी एक कंडी त्याच्या निंदकांनीं प्रचलित केली. पण पुढें इतिहासज्ञांनीं ती खोटी असल्याबद्दल आपलें मत स्पष्टपणें नमुद केलेलें आहे. ह्या आपत्तीच्या वेळीं **नेपोलियन**च्या मनाचा समतोलपणा कायम होता, हें दर्शविणारा दुसरा एक प्रसंग घडून आला आहे. तो **एल्बा** बेटांत जाऊन राहिल्यावर कांहीं दिवसांनीं त्याची आई त्याला भेटण्याकरितां तेथें गेली. त्या वेळीं उभयतांनाही मोठा गहिंवर आला; परंतु गतवैभवाबद्दल दोघांनींही शोक केला नाहीं. बादशहाच्या नात्यापेक्षां सामान्य सत्पुत्र या नात्यानेंच मी नेहमीं तुजकडे पहातें,

---

१ शेफिल्ड युनिव्हर्सिटीचा व्हाइस चॅन्सेलर व नेपोलियनसंबंधीं अनेक ऐतिहासिक ग्रंथ लिहिणारा परंतु नेपोलियनसंबंधीं अनेक बाबतींत प्रतिकूल मत प्रदर्शित करणारा ग्रंथकार ह्या बाबींविषयीं पुढीलप्रमाणें लिहितो:—

" There is a legend, which history dissolves, that on the eve of his departure from Fontaineblean he took poison. Such ignoble despair was no part of a character schooled in the myraid chances of fate. Even in this hour of deep humiliation he felt that his destiny was not yet accomplished "I shall always" he said, " been extraordinary man."

—Life of Nepoleon.

नेपोलियनला, अशा विपरीत स्थितींत जगण्यापेक्षां मरण बरें वाटत होतें, हें खरें; परंतु आत्महत्या करण्यास तो तयार नव्हता, असें त्याच्याच तोंडच्या पुढील उद्गारावरून दिसून येतें:—

" A death which I should owe to an act of despair would be a baseness. Suicide neither accords with my principles nor with the rank which I have filled on the stage of the world. " —Abbott's Life of Napoleon.

असें त्याच्या आईनें त्यास सांगितलें; आणि मलाही त्याच नात्यानें तुला भेटण्यांत विशेष अभिमान वाटतो, असें त्यावर नेपोलियन यानें उत्तर दिलेलें आहे. त्याच्या एकंदर चरित्रांत हा प्रसंग काव्याच्या दृष्टीनें अत्यंत रमणीय व व्यावहारिक दृष्टीनें अत्यंत महत्वाचा आहे. **नेपोलियन** व त्याला जन्म देणारी त्याची माता ह्या दोघांच्याही शीलाचा पूर्ण विकास–परिपाक–करणारा असा हा प्रसंग आहे. शाकुंतल नाटकांतलि चवथ्या अंकांतल्या चवथ्या श्लोकांत जसें त्या नाटकाचें एकंदर स्वारस्य उतरलेलें आहे, तद्वत् **नेपोलियन**च्या चरित्राचें सर्व रहस्य–स्वारस्य–या प्रसंगांत उतरलेलें आहे. मनोविकार व विचारशक्ति हीं दोन्ही उत्तानावस्थेंत समरस झालेलीं येथें आपणांस पहावयास मिळतात ! असो; इकडे फ्रान्समध्यें १८ वा लुई गादीवर येतांच त्यानें आपल्या राजघराण्याची परंपरागत राज्यपद्धति सुरू करण्याचा प्रयोग आरंभिला. ज्या राज्यपद्धतीला कंटाळून फ्रेंच लोकांनीं एवढी मोठी राज्यक्रांति १८ व्या शतकाच्या अखेरीस केली, तशाच प्रकारची राज्यपद्धति पुन्हा स्थापन होण्याचा रंग दिसूं लागल्यामुळें फ्रेंच लोक व विशेषतः सैन्य लुईच्या राज्यव्यवस्थेस कंटाळलें व त्यांच्यापैकीं कित्येक चांगले लोक **नेपोलियन**शीं गुप्त कारस्थान करूं लागले. इकडे फ्रान्सपासून मिळविलेला मुलूख वांटून घेण्यासंबंधानें **व्हियेन्ना** येथें भरलेल्या परिषदेंत रशिया, इंग्लंड, ऑस्ट्रिया व प्रशिया यांच्यांत जाज्वल्य मतभेद उत्पन्न झालेले होते. **नेपोलियन** जरी **एल्बा**मध्यें स्वस्थ होता, तरी

त्याचें सर्व लक्ष युरोपांतील हालचालींकडे होतें. त्याला तेथें येऊन ५।६ महिने झाले नाहींत, तोंच फ्रेंच सरकारनें त्याची ठराविक नेमणूक त्यास देण्याबद्दल आढेवेढे घेण्यास सुरवात केली. नेपोलियनला त्याच्याशीं केलेल्या तहान्वयें सुमारें एक एजार लोकांची पलटण ( Body-guard ) आत्मसंरक्षणाकरितां ठेवण्याचा अधिकार होता. अर्थात्, त्याचा खर्च बराच मोठा होता. नेमणुकीचे पैसे हातीं न आल्यामुळें त्याला पैशाची टंचाई पडूं लागली. परंतु त्यानें त्याबद्दल विशेष तक्रार न करितां आपला जीवनक्रम काटकसरीनें चालू ठेवला. इतक्यांत फ्रान्सहून त्याच्या चाहत्या मंडळीकडून एक थोर मनुष्य त्याच्याकडे गुप्त मसलत करण्याच्या हेतूनें येऊन पोंचला. त्याच्यासंबंधीं पुरी खात्री करून घेतल्यानंतर तो त्याजबरोबर मोकळ्या मनानें बोलूं लागला. आलेल्या मनुष्यानें त्याला फ्रान्सची एकंदर स्थिति सांगून ह्या वेळीं फ्रान्समध्यें गेल्यास सर्व लष्कर व लोक त्याच्या बाजूस कसे मिळतील, हें त्यास समजाऊन दिलें. 'फ्रान्सची इच्छा असेल तर आपण हें धाडस करूं' असें मोघम सांगून नेपोलियननें त्या माणसास निरोप दिला. नैतिकदृष्टयाही नेपोलियनला आतां कांहीं बंधन उरलें नव्हतें. त्याची नेमणूक न दिल्यामुळें त्याच्याशीं फॉंटब्यूलो येथें झालेल्या तहाच्या अटी लुईनें आपण होऊन मोडल्या; तसेंच त्याला पुन्हा पकडून कोठें तरी कारागृहवासांत ठेवण्याच्या गोष्टीही व्हिएन्ना येथें जमलेल्या तत्कालीन राजपुरुषांत बोलण्यांत येऊं लागल्या होत्या. अशा स्थितींत पुन्हा एकदां प्रयत्न करून फ्रान्सला पूर्वीचें

पद प्राप्त करून देण्याचा विचार नेपोलियनच्या मनांत घोळूं लागला. त्याच्या स्थितीचा विचार करितां हा विचार खरोखरच फार धाडसी व अत्यंत जोखमीचा होता. पण नेपोलियनचा आत्मविश्वास विलक्षण असल्यामुळें त्यानें हा अखेरचा प्रयत्न करण्याचा निश्चय केलाच. हा निश्चय त्यानें कोणासही कळविला नाहीं. निघण्याच्या आदले दिवशीं त्यानें आपल्या दोन प्रमुख लष्करी अधिकाऱ्यांस दुसरे दिवशीं तीन जहाजें तयार ठेवण्याविषयीं आज्ञा केली. त्याप्रमाणें तीं तयार होतांच तो सुमारें १२०० लोक बरोबर घेऊन एल्बाचा किनारा सोडून निघाला. वाटेंत त्याला दोन ठिकाणीं युरोपियन राष्ट्रांचीं लढाऊ जहाजें भेटलीं. परंतु त्यानें आपलीं जहाजें शिताफीनें व युक्तीनें त्यांच्या कटाक्षांतून वांचविलीं. त्यांना त्यांचा संशय येऊं नये, म्हणून त्यानें आपल्या जहाजांस व्यापारी गलबतांचें स्वरूप दिलें. तीं अगदीं छोटीं असल्यामुळें त्याचें हें करणें शोभूनही गेलें. एक ७० तोफांचें लष्करी जहाज त्याच्या जहाजांच्या अगदीं जवळून गेलें, पण त्याला सुद्धां ह्या छोट्या जहाजांचा संशय आला नाहीं! ह्या जहाजांसह तो ता० १ मार्च इसवी सन १८१५ रोजीं फ्रान्सच्या किनाऱ्यावर येऊन पोंचला. तेथें कॅनेस गांवानजिक त्यानें आपले सर्व लोक ऊतरून घेतले व मोठमोठीं शहरें टाळून तो आडमार्गानें पॅरिसकडे जाण्यास निघाला. वाटेंत त्याला जागोजाग जे शेतकरी भेटले, त्यांनीं त्याचा मोठ्या आनंदानें जयजयकार केला; व ते त्याच्या लष्करांत सामिल होत गेले. लवकरच तो ग्रिनोब्ल शहरानजिक येऊन ठेपला. तेथें

लुई राजाचें बरेंच मोठें सैन्य होतें; व त्या सैन्यास नेपोलियनवर चाल करून जाण्याचा हुकुम झालेला होता. ह्या सैन्याच्या नजिक येतांच नेपोलियननें आपलें लष्कर थोपविलें व आपण घोड्यावरून उतरून एकटाच त्या सैन्याच्या अघाडीस गेला, व आपल्या हातानें आपली छाती उघडी करून त्यांतील शिपायांस अनुलक्षून म्हणाला ' आपल्या बापावर गोळी झाडणारा असा कोण शिपायी तुमच्यांत आहे? असेल तर त्यानें बेलाशक ह्या उघड्या छातीवर गोळी सोडावी!' त्याच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच सर्व शिपायांच्या मनोवृत्तींत एकदम फरक होऊन 'बादशहाचा जयजयकार असो!' असा घोष ते करूं लागले! त्यांच्या सेनापतीनें त्यांना आपलें कर्तव्य करण्याबद्दल पुष्कळ तऱ्हेनें सांगून पाहिलें, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. नेपोलियनच्या सैन्यावर गोळीबार करण्याचें त्यांनीं साफ नाकारलें! तेव्हां निरुपाय होऊन तो तेथून निघून गेला. सेनापति निघून जातांच हें सहा हजार लोकांचें सैन्य नेपोलियनला येऊन मिळालें. पुढें तो **लॉयन्स** शहरीं गेला. तेथें तर **सर्व जनतेनें त्याचा मोठा सत्कार केला.** ह्या सर्व ठिकाणीं **नेपोलियननें** आपण फ्रान्सचे बादशाह असल्याची द्वाही फिरवून जाहीर रीतीनें सर्व लोकांस आपल्याशीं राजनिष्ठ राहण्याबद्दल आज्ञा केली. तेथून तो **पॅरिसवर** चाल करून गेला. वाटेंत त्याचें सैन्य २० हजारांपर्यंत झालें होतें! पॅरिसनजिक जातांच तेथील सैन्यही त्यास येऊन मिळालें! अर्थात् १८ वा लुई तेथून पळून गेला. त्यानंतर **नेपोलियननें**

मोठ्या थाटांत **पॅरिस**मध्यें प्रवेश केला. आपल्याबद्दल विनाकारण रक्तपात होऊं नये, म्हणून त्यानें फार दक्षता बाळगिली होती. **पॅरिस** येथें आल्यावर तेथील लोकांनीं फिरून एकवार त्याचा मोठा जयजयकार केला व नंतर त्यांनीं कायदेशीर रीतीनें बादशाही सत्ता पुन्हा एकवार त्याचे हातीं दिली. हें वर्तमान **व्हियेन्ना** येथें जमलेल्या युरोपांतील प्रमुख राजमंडळास समजतांच त्यांनीं आपसांतले मतभेद बाजूस सारून **नेपोलियन**चा पाडाव करण्याची फिरून तयारी चालविली. तेव्हां प्रथम योग्य अटींवर तह करून शांतता राखण्याचा नेपोलियननें यत्न केला; पण तो निष्फळ झाला. तेव्हां त्यानें त्यांच्याशीं सामना करण्याकारितां नवीन सैन्याची जमवाजमव सुरू केली. परंतु युद्धाचा संभव दिसूं लागतांच फ्रेंच लोकांमध्यें उसळलेली उत्साहाची लाट कमी होऊन ते पुन्हा प्राप्तस्थितीबद्दल कुरकुर करूं लागले. त्यांच्यामध्यें अनेक प्रकारचे मतभेद व बुद्धिभेद सुरू झाले. त्यामुळें नेपोलियनला त्यांच्याकडून अशा आणीबाणीच्या वेळीं जितकें पाठबळ मिळावयास पाहिजे होतें तितकें मिळूं शकलें नाहीं. तथापि ह्या स्थितीबद्दल खिन्न न होतां त्यानें सुमारें २ महिन्यांच्या आंत एक लक्ष ९० हजार सैन्य रणक्षेत्रावर जाण्यास योग्य असें तयार केलें. व त्याखेरीज २ लक्ष नवीन सैन्य जमवून तें युद्धास तयार करण्याचें काम सुरू केलें. तयार असलेल्या १ लक्ष ९० हजार लोकांसह तो ता० १२ जून रोजीं **पॅरिस**हून निघाला तो थोड्याच अवकाशांत बेलज्यममध्यें येऊन पोंचला. तेथें **आस्ट्रिया** व **इंग्लंड** यांचें सैन्य त्याच्याशीं

लढण्यास सज्ज होतें व प्रशिया आणि रशिया यांचें सैन्य लवकरच वरील दोन राष्ट्रांच्या सैन्यास येऊन मिळणार होतें. ह्या सर्व सैन्यांचा संयोग होण्यापूर्वीच आस्ट्रियन व इंग्लिश सैन्याचा पराभव करावा, असा नेपोलियनचा बेत होता; व त्याप्रमाणें त्यानें आपले डावपेचही ठरवून टाकले होते. परंतु उभय सैन्यांच्या चकमकी सुरू असतां नेपोलियन ऐनवेळीं फार आजारी पडला. वाटर्लूची लढाई ज्या दिवशीं व्हावयाची, त्या दिवशीं सकाळीं तर तो इतका आजारी होता कीं, सकाळीं ८ वाजेपर्यंत त्याचे दुय्यम सेनापतींस अवश्य ते हुकूम व सूचना मिळूं शकल्या नाहींत! तथापि अशा स्थितींतही तो सुमारें दहा वाजण्याचे सुमारास घोड्यावर बसून युद्धाचे ठिकाणीं गेला, व मोठ्या कुशलतेनें त्यानें युद्धाचें काम चालविलें. परंतु प्रशियन सेनापति ब्लूचर याला विवक्षित कालपर्यंत अडवून धरण्याचें काम त्यानें ज्या आपल्या दुय्यम अधिकाऱ्यावर (ग्रौचे) सोंपविलें होतें, त्यानें आपल्या कामांत कुचराई केल्यामुळें ब्लूचरला अडवून धरण्याचें काम त्याच्या हातून झालें नाहीं. ब्लूचर जर वेलिंगटनच्या सैन्यास अगदीं ऐनवेळीं येऊन न मिळता, तर नेपोलियनचा विजय अगदीं ठरलेला होता. कारण त्यानें ह्या लढाईंत आपलें युद्धकौशल्य

---

१ ह्या लढाईंतील नेपोलियनच्या कौशल्याबद्दल मागें सांगितलेला मॉरिस नामक ग्रंथकार पुढील उद्गार काढतोः—

"His comprehension of the situation as a whole, his selection of the decisive points on the theatre, his admirable skill in assembling his forces, his power of stratagem,

( ग्रं. क्र. ... )

इतक्या उत्तम रीतीनें व्यक्त केले होते कीं, त्यामुळें इंग्लिश व ऑस्ट्रियन सैन्य अगदीं पराभव पावण्याच्या स्थितीस येऊन पोंचलें होतें. परंतु ब्लूचरचें नव्या दमाचें व संख्येनें बरेंच मोठें सैन्य ह्या सैन्यास येऊन मिळाल्यामुळें शत्रूंच्या $\frac{1}{3}$ हिश्शानें असलेल्या फ्रेंच सैन्याचा पराभव झाला (जून १८ इ. स. १८१५). वाटर्लूच्या पराभवानंतर फ्रेंच सैन्याची फार दुर्दशा झाली. परंतु तशा स्थितींतही सुमारें ८० हजार सैन्य **नेपोलियन** सांगेल त्याप्रमाणें वागण्यास तयार होतें. पण ह्या एवढ्याशा सैन्यानिशीं शत्रूच्या सुमारें ७।८ लक्ष फौजेबरोबर युद्ध चालू ठेवणें धोक्याचें होतें. तशांत ह्या अपजयामुळें फ्रान्समध्येंही पुन्हा दुफळी माजली. अशा स्थितींत पुढें युद्ध चालू ठेवणें म्हणजे देशांत बिनाकारण बखेडा उपस्थित करणें होय, असें समजून नेपोलियननें पुढें युद्ध चालविण्याचें नाकारलें. त्याच्या कित्येक सल्लागारांनीं त्याला युद्ध सुरू ठेवण्याबद्दल आग्रह केला व जर तो त्यानें ऐकला असता, तर त्याच्या स्वतःची भावी स्थिति पुष्कळच चांगली झाली असती. परंतु स्वतःच्या हिताकरितां फ्रान्सचें नुकसान करण्यास तो बिलकुल तयार नव्हता. इतकेंच नव्हे, तर फ्रान्सच्या कल्याणाकरितां प्राण खर्च करण्याचीही त्याची तयारी होती. आणि म्हणून त्याच्या उपरोक्त सल्लागारांस हीच गोष्ट त्यानें पुढील शब्दांत सांगितली:—

---

hia scie tific method of attack, were exhibited almost in the highest perfection. He outmanauvred his enemies on the 15th; all but checkmated them the next day; and but for the faults of Gronchy, would have gained Waterloo."

" Civil war can have no other result than that of placing me as Emperor in a better position to obtain arrangements more favourable to my personal interests. I cannot consent to expose my friends to destruction for such a result. I cannot allow myself to be the cause of the desolation of the provinces, and thus to deprive the national party of its true support, by which sooner or later, the hour and independence of France will be established. I have renounced sovereignty and only wish for a peaceful asylum. "

असो; वाटर्लूच्या पराभवानंतर नेपोलियननें पुन्हा एकदां आपल्या बादशाही सत्तेचा राजीनामा दिला व आपल्या निवडक मित्रांसह त्यानें अमेरिकेंत जाण्याचा बेत केला. ह्या प्रयाणाकरितां त्यानें एका फ्रेंच जहाजाची योजनाही केली. परंतु त्याच्या संयुक्त शत्रूंनीं आयत्या वेळीं त्यास ह्या जहाजावरून जाण्याची मनाई केली. तेव्हां शत्रूंच्या हेतूसंबंधानें त्याच्या मित्रमंडळांत संशय उत्पन्न होऊन अनेकांनीं त्यास गुप्त रितीनें पळून जाण्याचा सल्ला देऊन त्याप्रीत्यर्थ साधनेंही जमवून देण्याचें कबूल केलें ! परंतु नेपोलियननें असला भ्याडपणाचा मार्ग स्वीकारला नाहीं. त्याचे शत्रु बनलेल्या ४ राष्ट्रांपैकीं इंग्लंडच्या कायद्यासंबंधानें व लोकांसंबंधानें त्याच्या मनांत बराच पूज्यभाव होता. म्हणून तो त्या राष्ट्राच्या आश्रयाकरितां एका इंग्रजी जहाजांतून इंग्लंडमध्यें जाण्यास

निघाला. परंतु हें जहाज इंग्रज-बंदरांत असतांनाच तेथील सरकारनें त्यास कैदी करून सेंट हेलेना येथें पाठविलें[1]!

## प्रकरण १२ वें.

### कारागृहवास व अंत.

नेपोलियनला सेंट हेलेना येथें पाठविण्याचें जेव्हां इंग्लिश प्रधानमंडळीनें ठरविलें, तेव्हां त्याच्याबरोबर बराच लवाजमा व आप्तेष्टमंडळ होतें. यांपैकीं बहुतेक सर्व लोक त्याच्याबरोबर सेंट हेलेना येथें जाण्यास तयार होते. परंतु त्यांपैकीं सुमारें २५ लोकांस त्याच्याबरोबर जाण्याची परवानगी देण्यांत आली. त्यामुळें बाकीच्या लोकांस नाइलाज म्हणून परत फिरावें लागलें. इंग्लंडच्या कायद्यांचा आश्रय करण्याकरितां आपण होऊन नेपोलियन इंग्रजी जहाजावर चढला होता; व त्याची इच्छा असल्यास त्याला इकडे येऊं द्यावें, अशा अर्थाचा आपणाला आपल्या सरकारचा हुकूम असल्याचेंही ह्या जहाजावरील अधिकाऱ्यानें त्यास कळविलें होतें. अशा स्थितींत इंग्लिश प्रधानमंडळीनें त्याच्या-

---

१ नेपोलियनचा हा जो शेवट झाला, त्यासंबंधानें इंग्रजांचा अभिमानी असलेला मॉरिस म्हणतो:—

" The Allies, too, must be condemned by history; admitting they had a right to go to war with Napoleon, they had no right to denounce him as a kind of pirate; admitting they had a right to deprive him of liberty, they had no right to subject him to insult and wrong."

—Morris's Life of Napoleon.

संबंधानें केलेला वरील निकाल बेकायदेशीर व अन्यायाचा होता, म्हणून तो रद्द करविण्याबद्दल इंग्लंडांतील पुष्कळ न्यायप्रिय लोकांनीं प्रयत्न सुरू केले. तेव्हां अधिकारीवर्गाचीं मनें गांगरून गेलीं व त्यांनीं नेपोलियनला किनाऱ्यावर उतरूं न देतां समुद्रांतूनच परस्पर त्याची **सेंट हेलेना**कडे रवानगी केली. त्याच्याबरोबर त्याचे सोबती म्हणून त्याचे तीन सरदार व एक खासगी कारभारी आणि त्यांचीं कुटुंबें हीं त्याच्याबरोबर गेलीं. याखेरीज हुजरे व अन्य प्रकारचे कांहीं सेवकही त्याच्याबरोबर होते. ही सर्व मंडळी ता० १६ आक्टोबर सन १८१५ रोजीं सेंट हेलेना येथें येऊन पोंचलीं. त्या ठिकाणीं एका भिकार घरांत प्रथम कांहीं दिवस त्यांना ठेवण्यांत आलें. नंतर सुमारें ६ महिन्यांनीं **लाँगवूड** नामक लहानशा त्यांच्याकरतां तयार केलेल्या इमारतींत त्यांची रवानगी झाली. ह्या जागेंत **नेपोलियननें** सुमारें ५ वर्षें काढलीं. ह्या ५ वर्षांत त्याच्याबरोबर आलेले त्याचे स्नेही **लाकासे, मॉंथोलोन, गुरगॉड** आणि **बरतांद** यांनीं त्याचें कष्टमय जीवित सुखकर करण्याचा शक्य तितका प्रयत्न केला; व त्याच्या प्रेमाकरितां त्यांनीं स्वतःही अनेक आपत्ति व अपमान सोसले. हे लोक आपखुषीनें आपल्या सरदारी ऐषआरामास व सुखास रजा देऊन **नेपोलियन**बरोबर सहकुटुंब आलेले होते; आणि ते होते म्हणूनच नेपोलियनला आपल्या कारागृहवासाचे दिवस कसे तरी काढतां आले. कारण त्याचा जेलर ऊर्फ गव्हर्नर सर **हडसन लो** हा आपल्या आडनांवाप्रमाणेंच मनुष्य होता. त्यानें **नेपोलियनला** फारच

वाईट रीतीनें वागविलें. तें इतकें कीं, 'ह्या कारागृहवासापेक्षां मृत्यु बरा ' असें उद्गार नेपोलियनच्या मुखांतून तेथें अनेक वेळ निघाले! परंतु त्यानें हे सर्व कष्ट एकंदरींत मोठ्या धीरानें व शांतपणानें सोसले. सर **हडसन लो**च्या वागणुकीसंबंधानें **ॲबट**नें आपल्या **नेपोलियन**च्या चरित्रांत फार सूक्ष्म व विस्तृत वर्णन दिलेलें आहे. तें कांहीं अंशीं पक्षपाताचें आहे असें जरी गृहित धरलें, तरी **नेपोलियन**च्या इतर चरित्रकारांनींही ह्या बाबतींत इंग्लंडचें तत्कालीन अधिकारीमंडळ व सर **हडसन लो** हे नैतिकदृष्ट्या महान् अपराधी आहेत, असा आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. ॲबटचें वर्णन जरी पक्षपाती मानलें, तरी डॉ० **जे हॉलंड रोज**कृत **नेपोलियन**च्या चरित्रांतील एतद्विषयक वर्णन पक्षपातीपणाचें आहे, असें कोणी म्हणणार नाहीं. त्याचप्रमाणें **मॉरिस**सारखे **नेपोलियन**विषयीं अनेक बाबतींत प्रतिकूल अभिप्राय व्यक्त करणारे इंग्रज ग्रंथकारही सर **हडसन लो**च्या वर्तनाचा निषेधच करीत आहेत. **नेपोलियन** कायदेशीर रीतीनें बादशहा बनलेला असून इंग्लिश अधिकाऱ्यांनीं त्यास '**जनरल बोनापार्ट**' ह्या पदवीनें संबोधण्याचा मुद्दाम उपक्रम केला होता. शिवाय हिंडण्याफिरण्याच्या व पुढें पुढें खाण्यापिण्याच्या बाबतींतही त्यास उद्वेगजनक अशीं बंधनें घालण्यांत आलीं होतीं! **नेपोलियन**च्या सोबत्यांनाही हीं बंधनें पाळावीं लागत आणि त्यामुळें त्यांचा आयुष्यक्रमही **नेपोलियन**प्रमाणेंच कष्टमय बनलेला होता. परंतु त्या उदार व थोर आत्म्यांनीं **नेपोलियन**वरील आपलें अखंड प्रेम व्यक्त करण्याकरितां सर्व प्रकारच्या

अडचणी व गैरसोयी धिम्मेपणानें सहन केल्या! असो; या कारागृहवासांत **नेपोलियननें** आत्मचरित्रात्मक असा बराच मजकूर स्वतः लिहिला आहे, व पुष्कळसा आपल्या सोबत्यांकडून लिहविला आहे. तो आपला बहुतेक काळ लिहिण्यावाचण्यांत व आपल्या स्नेह्यांबरोबर संभाषण करण्यांत घालवीत असे. ह्या ठिकाणीं आल्यावर लवकरच त्याचें शारीर स्वास्थ्य बिघडलें. मानसिक अस्वास्थ्य व शारीरिक अस्वास्थ्य ह्या दोहोंनीं त्यास सारखेंच पछाडल्यामुळें दिवसानुदिवस त्याची प्रकृति बिघडत चालली. त्याला औषधोपचार करण्याकरितां एक डाक्टर त्याच्या तैनातीस देण्यांत आला होता; परंतु औषधोपचाराचा त्याला उपयोग झाला नाहीं. ४।५ वर्षांचे आंत त्याला विलक्षण क्षीणता प्राप्त झाली व पुढें पुढें तर तो दुखण्यानें कित्येक दिवस एकसारखा तळमळत असे. अखेर इ० स० १८२१ च्या मे महिन्याच्या ५ व्या तारखेस रात्रीं **नेपोलियननें** आपला कष्टतर कारागृहवास पूर्ण करून इहलोक सोडला! तो मरण पावतांच त्याच्या स्नेह्यांनीं त्याचें प्रेत फ्रान्सला नेण्याविषयीं परवानगी मागितली. परंतु ती त्यांस मिळाली नाहीं. जणूं काय नेपोलियनचें प्रेतसुद्धां युरोपखंडाच्या शांततेचा भंग करील, असें तत्कालीन इंग्लिश अधिकाऱ्यांस वाटत असावेंसें दिसलें! त्यानें जें मृत्युपत्र केलें होतें, त्यांत 'आपणांस सेन नदीच्या तीरावर आपल्या फ्रेंचबांधवांच्या सहवासांत पुरावें' अशी आपली इच्छा प्रदर्शित केली होती. परंतु तिचा सध्यां तूर्त तरी कांहीं उपयोग होण्यासारखा नव्हता. नेपोलियनसंबंधानें फ्रेंच लोकांत

पुष्कळ आदर व सहानुभूति होती; परंतु फ्रान्सच्या गादीवर बोरबोन राजघराण्यांतील राजा असल्यामुळें हा आदर व ही सहानुभूति जाहीरपणें व्यक्त करणें दुरापास्त झालें होतें. अशा स्थितींत इंग्लिश सरकारच्या सद्बुद्धीवर व औदार्यावर अवलंबून राहण्यावांचून नेपोलियनच्या स्नेह्यांस दुसरा मार्ग नव्हता. परंतु त्यांच्याकडून जेव्हां त्यांची इच्छा सफळ होईना, तेव्हां नाइलाज म्हणून मोठ्या दुःखानें त्यांनीं **लाँगवूड** येथेंच त्याचा दफनविधि करण्याची सर्व तयारी केली. ही तयारी त्याच्या योग्यतेस अनुसरून त्या परिस्थितींत जेवढी करतां आली तेवढी झाल्यानंतर त्याचें प्रेत लष्करी थाटानें व सन्मानानें स्मशानाकडे नेण्यांत आलें. तेथें रीतीप्रमाणें सर्व धार्मिक विधि आटोपल्यावर गंभीरपणें त्यास मूठमाती देण्यांत आली. व नंतर सर्व मंडळी खिन्न होऊन आपापल्या घरीं परत आली. नेपोलियन **लाँगवूड** येथें येऊन राहिल्यापासून तेथील सर्व लोकांच्या मनांत त्याच्याविषयीं प्रेम व आदर उत्पन्न झालेला होता. अर्थात्, त्याच्या स्मशानयात्रेस तेथील बहुतेक सर्व लोक आले होते. याखेरीज त्याच्या रक्षणाकरितां म्हणून जे २५०० लष्करी शिपाई ठेवण्यांत आले होते, तेही त्यांच्या अधिकाऱ्यांसह या वेळीं हजर होते. असो; **नेपोलियन**चा दफनविधि झाल्यानंतर त्याच्याबरोबर आलेले सर्व लोक युरोपांत निघून गेले. मात्र त्याचा एक नोकर **सार्जंट हुबर्ट** हा तेवढा तेथें राहिला. तो त्याचा इतका निस्सीम भक्त बनलेला होता कीं, त्याला **नेपोलियन**च्या प्रेताचाही वियोग सहन करवेना! अशा प्रकारची स्वामीनिष्ठा व उत्कृट प्रेम क्वचितच आढळून येतें!

नेपोलियनची चरित्रकथा त्याच्या मृत्यूबरोबरच संपली नाहीं. कारागृहवासांत त्याची जी निष्कारण मानखंडना व हाल झाले, त्याची भरपाई करून त्याच्या उज्वल कीर्तीची प्रभा सर्व जगभर पसरावी, असा परमेश्वरी संकेत असल्यामुळें त्याच्या मृत्यूनंतर १९ वर्षांनीं पुढील अपूर्व व जगाच्या इतिहासास अननुभूत असा प्रकार घडून आला: —

नेपोलियन इ० स० १८२१ त वारला. त्यानंतर सुमारें ९ वर्षांनीं फ्रान्समध्यें पुन्हा राज्यक्रांति होऊन बोरबोन राजघराण्याची सत्ता नष्ट झाली; व फ्रान्सच्या गादीवर लुई फिलिप ( ड्यूक ऑफ ऑर्लियन्स ) यास तेथील लोकांनीं बसविलें. ही गोष्ट १८३० च्या जुलई महिन्यांत घडून आली. नंतर सुमारें २ महिन्यांनीं नेपोलियनच्या प्रेताची कॉफीन ( पेटी ) फ्रान्समध्यें आणण्याची चळवळ फ्रेंच लोकांत सुरू झाली व पुढील १० वर्षांत तिला इतकें व्यापक स्वरूप आलें कीं, लुईफिलिप यास त्या कामीं पुढाकार घेणें भाग पडलें. त्यानें आपल्या परराष्ट्रीय प्रधानाकडून इंग्रजी दरबाराकडे नेपोलियनच्या प्रेताची मागणी केली. कृतकर्माचा पश्चात्ताप झाल्यामुळें म्हणा अथवा परिस्थिति पालटल्यामुळें म्हणा, या वेळीं इंग्लिश सरकारानें फ्रेंच सरकारची विनंति तावडतोब व सत्कारपूर्वक मान्य केली[1]! त्यांनीं जें उत्तर पाठविलें

---

1 इंग्रज सरकारच्या चांगुलपणाचें प्रदर्शन करणारें हें उत्तर असें होतें:
"The government of her Britanic Majesty hopes that the promptness of its answer may be considered in France as a proof of its desire to blot out the last trace of those

त्यांत ह्या खेपेस त्यांनीं नेपोलियनची ‘ एंपरर ( बादशहा )’ ही पदवीही मान्य केली होती ! नेपोलियनचें अधःपतन झाल्यानंतर सुमारें २५ वर्षांनीं त्याच्या आत्म्यानें आपल्या शत्रूवर हा नैतिक जय संपादन केल्याबद्दल फ्रेंच लोकांस ( राष्ट्रास ) धन्यता वाटावी, हें अगदीं साहजिक आहे. इंग्रज सरकारची कबुली मिळतांच लुईफिलिप यानें प्रिन्स द जोइनव्हिले यास त्या कामगिरीवर नेमलें. त्याच्याबरोबर नेपोलियनचे जुने मित्र जनरल गोरगाड, जनरल बरतांद, काउंट ला कॅसे हेही सेंट हेलेनाकडे जाण्यास निघाले. त्यांच्याबरोबर दोन लष्करी जहाजें होतीं. ही सर्व मंडळी योग्य लव्याजम्यानिशीं ता० ८ आक्टोबर सन १८४० रोजीं सेंट हेलेनाच्या धक्क्यावर येऊन दाखल झाली. तेथील ब्रिटिश जहाजांनीं त्यांस सलामी दिल्यानंतर ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं आपल्या फ्रेंच पाहुण्यांस सत्कारपूर्वक जमिनीवर उतरून घेतलें. नंतर १५ आक्टोबर रोजीं मध्यरात्रीं नेपोलियनचें प्रेत उकरून काढण्याचा विधि गंभीरपणें सुरू झाला. सुमारें ९ तासांनीं त्याची कॉफीन हातास लागली. त्याबरोबर धार्मिक मंत्रांचा उच्चार व संस्कार सुरू होऊन ती बाहेर काढण्यांत आली. बाहेर काढल्यावर ती उघडली, व पहातात तों नेपोलियनचा चेहरा सहज ओळखतां येण्या-

---

National animosities which, during the life of the Emperor, armed England and France against each other. Her maje. sty's Government hopes that if such sentiments survive anywhere, they may be buried in the tomb about to receive the remains of Napoleon.

Abott's Napoleon. P. 601.

सारख्या स्थितींत अद्याप राहिला होता ! त्याचा लष्करी पोषाख मात्र कुजत चालला होता. तेथें जमलेल्या सर्व फ्रेंच लोकांनीं त्याच्या प्रेतास आदरपूर्वक प्रणाम केल्यानंतर फिरून तें पूर्ववत् कॉफीन-मध्यें घालण्यांत आलें. नंतर सरकारी रीतीनें इंग्लिश अधिकाऱ्यांनीं ती कॉफिन फ्रेंच अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केली. त्यांनीं ती लागलीच फ्रेंच जहाजावर नेऊन त्याकरितां मुद्दाम तयार करून आणलेल्या भव्य व सुंदर पेटींत घालून सर्व प्रकारचे धार्मिक विधि आटो-पल्यावर तेथून प्रयाण केलें. ही **कॉफिन** ज्या जहाजांत ठेवली होती, तें फ्रेंच पद्धतीनें शृंगारलेलें असून त्यावर अहोरात्र मेण-बत्त्यांचे नंदादीप जळत होते. अशा थाटांत **नेपोलियन**ची स्वारी पुन्हा आपल्या देशाकडे चालली होती. तो देखावा खरोखरच मनोवृत्ति उचंबळून टाकणारा होता ! हें विजयी फ्रेंचमंडळ ता० २ डिसेंबर इ०स० १८४० रोजीं फ्रेंच बंदरांत येऊन दाखल झालें. त्याबरोबर तीन लष्करी जहाजें त्यांस सामोरीं जाऊन त्यांनीं मोठ्या थाटानें त्यांचें स्वागत केलें. **नेपोलियन**ची **कॉफिन** फ्रेंच बंदरांत आल्याचें वर्तमान समजतांच सर्व देशभर त्याचें स्वागत करण्याची चळवळ जोरानें सुरू झाली. मोठमोठ्या शहरांतील बहु-

---

१ नेपोलियनचें शव प्रथम एका शिशाच्या पेटींत घालण्यांत आलें होतें, व तें सडूं नये म्हणून शक्य ती सर्व व्यवस्था केली होती. ह्या शिशाच्या पेटीवर टीनचें आच्छादन घालून मग ती पेटी एका जाड लाकडी पेटींत घालून पुरली होती. या कारणानें २५ वर्षेंपर्यंत त्याच्या अवयवांस फारसा धक्का लागला नव्हता.

तेक लोक त्याच्या प्रेताची मिरवणूक पहाण्याकरितां व त्याचा सत्कार करण्याकरितां **सेन** नदीच्या तीरावर जमा झाले. त्याची **कॉफीन** ह्याच नदींतून छोट्या जहाजावरून **पॅरिस** येथें जावयाची होती. म्हणून ह्या नदीच्या दोन्ही तीरांवर लोकांनीं चित्रविचित्र निशाणें लावलीं होतीं व दिव्यांची रोषणाई केलेली होती. दोन्ही तीरें मनुष्यांनीं गजबजून गेलीं होतीं. सर्वांचे डोळे नदींतून जाणाऱ्या जहाजाकडे लागलेले होते; व ज्याच्या दृष्टीस नेपोलियनची **काफीन** पडेल (लोकांच्या दृष्टीस पडावी म्हणून ती ऊंच जाग्यावर ठेवली होती.) तो गंभीरपणानें तिला प्रणाम करीत होता. ता. १४ डिसेंबर रोजीं संध्याकाळीं चार वाजतां नेपोलियनची **कॉफीन** पॅरीस नजीकच्या एका खेडेगांवीं येऊन पोंचली. ह्या ठिकाणीं तिचे स्वागतार्थ फ्रेंच लष्करी अधिकारी अगोदरच येऊन हजर झाले होते. येथें नेपोलियनच्या थडग्याचें १९ वर्षपर्यंत नित्य दर्शन घेणाऱ्या सार्जंट ह्यूबर्टची व त्यांची प्रथम भेट झाली. तेव्हां त्यांना मोठा गहिंवर येऊन त्यांनीं त्यास प्रेमालिंगन दिलें. त्या वेळीं त्यांच्या नेत्रांतून सारखा अश्रुपात चालू होता! **कॉफिनचें** दर्शन घेण्याकरितां लोकांच्या झुंडीच्या झुंडी **पॅरीसहून** येत होत्या. येथें ह्या **कॉफीन**-चा जलप्रवास संपून दुसरे दिवशीं सकाळीं १६ घोड्यांच्या गाडींतून तिला तिच्या विश्रांतीच्या ठिकाणीं नेण्यांत आलें. ही जमिनीवरील मिरवणूक फार जंगी होती. त्यांत फ्रेंच राष्ट्रांतील सर्व पुढारी व ठळक लोक, प्रधानमंडळ, लष्करी व मुलकी अधि-

कारी आणि राजघराण्यांतील सर्व मंडळी सामील झालेली होती. सुमारें ९॥ वाजतां ही मिरवणूक Church of Iuvalids नामक स्मशानभूमींत येऊन पोंचली. ही स्मशानभूमि वरील नांवाच्या देवळाच्या आवारांतच आहे. या ठिकाणीं दफनविधीचा समारंभ सरकारी रीतीनें सन्मानपूर्वक व्हावयाचा होता, व तो पाहण्याकारितां जमणाऱ्या प्रेक्षकांस बसण्यासाठीं मुद्दाम उंचवट्याच्या जागा तयार करण्यांत आल्या होत्या. सुमारें ३६ हजार प्रेक्षकांचा समावेश ह्या जागेंत होण्याजोगा होता. याखेरीज उघड्या मैदानांत हजारों माणसें जमलीं होतीं. दफनविधीची सर्व तयारी झाल्यावर नेपोलियनची **कॉफीन** त्याकारितां बहुत खर्च करून मुद्दाम बांधलेल्या थडग्यानजिक नेण्यांत आली. तेथें **प्रिन्सद जोइनव्हिले** यानें सरकारी रीतीनें ती फ्रेंच बादशहास अर्पण केली; व फ्रेंच राष्ट्राच्या वतीनें त्यानें तिचा स्वीकार केल्यावर व सर्व धार्मिक विधि उरकल्यानंतर तीं योग्य ठिकाणीं ठेवण्यांत येऊन तिजवर माती टाकण्यांत आली. या वेळीं तोफांची सलामी व लष्करी बँड सुरू झाला, आणि नंतर थोड्याच वेळांत दफनविधीचा सर्व समारंभ पुरा होऊन सर्व मंडळी गंभीरपणें परत फिरली. याप्रमाणें **नेपोलियनची** शेवटची इच्छा त्याच्या राष्ट्रानें पुरी करून त्याच्याविषयींची आपली कृतज्ञता व्यक्त केली!

**समाप्त.**

## आमच्या आश्रयदात्यांस विज्ञप्ति.

सा. न. वि. वि. आपण आमचे ग्राहक आहां, तेव्हां आम्ही आपल्याला आमचे आश्रयदातेच समजतों. आम्ही एका विद्वान लेखकाकडून "**श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांचें चरित्र**, अर्थात् **स्वराज्यसंस्थापनेचा इतिहास**" या नांवाचें पुस्तक लिहवून प्रसिद्ध केलें आहे. **शिवचरित्रद्वारा स्वराज्यस्थापनेसारखें** श्रेष्ठ देशकार्य महाराष्ट्रांत कसें घडून आलें, या विषयाचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत मार्मिकपणें व ऐतिहासिक दृष्टया या पुस्तकांत केलेलें आहे. **पूर्वसिद्धता, साधुसंतांची कामगिरी, श्रीशिवाजीमहाराज व श्री समर्थ रामदासस्वामी, महाराजांची योग्यता, उपसंहार** आणि **बोध** इत्यादि बारा प्रकरणें यांत आलीं असून पुस्तकाचा आकार रॉयल सोळा पेजी आहे, आणि पुस्तकाची एकंदर पृष्ठसंख्या २०० आहे. आरंभीं महाराजांची अश्वारूढ सुंदर तसबीर घातली आहे. भाषा प्रचलित नवीन आहे. बाइंडिंग उत्तम. सारांश, पुस्तक सर्वांगसुंदर असून आबालवृद्धांस वाचनीय व अवश्य संग्रहीं ठेवण्यासारखें झालें आहे. किंमत ८१२ ठेविली आहे; परंतु आमच्या ग्राहकांस ट. खर्चासह फक्त ८८ स देण्याचें ठरविलें आहे. तरी आपण निदान एक प्रत तरी मागवून आम्हांला कृतार्थ कराल अशी आशा आहे. उत्तर आल्याबरोबर पुस्तक रवाना होईल. क. हे वि. आपला.

कृपाभिलाषी.

म्यानेजर, श्रीमयूरेशपुस्तकालय, बेलबाग-पुणें.

# विनंतिपत्र.

पुणें येथील सुप्रसिद्ध नाइट क्लबानें सुमारें २० वर्षांपूर्वी लिहून प्रसिद्ध केलेल्या मौनयौवना कादंबरीची दुसरी आवृत्ति आम्हीं नुकतीच छापून प्रसिद्ध केली आहे. ही कादंबरी जुन्या पद्धतीची असून त्या वेळच्या कै. न्यायमूर्ति रानडे प्रभृति सर्व मोठमोठ्या विद्वान् गृहस्थांचे व वर्तमानपत्रकारांचे या कादंबरीवर उत्तम अभिप्राय आहेत. कथानक फारच सुंदर, मनोवेधक व बहारीचें असून बोधप्रद आहे. पृष्ठसंख्या ३२५. बांधणी उत्तम. किं. १। रुपया. परंतु या विनंतीला मान देऊन मागणी करणारांस आमचे आश्रयदाते समजून आम्हीं ही कादंबरी फक्त एक रुपयाला देऊन आबालवृद्धांना वाचनीय व प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबांत अवश्य संग्रहणीय असें नवीनच प्रसिद्ध झालेलें श्रीशिवछत्रपतिचारित्र पृष्ठसंख्या २००, किं. ८१२, हें पुस्तक बक्षीस पाठविण्याचें ठरविलें आहे. ट. ख. ८४ नि.

---

# सुख आणि शांति.

सुख नको कोणाला? सुखासाठीं तर सर्वांची धडपड चालली आहे. पण हें खरें असलें तरी सुखोत्पादक शांतीचा लाभ ज्याला झाला आहे असा माणूस विरळा. याचें कारण खरें सुख म्हणजे काय व तें मिळवावें कसें, याची स्पष्ट कल्पना पुष्कळांना नसते. यामुळेंच त्यांचे सुखप्राप्तीचे प्रयत्न निष्फळ होतात. हें अज्ञान सुप्र-

सिद्ध मराठी लेखक आणि कवि रा. महादेव हरि मोडक बी. ए. यांनीं लिहिलेल्या **सुख आणि शांति** या पुस्तकाच्या वाचनानें दूर होईल व सुखप्राप्तीचा मार्ग सुलभ होईल. रा. मोडक हे, **खडे तात्विक बोल**, भाग पहिला व दुसरा (किंमत प्रत्येकीं सहा आणे) या दोन छोटेखानी पुस्तकांवरून मराठी वाचकांस परिचित झालेले आहेत. **सुख आणि शांति** या पुस्तकावरील पुढें दिलेले अभिप्राय वाचल्यावर हें पुस्तक संग्राह्य असल्याबद्दल वाचकांची खात्री होईल, अशी आम्हांस आशा आहे.

## अभिप्राय.

**मुमुक्षु** (पुणें)—सदर ग्रंथ खरोखरीच फार रमणीय व संग्राह्य झाला आहे. भाषासरणी इतकी सरळ, भारदस्त व कवित्वपूर्ण आहे कीं, पानांमागें पानें उलटतांना चित्तावर सुख आणि शांतीच्या लहरी उठतात. शब्दाची किंवा अर्थाची ओढाताण कोठेंही होत नाहीं. नित्य प्रचारांतल्या सुंदर म्हणी, समर्पक अवतरणें, अल्पाक्षररमणीय भाषेंत सांगितलेल्या सुंदर गोष्टी, मुळावर ताण करणारीं सरस भाषांतरें इत्यादि प्रकार पाहून वाचकास परमाल्हाद झाल्याशिवाय रहात नाहीं. मदिरारूपी बया (पृष्ट ६९), भुजंग (पृष्ठ ३०१) इत्यादि कांहीं प्रसंग म्हणजे नुसतीं रत्नें आहेत! सर्वच भाषा सहजसुंदर व निर्दोष आहे.

**ज्ञानांजन** (मुंबई):-सरस आणि ओजस्वी मराठी भाषेचा उत्कृष्ट नमुना जर कोणास पहावयाचा असेल तर त्यानें हा ग्रंथ अवश्य वाचावा, अशी आम्ही शिफारस करितों. सुख, शरीर, मन, आरु-

रुक्षा, संतोष, आपत्ति, सदयता, शिक्षण, शत्रुमित्र, श्रीमंती, सृष्टीची भीषणता, सृष्टिप्रेम, सद्यःकाल, वैदग्ध्य, राष्ट्रांची शांति, चित्तस्वास्थ्य, धर्म, आणि ब्रह्मविद्या अशीं या ग्रंथाचीं १८ प्रकरणें असून तीं एकापेक्षां एक बहारीचीं आहेत. प्रत्येक सद्ग्रंथसंग्रहेच्छु महाराष्ट्रीयानें या ग्रंथाची एक प्रत अवश्य संग्रहीं ठेवावी.

आनंद ( पुणें )—रा. मोडक यांची लेखनशैली मोहक व त्यांचें भाषाप्रभुत्व प्रशंसनीय आहे. मदिरेवर त्यांनीं केलेलें सुंदर रूपकच मार्मिक वाचकांना गार करून सोडील. मूळ किंमत २॥ रुपये. तूर्त कमी केलेली १॥ रुपया. टपाल वगैरे खर्च पांच आणे निराळा पडेल.

## लोकप्रिय प्रोज व संगीत नाटकें.

| नांव | | किंमत | नांव | | किंमत |
|---|---|---|---|---|---|
| सं० मनोविजय | .... | -॥- | ,, देवी ज० पद्मावली | | ८= |
| ,, दंडधारी | .... | -॥- | प्रोज श्रीतुकाराम | .... | -॥।- |
| ,, धर्मरहस्य | .... | -॥- | ,, पानिपतचा मुकाबला | | -॥- |
| ,, श्रीमती | .... | -॥- | ,, समजुतीचा घोटाळा | | -॥- |
| ,, उषा | .... | -॥- | ,, अण्णासाहेबांची धांदल | | -।- |
| ,, तारकमारक | .... | -॥- | | | |

हीं सर्व पुस्तकें एकदम मागविल्यास किंमत फक्त ३ रुपये. टपालखर्च निराळा.

सोल एजंटः—

श्रीमयूरेश पुस्तकालय, बेलबाग, पुणें ( सिटी. )

# वा. दा. मुंडले यांचीं पुस्तकें.

## १ बाल-मनुस्मृति.

सोप्या भाषेंत आर्यसंस्कृति व धर्मशास्त्र यांची ओळख पटवून शील बनविण्यास साहाय्य करणारें हें छोटें पुस्तक प्रत्येक आई-बापांनीं आपल्या मुलांचे हातीं द्यावें, असें विद्वानांचें मत आहे. किंमत चार आणे.

## २ फ्रेंच वाङ्मयरत्नमाला.

फ्रेंच राष्ट्रांतील उज्वल वाङ्मयाचें स्थूल स्वरूप दाखवून देऊन त्यांतील सात प्रमुख तत्त्ववेत्त्यांचीं त्रोटक चरित्रें व त्यांचे मननीय विचार, यांचा या पुस्तकांत समावेश केला आहे. किंमत आठ आणे.

## ३ चीन देशाची संक्षिप्त माहिती.

यांत चिनी राष्ट्राच्या दोन हजार वर्षांतील घडामोडींचा वृत्तान्त थोडक्यांत सांगितला असून त्याच्या भावी स्थितीचेंही भविष्य वर्तविलें आहे. किंमत चार आणे.

## ४ महिला-क्लेश-निवारण.

स्त्रीआरोग्यसंबंधीं पुस्तक. यांत रजो-दर्शन, गर्भधारणा, प्रसूति, अपत्यपोषण, ह्या विषयांवर आधुनिक शोधांच्या द्वारें उपलब्ध झालेली सर्व माहिती थोडक्यांत सांगितली आहे. डाक्टर व वैद्य यांचे उत्तम अभिप्राय आहेत. किंमत दहा आणे.

### ५ भारत-मुक्ताहार.

आर्य संस्कृतीच्या उदात्त स्वरूपाची ओळख करून देणारें पुस्तक. यांत धर्म, नीति, समाजानुशासन, स्त्रीधर्म वगैरेसंबंधीं महाभारतांतून उत्कृष्ट वेंचे दिले आहेत. किंमत सहा आणे.

### ६ काउंट कॅव्हूर.

हा प्रसिद्ध इतालियन मुत्सद्दी असून यानें इतालीयन राष्ट्राचें पुनरुज्जीवन केलें. त्याचें हें चरित्र अति रम्य व बोधप्रद आहे. ( छापत आहे. ) किंमत आठ आणे.

### ७ प्रसिद्ध पुरुषांचा कोश.

यांत जगांतील चारी खंडांतील ऐतिहासिक कालांतील प्रख्यात स्त्री-पुरुषांची व त्यांच्या कृतींची थोडक्यांत माहिती दिली आहे. मराठींत अशा तऱ्हेचा हा पहिलाच ग्रंथ असून घरबसल्या बहुश्रुतपणा वाढविणारा आहे. किंमत एक रुपया. ( लवकरच छापून बाहेर पडेल. )

पत्ताः—दि प्रिंटिंग एजन्सी, बुधवार पेठ—पुणें.

---

टी पोथी रु. १।) **श्रीगुरुचरित्र** ( रेशमी बांधणी रु. १॥

कागद जाड, ग्लेज; शब्द तोडलेले; मोठा ठळक व सुबक टाईप; प्रत्येक पानाला सुंदर वेल; प्रत्येक अध्यायास रंगीत सुंदर चित्र. ट. ख. वेगळा.

श्रीमयूरेशपुस्तकालय, बेलबाग, पुणें (सिटी.)

# दोन भारतीय श्रेष्ठ धर्मग्रंथ.

**भारतामृत–सरळ मराठी भाषेंत महाभारत**—आर्य हिंदूंचे आचारविचार, त्यांची श्रेष्ठ नीति, त्यांच्या उदात्त धर्म कल्पना, त्यांचें श्रेष्ठ तत्वज्ञान इत्यादि विषयांचें उज्वल स्वरूप पाहणें असल्यास तें फक्त या ग्रंथांतच पहावयास मिळेल. 'जें महाभारतांत नाहीं, तें जगांत कोठेंही नाहीं' अशा अर्थाची जी एक म्हण प्रचलित आहे, ती अगदीं यथार्थ आहे हें या ग्रंथाच्या प्रत्येक वाचकाला सहज पटेल. हा ग्रंथ आबालवृद्धांस अवश्य वाचनीय असल्यामुळें मराठी जाणणाऱ्या प्रत्येक कुटुंबाच्या संग्रहीं असलाच पाहिजे. पृष्ठसंख्या ३०००. भाग १।२।३ किंमत फक्त ६॥ रुपये.

**रामकथामृत–सरळ मराठींत रामायण**—पुत्रवात्सल्य, सापत्नभाव, कालिप्रभाव, अपूर्व स्वामिभक्ति, अलोट भ्रातृभक्ति, बंधुप्रेम, पितृभक्ति, निःसीम पतिपत्नीप्रेम, शौर्य, तेज, नीतिमत्ता, करारीपणा इत्यादि दैवी गुणांचें साम्राज्य जर कोठें पहावयास मिळेल तर तें फक्त वरील ग्रंथांतच होय.

सर्व सद्गुणसंपन्न **श्रीरामचंद्र**, महान् पतिव्रता **सीतादेवी**, अद्वितीय भ्रातृभक्त **श्रीलक्ष्मण**, अपूर्व स्वामिभक्त **श्रीहनुमान**, इत्यादि मुख्य मुख्य भूमिकांचें स्वभाव-चित्र इतकें हृदयंगम व देदीप्यमान आहे कीं, हिंदुत्वाचा अभिमान असणाऱ्या प्रत्येकानें हा असामान्य धर्मग्रंथ एकदां तरी वाचलाच पाहिजे. पृष्ठसंख्या १२००. भाग १।२ किंमत फक्त २॥ रुपये.

— श्रीमयूरेश पुस्तकालय, बेलबाग, पुणें ( सिटी ).

# सवलतीनें मिळणारीं निवडक पुस्तकें.

## पाऊणपट किंमतीस.

| नांव. | | किंमत. | नांव. | किंमत. |
|---|---|---|---|---|
| सं० दंडधारी | .... | -||- | प्रो० पानपतचा मुकाबला | -||- |
| ,, उषा | .... | -||- | ,, समजुतीचा घोटाळा | -||- |
| ,, श्रीमती | .... | -||- | सं० प्रेममकरंद नाटक | १ |
| ,, शाकुंतल | .... | -|||- | प्रो० तुकाराम नाटक | -|||- |
| ,, भस्मासुर | .... | -|||- | कादंबरी मौनयौवना | १। |
| ,, संतापशमन | .... | -|||- | कादंबरी निर्मलप्रेम व नीतिबाह्य प्रेम | ||= |

टपाल खर्च निराळा पडेल.

## निम्या किंमतीस.

| नांव. | | किंमत. | नांव. | किंमत. |
|---|---|---|---|---|
| सं० शारदामंडन | .... | -||- | गणेशपुराण आर्याबद्ध (पूर्वार्ध–उत्तरार्ध) | २ रु० |
| ,, शुकरंभा | .... | -||- | | |
| ,, वेताळ | .... | -||- | गुप्त पोलिसांचें चातुर्य (पूर्वार्ध–उत्तरार्ध) | २॥रु |
| ,, अति लोभ | .... | -|||- | | |
| ,, प्रणयमुद्रा | .... | |||- | भगवद्गीता–समश्लोकी | १। रु. |
| ,, सुनिश्चयप्रभाव | | -|||- | नेदर्लंडांतील बंडाचा इतिहास पृ. सं. ४३६ | १॥ रु. |
| ,, नलदमयंती | .... | १ रु० | | |
| प्रो० कपिध्वज | .... | -|||- | दी पॉ. इंग्लिश टीचर भाग १।२ | १। रु. |
| सतारीचें मोठें पुस्तक | | २॥ रु० | | |

टपाल खर्च निराळा पडेल.

व्यवस्थापक श्रीमयूरेश पुस्तकालय,
बेलबाग–पुणें (सिटी).

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क. ११२९
संदर्भ शाखा

REFBK-0001129